सोलापूर तरुण भारत
आसमंत



छत्रपती शिवाजी महाराज हे नाव जगाच्या कानाकोपऱ्यात राहणाऱ्या प्रत्येक मराठी माणसाच्या मनावर अधिराज्य गाजवणारे आहे. या राजाने सांगितलेला स्वातंत्र्याचा मूलमंत्र आपल्या जगण्याचा आधार आहे. त्यांच्यातील तेजस्वी बाणा, निर्धार, तेज, करारी वृत्ती, न्याय असे एक ना अनेक विशेष आजही दुर्लभ आहेत. कोणा एका व्यक्तीमध्ये ते बघायला मिळणे अशक्यप्राय भासते. अशा या राजाच्या १९ फेब्रुवारीला साजरी होत असलेल्या जयंतीनिमित्त...

# राजे...


निमित्त

**मंजिरी ढेरे**

बदलला, परिस्थितीने कूस पालटली तरी शिवाजीराजे या नावाचे महात्म्य तसूभरही कमी झालेले नाही. उलटपक्षी, बदलत्या परिस्थितीमध्ये बदलत्या संदर्भांनिशी ते नव्याने समोर येते आणि आजही राजे असायला हवे होते, असे जाणवते. आक्रमकांना सळो की पळो करून टाकणारे, दुष्टांचे निर्दालन करणारे, प्रजेचा सन्मान करून आश्वस्त करणारे असे नेतृत्व प्रत्येक काळासाठी मिळायला हवे.

शिवाजी महाराजांनी आपल्या कारकीर्दीमध्ये या सगळ्याचे असे मापदंड देऊन ठेवले आहेत की त्याचा अनुनय करण्याचा प्रयत्न केला तरी बरीच कल्याणकारी कामे मार्गी लागतील. म्हणूनच जयंतीनिमित्ताने राजांचे स्मरण करताना आजच्या काळात त्यांच्या विचारांचे महत्त्व काय, यावर चर्चा करणे गरजेचे ठरते. मुळात छत्रपती शिवाजी महाराज हे केवळ एका साम्राज्याचे संस्थापक नव्हते, तर एका आदर्श नेतृत्वाचे प्रतीक होते. त्यामुळे त्यांचे विचार आणि कार्यांचे महत्त्व केवळ इतिहासापुरते मर्यादित नाही तर आजही प्रत्येक भारतीयासाठी प्रेरणादायी आहे. सध्याच्या सामाजिक, राजकीय आणि आर्थिक परिस्थितीमध्ये त्यांचे विचार अधिक महत्त्वाचे ठरतात. राजांचे नेतृत्व आणि ध्येयधोरणे पाहता ते दूरदृष्टीचे आणि आदर्शवादी राजे होते. त्यांनी स्वराज्य हा संकल्प उभा केला आणि त्यासाठी अपार परिश्रम घेतले.

आजच्या काळात, विशेषतः तरुणांना नेतृत्वगुण आत्मसात करण्यासाठी आणि स्वतःचे ध्येय गाठण्यासाठी महाराजांच्या या जिद्दीचा आदर्श घेता येईल. दुसरी बाब सामाजिक समता आणि न्यायाची आहे. शिवाजी महाराजांनी आपल्या राज्यात जातपात, धर्मभेद न मानता सर्वांना समान न्याय दिला. त्यांनी हिंदू-मुस्लिम एकतेचा आदर्श घालून दिला. आजच्या काळात जातीयतेच्या आणि धार्मिक द्वेषाच्या पृष्ठभूमीवर सामाजिक सलोख्यासाठी त्यांचे विचार मार्गदर्शक ठरू शकतात. महिलांचा सन्मान आणि सुरक्षितता हा आज ऐरणीवर आलेला मुद्दा आहे. या पृष्ठभूमीवर पाहता शिवाजी महाराजांनी आपल्या सैन्यात महिलांसाठी स्वतंत्र संरक्षण यंत्रणा उभारली होती. स्त्रियांवर अत्याचार करणाऱ्यांना त्यांनी कठोर शासन केले. ते बघता आजच्या समाजात महिलांच्या सुरक्षिततेबाबत वाढत्या समस्यांसाठी त्यांचे विचार आणि धोरणे प्रेरणादायी ठरू शकतात. आत्मनिर्भरता आणि स्वावलंबन प्रत्येक काळात महत्त्वाचे असतेच. शिवाजी महाराजांनी स्वराज्यासाठी स्वयंपूर्ण अर्थव्यवस्था आणि जलदुर्ग, गडकोट यांची मजबूत व्यवस्था निर्माण केली. आजच्या आर्थिक संकटांच्या काळात 'मेक इन इंडिया' आणि स्वदेशी उत्पादनांना चालना देण्यासाठी त्यांचा हा आदर्श उपयुक्त ठरणारा आहे. खेरीज राजांनी शिस्त आणि युद्धनीतीचेहीकालातीत धडे दिले. त्यामुळेच त्यांचा गनिमी कावा आणि गुप्तचर यंत्रणा आजच्या संरक्षण आणि धोरणात्मक व्यवस्थेसाठी अत्यंत महत्त्वाची बाबठरू शकते. आजच्या प्रशासकीय व्यवस्थेसाठी त्यांच्या शिस्तप्रियतेचा आदर्श प्रेरणादायी आहे.




पर्यावरण आणि त्याच्या रक्षणासंबंधीचे प्रश्नभेसूर रूप घेत आहेत. त्याकडे दुर्लक्ष केल्यास संपूर्ण निसर्गचक्र धोक्यात येण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळेच पर्यावरण संवर्धन आणि गडसंवर्धनासाठी महाराजांनी घेतलेले निर्णय अभ्यासण्याजोगे ठरतात. शिवाजी महाराजांनी गडदुर्गांच्या संवर्धनावर विशेष भर दिला. त्यांचे गडदुर्ग आपल्या ऐतिहासिक वारशाचा भाग आहेत. तेव्हा त्यांचे संरक्षण करणे आणि पर्यावरण संवर्धन करणे ही काळाची गरज आहे. थोडक्यात, जयंतीनिमित्त केवळ साजरीकरणामध्ये दंग न राहता छत्रपती शिवरायांच्या विचारांनुसार आचरण करण्याचा प्रयत्न केल्यास त्यांना अपेक्षित असणारा समाज आपण घडवू शकतो. महाराष्ट्रातल्या प्रत्येक माणसाच्या मनात या वीरपुरुषाच्या कथां धून मिळालेले वीरश्रीचे बाळकडू पाझरले आहे. त्यांच्या जीवितकार्यातल्या प्रत्येक तेजोमय प्रसंगाने आपल्या प्रत्येकाच्या आयुष्यातला कोपरा उजळला आहे. आपल्याला रणाचा परिचय नाही, पण राजांची रणनीती आयुष्यातल्या बारीकसारीक प्रसंगांध्येही मार्गदर्शक ठरते. आता कोणी शाहिस्तेखान, अफझलखान आपल्यावर चालून येणार नाही, पण त्यांच्या कथा ऐकून मोठे झाल्यामुळे गोड बोलून पाठीत वार करू शकणाऱ्या प्रत्येक शत्रूप्रती आपण सजग राहात आहोत. शिवसाम्राज्यानंतर काही शतकांचा काळ उलटला असला, तरी आजही प्रचंड उत्साहात आणि दिमाखात शिवरायांची जयंती साजरी होणे आणि प्रत्येक पिढीने तेवढ्याच आनंदाने त्याचा भाग होण्याचा प्रयत्न करणे हाच या व्यक्तिमत्त्वाचा गौरव आहे. राजांबद्दल आपल्या प्रत्येकाच्या मनात प्रे ाबरोबरच भक्तीही आहे. ही भक्ती तो प्रतिपालक, धनी, नेता, धुरंधर असल्याबद्दल आहेच; त्याहीपेक्षा अधिक अखंड जनकल्याणाचा विचार केल्यामुळे आहे. याच जनांच्या कल्याणासाठी मिसरुडे फुटायच्या वयापासून वृद्धत्वाची साद ऐकू येण्याच्या वयापर्यंत त्यांनी अनंत संकटांचा सामना केला. आपल्या मावळ्यांना प्राणपणाने जपले. प्रजेवर पुत्रवत प्रेम केले. म्हणूनच तख्त इतिहासजमा झाले तरी छत्रपती शिवाजी महाराज महाराष्ट्रातील प्रत्येक व्यक्तीच्या मनावर आरुढ आहेत. त्यांच्याप्रती असणारे मनामनातले प्रेमा तसूभरही कमी झालेले नाही. स्वराज्य आणि शिवराय हे अद्वैत महाराष्ट्राच्या ललाटावरील टिळ्यासम आहे.

आजही कोणताही गड चढताना इथे शिवप्रभूंची पायधूळ झडली असेल, या विचाराने प्रत्येक जण भारावून जातो. रायगडावरील शिवरायांच्या प्रतिमा दृष्टीस पडताच डोळे भरून येतात, समाधीचे दर्शन घेताना प्रत्येकजण भावुक होतो. शिवरायांचा असा महिमा असल्यामुळेच महाराष्ट्राची मातीही त्यांची जयंती साजरी करते. आधी उल्लेख केल्याप्रमाणे शिवप्रभूंच्या चरित्रातून घेण्यासारखे खूप काही आहे. किंबहुना, त्यांच्या आयुष्यातील प्रत्येक अध्यायच अभ्यासण्याजोगा आहे. मावळे आणि सह्याद्री यांची साथ असल्याशिवाय संघर्ष सफल होणार नाही, हे या द्रष्ट्याने आधीच ओळखले होते. यातूनच शिवबांना गडकोटाच्या अभ्यासाची आणि सामान्यजनांचे सुख-दुःख जाणून घेण्याची प्रेरणा मिळाली. आदिलशाही सत्तेने आक्रमण करून शहाजीराजांची जहागिरी बेचिराख केली. आधी गाढवाचा नांगर फिरवलेल्या पुण्याच्या भू ीवर राजमाता जिजाऊंने १२ वर्षांच्या शिवबांच्या हस्ते सोन्याचा नांगर फिरवला आणि एका सुवर्णकाळाचा आरंभ झाला. यवनांनी उद्ध्वस्त केलेल्या कसबा गणपती मंदिराचा शिवबाने जीर्णोद्धार केला. एका नव्या युगाला, आरंभाला गणेशाचे आशीर्वाद मिळाले. दुसरीकडे शिवबांनी उद्ध्वस्त जहागिरीची पुनर्रचना करण्यास सुरुवात केली. त्यांनी देशमुख देशपांडे या वतनदारांच्या माध्यमातून रयतेशी संपर्क साधला आणि पुनर्वसाहतीसाठी नागरिकांचे सहकार्य मागितले. पण जनता अस्मानी आणि सुलतानी संकटाने ग्रासली होती. त्यांच्याकडे घालायला कपडा, पोटाला घास, दावणीला बैल आणि राहण्यासाठी निवारा नव्हता. जमीन पडीक होती. ही विदारक अवस्था जाणल्यानंतर शिवबाने प्रत्येकाला गरज असेल तशी मदत करण्याचे जाहीर केले. अवजारे नसलेल्यांना अवजारे दिली, अन्नाचा घास नसणाऱ्यांना खंडी-दोन खंडी धान्य दिले, शेतीच्या कामासाठी बैल नसणाऱ्यांना ती मदत देऊ केली. अशा प्रकारे त्यांनी मूलभूत प्रश्नांपासून रयतेची सुटका केली. त्यांनी पडीक जमीन लागवडीखाली आणणाऱ्याला पाच वर्षे सारा माफ केला.

१७ व्या शतकात अशा प्रकारे करमुक्त व्यवस्था निर्माण करून शिवबाने पडीक जमीन लागवडीखाली आणून कृषिप्रधान देश बनवण्याचा आरंभ केला. म्हणजेच त्यांच्या प्रयत्नाने एकेकाळचा सुवर्ण भारत नव्याने उदयाला येण्याची आशा निर्माण झाली. त्यांनी आदिलशाही सत्ता, निजामशाही आणि मुघल यांची सत्ता आकारत असणारा ६० टक्के कर ३३ टक्क्यांवर आणला. अर्थातच हा सारा सुपीक जमिनीसाठी होता. आजच्या भाषेत बोलायचे तर कराचे प्रमाण निम्म्यावर आले. या निर्णयामुळे शहाजी राजांच्या जहागिरीतला शेतकरी कामाला जुंपला गेला. शिवाजी महाराज पुणे प्रांतात येण्याआधी या जहागिरीतली केवळ ४० टक्के भूमी लागवडीखाली होती. गुणग्राहकता हा शिवाजी महाराजांचा आणखी एक खास गुण होता. जनतेतल्या प्रत्येक माणसाला ते मानसन्मान देत असत. थोडक्यात, आजच्या युगातही त्यांचा आदर्श घेतल्यास एक न्यायप्रिय, सुरक्षित आणि आत्मनिर्भर समाज घडवता येईल. त्यांच्या शिकवणींना अनुसरून कार्य केल्यास भारत अधिक सक्षम आणि सशक्त राष्ट्र म्हणून उभे राहील, यात शंका नाही.

# वादे वादे जायते तत्त्वबोधः

**संवाद हवा, तर्क हवा, विचारांची देवाणघेवाणही हवी. यातून जे विचारमंथन होते, त्यातूनच सत्याची खरी जाणीव होते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाविषयीचे सत्य विकृत करून सांगणाऱ्यांना सरसंघचालकांनी समाजाशी थेट संवाद साधल्यामुळे चाप बसला आहे. ही संवाद प्रक्रिया व तिचे पडसाद प्रदीर्घ काळ उमटत राहतील किंवा काहीच प्रतिक्रिया येणारही नाही. कारण, आता सगळ्या भेदांनाच व अपप्रचाराला तिलांजली मिळण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे.**



समाजभान


**प्रतिनिधी**

नुकतेच मुंबईच्या कला क्षेत्रात प्रसिद्ध असलेल्या नेहरू सेंटरच्या सभागृहात दोन दिवस राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पू. सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांचा विविध क्षेत्रांतील दिग्गजांबरोबर संवाद संपन्न झाला. हा संवाद खऱ्या अर्थाने संवाद होता व एखाद्या उत्तम मैफिलीची सांगता संगीताचा परमोच्च बिंदू गाठून होते, तशी या संवादाची सांगता सुसंवादातून झाली. खरेतर विजयादशमीचे सरसंघचालकांचे उद्बोधन संघ व समाजासाठी मार्गदर्शन करणारे भाषण मानले जाते.

समाजातल्या एखाद्या विशिष्ट घटकासाठी विशिष्ट संवाद साधण्याचा संघाचा रिवाज नव्हता. मात्र, संघ शताब्दी व त्याचा पूर्वार्ध हे निमित्त मानून, रा. स्व. संघाने विविध महानगरांत भारतातील दिग्गज व्यक्तिमत्त्वांशी संवाद साधायला सुरुवात केली. क्रांतीपेक्षा उत्क्रांतीवर विश्वास ठेवणाऱ्या रा. स्व. संघाच्या इतिहासात हा संवाद महत्त्वाची नोंद म्हणून नोंदवला जाईल. देशभरात विविध ठिकाणी झालेल्या अशा विविध कार्यक्रमांत पत्रकार, तत्त्वज्ञ, चित्रकार, कलाकार, प्राध्यापक, उद्योजक, विविध देशांचे राजदूत, संत- महंत, विविध पंथांचे प्रमुख अशा अनेक श्रेणींतील बहुसंख्य दिग्गजांनी हजेरी लावली. देशाच्या राजकीय राजधानीत तर सतत संघाला पाण्यात पाहणारी मंडळीही या संवाद कार्यक्रमात सहभागी झालेली दिसली. त्यांना झालेल्या संघाच्या आकलनानुसार त्यांनी पू. सरसंघचालकांना प्रश्नही विचारले. सरसंघचालकांनीही तितक्याच समंजसपणे प्रश्नांचे रोख व त्यातून काढला जाणारा अर्थ लक्षात घेऊन, त्या प्रश्नांची चोख उत्तरे दिली. त्यामुळे मुंबईसह सर्वच महानगरांत झालेला हा संवाद 'मोनोलॉग' न राहता, आत्मसंवादातून जनसंवादाचा प्रयोग ठरला. संवादाच्या ज्या तीन प्रक्रिया जनसंवादाचे विद्याथ अभ्यासत असतात, त्यात आत्मसंवाद, संवाद व जनसंवाद हे तीन महत्त्वाचे टप्पे आहेत. संघाचा आत्मसंवाद हा केवळ राष्ट्रभक्तीतून जन्मलेला आहे. या देशात या मातीसाठी कामकरीत असताना आलेल्या अनुभवांतून संघाची संवाद प्रक्रिया घडली आहे. सरसंघचालकांचा हा संवाद व्यापक जनसंवादाची नांदी ठरला. या संवादाचे परिणामप्रदीर्घ काळ अनुभवता येतील. संघाविषयीचे समज-गैरसमज हे संघ व समाज यांच्यातील संवाद-सेतूंच्या अभावामुळे निर्माण झाले होते. अभिमत निर्माण करणारी मंडळी आपापल्यापरीने संघ समजून घेतात व संघाचा भलाबुरा अर्थ समाजाला सांगत राहतात. परवाच्या संवादामुळे एका झटक्यात संघ व समाजा मधला हा अडसर दूर झाला आहे.

मुंबई हे आर्थिक व मनोरंजन क्षेत्राचे अग्रेसर शहर. इथल्या अर्थकारणाला व मनोरंजनाला आकार देणाऱ्यां व्यक्ती व दिग्गजांना या शहरात अनन्यसाधारण महत्त्व आहे. दोन्ही स्तरांतील गणमान्य लोकांनी सरसंघचालकांसोबत संवाद साधला. सिनेमा हे अभिमतनिर्मितीतील महत्त्वाचे माध्यम. अनेकदा हिंदूविरोधी, संघविरोधी अभिमत निर्माण करीत असताना, याच क्षेत्रातील मंडळींचा प्रभावीपणे वापर केला जातो. यातील काही लोक खरोखरच संघापासून अनभिज्ञ आहेत, तर काही लोक स्वतःच्या तुच्छ लाभांसाठी संघाची बदनामी करीत असतात. मात्र, जेव्हा संघच संवादी होऊन जातो, तेव्हा अशा मंडळींची दुकाने बंद होतात. संघ दलितविरोधी आहे, संघ मुस्लीमविरोधी आहे, संघ ख्रिश्चनविरोधी आहे, हे आणि असे कितीतरी 'फेक नॅरेटिव्ह' सतत संघाविषयी पसरविले जातात. यासाठी पुस्तके लिहिली जातात, परिसंवाद भरविले जातात, अनेका एनजीओंची पोटंही यावर भरतात. सरसंघचालकांनी यावर उत्तमविवेचन केले आहे. मुंबईच्या कार्यक्रमात एखादी दलित व्यक्ती सरसंघचालक होऊ शकते का? या प्रश्नाचे उत्तर त्यांनी अत्यंत मार्मिक पद्धतीने दिले. सरसंघचालक होण्याचा निकष हिंदू असणे व संघटनेसाठी समर्पण करणे, हाच असल्याचे त्यांनी स्पष्ट सांगितले. वादातून, संवादातून, विचारमंथनातून जी घुसळण होते;

(पान ४ वर)



# अर्थवृद्धीच्या देशा...

**जागतिक अर्थव्यवस्था मंदीच्या सावलीत असताना भारताची अर्थगती मात्र थांबत नाही. साडेसहा टक्क्यांच्या आसपास राहणारी वाढ, मजबूत बँकिंग व्यवस्था आणि वाढती अंतर्गत मागणी, यामुळे भारत 'जी-२०' समूहामध्ये पुन्हा एकदा वेगळेपण कायमठेवणारा देश ठरला आहे.**

लक्ष्यवेध

**संजीव ओक**

भारत पुन्हा एकदा जागतिक आर्थिक चर्चेच्या केंद्रस्थानी आला आहे. जागतिक मंदीची छाया, युद्धजन्य अस्थिरता, ऊर्जा-अन्नाच्या किमतींचा ताण आणि विकसित अर्थव्यवस्थांमधील वाढीचा थकवा या सगळ्या पार्श्वभूमीवर भारताची अर्थव्यवस्था मात्र वेग कायम ठेवून पुढे जात आहे. २०२६-२७ या आर्थिक वर्षात भारताची वाढ सुमारे साडेसहा टक्क्यांच्या आसपास राहील आणि 'जी-२०' देशांमध्ये भारत सर्वाधिक वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था राहील, असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. हे आकडे केवळ आकडेमोड नाहीत; ते भारताच्या आर्थिक-रचनेतील बदलांचे, धोरणात्मक सातत्याचे आणि अंतर्गत ताकदीचे प्रतिबिंब आहेत.

गेल्या दशकभरात भारताच्या अर्थव्यवस्थेने जे संक्रमण अनुभवले, ते अनेक अर्थांनी ऐतिहासिक म्हणावे लागेल. एकेकाळी 'फ्रॅजाईल फायव्ह' म्हणून ओळखला जाणारा भारत आज जागतिक वाढीचे इंजिन म्हणून पाहिला जातो. हे परिवर्तन अचानक झालेले नाही. ते धोरणात्मक निर्णय, संरचनात्मक सुधारणा आणि राजकीय इच्छाशक्ती यांचा परिणाम आहे. विशेष म्हणजे, जागतिक अर्थव्यवस्थेतील बाह्य धक्क्यांवर भारताची अर्थव्यवस्था आता तुलनेने कमी प्रमाणात अवलंबून आहे. अंतर्गत मागणी, पायाभूत सुविधा, सेवा क्षेत्र आणि बँकिंग व्यवस्थेची मजबुती हे भारताच्या वाढीचे मुख्य आधारस्तंभ बनले आहेत.

भारतातील खासगी उपभोग हा या वाढीचा कणा ठरतो आहे. शहरी, तसेच ग्रामीण भागातील मागणीत हळूहळू; पण ठोस वाढ दिसून येते. कररचनेतील बदल, वैयक्तिक करदात्यांना दिलेली सवलत, थेट लाभ हस्तांतरणामुळे ग्रामीण भागात आलेली क्रयशक्ती आणि रोजगारनिर्मितीमुळे वाढलेला आत्मविश्वास यांचा थेट परिणामउपभोगावर झाला आहे. पूर्व भारताची वाढ मोठ्या प्रमाणावर निर्यात किंवा जागतिक चक्रांवर अवलंबून होती. आज ती देशांतर्गत मागणीवर उभी आहे, हे बदललेले वास्तव महत्त्वाचे आहे. यासोबतच सेवा क्षेत्राने पुन्हा एकदा आपली ताकद सिद्ध केली आहे. माहिती-तंत्रज्ञान, वित्तीय सेवा, पर्यटन, आरोग्य, शिक्षण आणि डिजिटल सेवा या क्षेत्रांमधील विस्तार भारताच्या वाढीला सातत्य देतो

(पान ४ वर)

# निर्यातीसाठी शुभवार्ता, हवा सावध पवित्रा

**अमेरिकेने भारतावरील आयात शुल्क ५० टक्क्यांवरून १८ टक्क्यांवर आणल्याचे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी नुकतेच जाहीर केले. त्यांनी आयात शुल्क कमी केलेल्या उद्योगांना केंद्रीय अर्थसंकल्पातही सवलत दिली असल्याने दुहेरी फायदा होणार आहे. तसेच आपण चिनी उत्पादनांशी चांगली स्पर्धा करू शकू. अर्थात ट्रम्प यांचा लहरी स्वभाव पाहता ही घोषणा किती दिवस टिकेल हे सांगता येत नाही.**

वेध

अनंत सरदेशमुख
आर्थिक घडामोडींचे जाणकार



गेल्या काही दिवसांमध्ये आर्थिक क्षेत्रात मोठ्या घडामोडी घडत आहेत. नुकताच केंद्रीय अर्थसंकल्प सादर झाला. अमेरिकेने लादलेल्या टॅरिफचा भारतीय उद्योगांवर होणारा परिणाम कमी करण्यासाठी त्यात काही पावले उचललेली दिसली. त्यापूर्वीच युरोपियन युनियनबरोबर 'फ्री ट्रेड अॅग्रिमेंट'वर सह्या झाल्या. त्यापूर्वी न्यूझीलंडबरोबरही भारताने 'फ्री ट्रेड अॅग्रिमेंट'वर सह्या केल्या. अरब देशांबरोबरही भारताने तसा करार केला. त्यात भर म्हणून आता भारत आणि अमेरिका या देशांदरम्यान गेले अनेक महिने सुरू असलेल्या 'टॅरिफ'(आयात शुल्क) संदर्भातील वाटाघाटींना यश आले. दोन्ही देशांच्या प्रमुखांनी या वाटाघाटी सफल ठरल्याचे जाहीर केले.

अमेरिकेने भारतातून अमेरिकेत निर्यात होणाऱ्या वस्तूंवर लावलेले आयात शुल्क कमी करून ते पूर्वपदावर (१८ टक्के) आणून ठेवले, पण अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचा लहरी स्वभाव, आपलेच निर्णय फिरवण्याचा इतिहास आणि तर्कविसंगत निर्णय घेण्याची वृत्ती पाहता आता जाहीर केलेले आयात शुल्क तरी दीर्घकाळ राहील की नाही, हे सांगणे अवघड आहे. अर्थात या नव्या आयात शुल्काचा भारतीय निर्यातदारांना फायदा होईल आणि गेले वर्षभर जवळजवळ बंद असलेली अमेरिकेतील निर्यात पुन्हा सुरू होईल, अशी आशा करायला हरकत नाही. आयात शुल्क कमी करणे, ही आपल्या दृष्टीने चांगली बाब आहे. यात फार्मास्युटिकल्स, चामडी वस्तू, इमिटेशन ज्वेलरी, रत्ने, हस्तकलेच्या वस्तू, इलेक्ट्रॉनिक उपकरणे, काही कृषी उत्पादने आदी क्षेत्रांचा समावेश आहे. या सर्व क्षेत्रांना अमेरिकेच्या निर्णयामुळे नक्कीच फायदा होईल. गेल्या वर्षभरात या क्षेत्रांच्या अमेरिकेतील निर्यातीत झालेली कपात भरून काढण्यासाठी केंद्रीय अर्थसंकल्पातही अनेक चांगल्या तरतुदी करण्यात आल्या होत्या. म्हणजे आता या क्षेत्रांना दुहेरी फायदा मिळू शकेल. अमेरिकेशी आयात शुल्कासंदर्भात काही तरी करार लवकरच होईल, याची कुणकुण अर्थमंत्र्यांना लागली असावी. त्यामुळेच अर्थसंकल्पातही या क्षेत्रांना सवलती देण्यात आल्या असाव्यात. अमेरिकेने आयात शुल्क कमी करताना भारताने रशियाकडून करण्यात येणारी तेलखरेदी बंद करावी तसेच अमेरिका आणि व्हेनेझुएलाकडून तेलखरेदी वाढवावी, अशी अट ठेवण्यात आली आहे. आपण या कराराच्या दोन दिवस आधीच व्हेनेझुएलाकडून तेल घेणार असे सांगितले होते. त्यापूर्वी भारत इराणकडून तेल खरेदी करत होता. ती खरेदीही आपण कमी करत आता बंद केली आहे.

रशियाकडून खरेदी केल्या जाणाऱ्या तेलाच्या प्रमाणातही आता घट करण्यात आली आहे. पण तसे पाहायला गेल्यास रशियाकडून आपल्याला बऱ्यापैकी स्वस्त दरांमध्ये तेल मिळत होते. पण आता त्या दरांमध्ये वाढ झाली आहे. त्यामुळे आता आपण अमेरिका आणि व्हेनेझुएलाकडून तेलखरेदी सुरू केल्यास स्वस्त दरांमध्ये तेल मिळू शकेल. मी नेहमीच म्हणत आलो आहे की, डोनाल्ड ट्रम्पच्या या नुसत्या धमक्या होत्या. आयात शुल्क लादल्यानंतरची अमेरिकेची परिस्थिती पाहता लक्षात येते की, तिथे महागाई वाढली. तिथली अर्थव्यवस्थाही मजबूत झाली असे म्हणता येणार नाही. आपण युरोपियन युनियनबरोबरही खुला व्यापार करार केला आहे. या सर्व बाबींची प्रतिक्रिया म्हणून ट्रम्प यांना आयात शुल्क कमी करावे लागले आहे. या काळात विविध स्तरांवर दोन्ही देशांची बोलणी सुरूच होती. सुरुवातीला दोन्ही देशांचे वाणिज्य मंत्री, त्यानंतर विदेश मंत्री अशा पातळ्यांवर ही बोलणी सुरू होती. या प्रक्रियेत दोन्ही देशांनी आपापल्या अपेक्षांमध्ये तडजोडी करून शेवटी हा करार केला. यात भारताचा जास्त फायदा आहे. वर्किंग व्हिसाचा (एच वनबी) वाद अजून सुरू आहे. सध्या टुरिस्ट व्हिसा नाकारण्याचे प्रमाणही वाढले आहे, पण माझ्या मते लवकरच त्या मुद्याचेही समाधान होईल. कारण अमेरिकेत जाणाऱ्या इतर कोणत्याही देशाच्या पर्यटकांपेक्षा भारतीय पर्यटकांची संख्या अधिक आहे. त्याचा अमेरिकेला काही प्रमाणात का होईना फायदा होतोच. कारण पर्यटनक्षेत्र ही मोठी इंडस्ट्री आहे. या इंडस्ट्रीसाठी टुरिस्ट व्हिसा तर आवश्यक आहे. भारताने रशियाकडून मोठ्या प्रमाणावर तेल खरेदी सुरू केल्यामुळे डोनाल्ड ट्रम्प नाराज होते. त्यांच्या मते, भारताने रशियाकडून तेलखरेदी केल्यामुळे रशियाला मिळालेल्या निधीचा वापर युक्रेनविरुद्धच्या युद्धात केला जातो. म्हणजे एका अर्थाने भारत रशिया-युक्रेन युद्धात रशियाचा प्रायोजक असल्याची भूमिका पार पाडत आहे. अर्थात ही जगासमोर मांडायची भूमिका असली तरी त्याला 'ऑपरेशन सिंदूर'मध्ये पाकिस्तानमधील अमेरिकेच्या अण्वस्त्रांना निर्माण झालेला धोका, अमेरिकेऐवजी रशियाकडून केलेली तेलखरेदी आणि त्यातून होणारे अमेरिकेचे नुकसान, अमेरिकन डॉलरचे कमी होणारे महत्त्व आणि रशिया आणि चीनबरोबर वाढत असणारी भारताची सलगी असे अनेक कंगोरे होते. ट्रम्प यांनी सुरुवातीला २५ टक्के आयात शुल्क लावून भारताला धमकावण्याचा प्रयत्न केला. भारत रशियाकडून करत असलेल्या तेलखरेदीमध्ये कपात करत नाही, हे पाहून त्यांनी दंड म्हणून आणखी २५ टक्के आयात शुल्काची घोषणा केली. हे आयात शुल्क अमेरिकन खरेदीदारांकडून वसूल केले जात असल्याने या वस्तू अमेरिकन बाजारपेठेत महाग झाल्या होत्या. या काळात अमेरिकेने एकट्या भारतावरच नाही, तर चीन, मेक्सिको, कॅनडा अशा इतर देशांवरही जादा आयात शुल्क आकारले होते. ट्रम्प यांच्या या धोरणाला अमेरिकेतच विरोधही होऊ लागला होता. त्यांच्यावर हे धोरण मागे घ्यावे यासाठी दबावही वाढू लागला होता. भारताने या मुद्यावर संयमाची भूमिका घेतली होती. आयात शुल्क लादल्यावर भारत लगेच विनवण्या करत आपल्याकडे येईल आणि आपण आपल्या अटी लादून कमी करू, अशी ट्रम्प यांची अटकळ होती. पण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यावर घाईगडबडीत कोणतीही प्रतिक्रिया दिली नाही आणि ट्रम्प यांच्याशी संभाषणही केले नाही. त्यामुळे ट्रम्प भारतावर नाराज होते आणि त्या नाराजीपोटी त्यांनी अनेक बेताल वक्तव्येही केली. अर्थात त्याचा भारताच्याभूमिकेवर कोणताही परिणाम झाला नाही. दुसऱ्या बाजूला भारताच्या अमेरिकेशी आयात शुल्काच्या बाबतीत विविध स्तरांवर वाटाघाटी सुरू होत्या. याच काळात भारताने अमेरिकेत होणारी निर्यात कमी झाल्यामुळे होणारे नुकसान भरून काढण्यासाठी इतर देशांशी बोलणी सुरू केली. त्यातून अरब देश, न्यूझीलंड आणि आता युरोपियन युनियन यांच्याबरोबर खुले व्यापार करार झाले. त्यामुळे अमेरिकेबरोबरच्या व्यापारात घट येऊनही भारताची एकूण निर्यात कमी झाली नाही आणि आपल्या अर्थव्यवस्थेला कोणताही मोठा धोका निर्माण झाला नाही. राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकीवेळी ट्रम्प यांनी 'मेक अमेरिका ग्रेट अगेन' ही चळवळ जोरात सुरू केली आणि त्यानुसार राष्ट्राध्यक्ष बनल्यावर स्थानिक उद्योगांना फायदा व्हावा, म्हणून इतर देशांमधील वस्तूंवर आयात शुल्क लादले. किंबहुना, 'मागा'च्या नावाने निवडणुकांमध्ये दिलेली आश्वासने पूर्ण केली, हे दाखवण्यासाठीही त्यांना हे करावे लागले असावे. पण खुद्द अमेरिकेत 'मागा'ला चांगला प्रतिसाद मिळाला नाही. कारण अमेरिकन अर्थव्यवस्था पहिलेपासून बाहेरच्या देशांमधून आयात केल्या जाणाऱ्या उत्पादनांवरच अवलंबून आहे. तिथले मॅन्युफॅक्चरिंग मुख्यतः हायटेक वस्तूंचे आहे. म्हणजे कन्झ्युमर ड्युरेबल्स, टेक्सटाईल अशा वस्तू तिथे बांगलादेश, श्रीलंका, चीन, तैवान अशा देशांमधूनच येतात. तिथे विविध कारणांमुळे निर्मितीमूल्य जास्त असल्याने या वस्तू तिथे तयार केल्यास खूप महाग होतील, अशी परिस्थिती होती. त्यामुळे आयात शुल्क वाढवल्यास त्यांच्या नागरिकांना सर्व उत्पादने वाढीव दराने विकत घ्यावी लागतील आणि सरकारला नाराजीचा सामना करावा लागेल, अशी परिस्थिती आहे. आता आयात शुल्क १८ टक्क्यांवर आल्यामुळे आपण चीनच्या स्पर्धेत पुढे जाऊ शकू. कारण चीनवर अजूनही आपल्यापेक्षा जास्त आयात शुल्क आहे. विशेषतः कोरोनाच्या संकटानंतर जग चीनकडे काहीशा संशयाने पाहू लागले आहे. अनेक देश चीनला पर्याय म्हणून भारताकडे पाहत आहेत. देशात उत्पादनक्षमता, द्ययावत तंत्रज्ञान आणि कुशल मनुष्यबळही उपलब्ध आहे. शिवाय प्रदूषणविषयक नियम पाश्चिमात्य राष्ट्रांइतके कडक नाहीत. त्यामुळे तिकडे बंदी असलेले काही रासायनिक पदार्थ भारतात तयार केले जाऊ शकतात. या कारणांमुळे जग भारताकडे 'मॅन्युफॅक्चरिंग हब' म्हणून पाहू लागले आहे आणि अमेरिकेने आयात शुल्क कमी केल्यानंतर अमेरिकेतील निर्यातीतही मोठी वाढ होऊ शकेल.

---

सुखात्म

डॉ. अविनाश मोहरील

## बिनकामाचा डबा

आपले घर आता जुने झाले. आता याचे नूतनीकरण करायला हवे, असा विचार सूनबाईंनी मांडला. अगदी खरे होते तिचे. घरामध्ये आवश्यक त्या सोयी नव्हत्या. त्या असुविधांमुळे कामे वाढायची. त्रास व्हायचा. परंतु मला त्रास होतो आहे हे पटवून द्यायलाही सूनबाईला बरेच कष्ट घ्यावे लागले. सासूबाई तशाच स्थितीत अनेक वर्षांपासून असल्याने व आधीच्या पिढीच्या असल्याने सारे काही जुळवून घ्यावे हीच त्यांच्या जीवनाची पद्धत होती. इतर मंडळी जास्त वेळ घराबाहेर असल्याने घरातील सुविधांमुळे होणारे त्रास त्यांना कळत



नव्हते. त्यामुळे घराच्या नूतनीकरणाचा प्रस्ताव पुढे सरकतच नव्हता. नव्या युगात वावरणाऱ्या सुनेला वाटत होते की आपले घर सुंदर असावे, त्यात सर्व मूलभूत सुविधा असाव्यात व त्यासाठी तिचा खटाटोप सुरू होता. बऱ्याच प्रयत्नांनंतर तिला त्यामध्ये यश मिळले. यामध्ये सासऱ्यांनी तिची मदत केली. त्यांनी तिचे म्हणणे बरोबर आहे असा विचार मांडला व त्यानंतर चक्रे फिरली. घराचे नूतनीकरण करण्याचा निर्णय झाला. सूनबाईला फार आनंद झाला आणि तो अत्यंत स्वाभाविकच होता. नवे घर कसे असेल याबाबत सूनबाईची स्वप्ने सुरू झाली. घरातील प्रत्येकाने त्यात आपापली मते देणे सुरू केले. परंतु सर्वांत जास्त उत्साह सुनेचा होता. टाईल्स कुठल्या, त्याचे रंग कुठले, पडदे कोणते, त्याला शोभेसे फर्निचर कोणते, नव्या सुविधा कोणत्या याबाबत चर्चा सुरू झाल्या. बाहेर गेल्यावर देखील सूनबाई इतरांच्या नव्या घरांकडे जास्त निरखून बघायला लागली. एखादे डिझाईन, एखादा रंग चांगला वाटला की मोबाईलवर फोटो काढून ठेवणे असे बरेच काही तिचे सुरू होते. हे सारे करताना सूनबाईच्या एक गोष्ट अजून लक्षात आली की त्यांच्या घरात नंतर कधीतरी लागतील या शीर्षकाअंतर्गत खूप सारी अडगळ पडली आहे. घराचे नूतनीकरण करीत असताना सारे काही आधुनिक हवे आणि म्हणून या अडगळीला देखील घरातून काढायला हवे असा विचार तिने मांडला.

आधुनिक घरात साऱ्याच गोष्टी आधुनिक असाव्यात ही तिची मागणी रास्त होती. त्या अडगळीचे तिनेच केलेले वर्णन मोठे मजेदार होते. वेगवेगळ्या आकाराचे खिळे, जुन्या चपला, जुन्या नेवारीच्या कॉटची नेवार, जुनी फाटलेली मच्छरदाणी, अॅल्युमिनियमची शाळेत नेण्याची पेटी, एक मोठा पितळेचा ओबडधोबड डबा, वापरलेले व जुने झालेले टुथ ब्रश, जुने कंगवे, तुटलेल्याहँगर्स यासारखे सामान वेगवेगळ्या डब्यांमध्ये भरलेले होते. यातील ९० टक्के गोष्टी कधीही वापरात येणार नव्हत्या. परंतु कधीतरी एखाद्या मेकॅनिकला पंख्याच्या आतील पार्ट्स दुरुस्त करताना त्याला ऑईल देण्यासाठी लागेल म्हणून ठेवलेले जवळपास चाळीस जुने टुथ ब्रश अशा देखील वस्तू होत्या. त्यामुळे या सर्व वस्तू आता अगदी काढून टाकायला हव्यात असे आग्रही मत सूनबाईने मांडले आणि त्या मतामुळे नूतनीकरणासाठी तयार मतांमध्ये मतमतांतरे सुरू झाली. जुन्या वस्तू या जुन्या पिढीला किती प्रिय असतात व परिकथांमधे जसा एखाद्या पात्राचा प्राण पोपटात वगैरे असायचा तसे प्राण या वस्तूंमधे गुंतलेले असतात याचा सूनबाईंना अंदाजच नव्हता. जुने सामान हद्दपार करायचे या निर्णयामुळे घरात तणाव निर्माण झाला. आपसातील चर्चा या वादामध्ये परिवर्तित होणे सुरू झाले. काहीही झाले तरी मी पितळेचा मोठा डबा मात्र देणार नाही. बाकी सारे काही द्या पण तो द्यायचा नाही. सुनेने समजविण्याचा प्रयत्न केला की तो पितळेचा डबा मोडीत देऊन नव्या हॉलमध्ये ठेवण्यासाठी आपण पितळेची मोठी समई आणूयात. परंतु सासूबाई मात्र पितळेचा डबा द्यायला तयार नव्हत्या. असे काय आहे त्या डब्यात? पितळेचा तर आहे. सोने लागलेय का त्याला? यांचा तर प्राणच अडकलाय बहुधा त्या डब्यात!! सूनबाईची कुरकुर सुरूच होती. या तणावाच्या स्थितीला निवळण्याचे काम सासरेबुवांवरच आले. त्यांनी पाळीपाळीने दोन्ही गटांना त्यांच्या नेहमीच्या पद्धतीने समजावून सांगितले.

एखादी गोष्ट समोरच्याला समजेल या भाषेत सांगण्याची त्यांची हातोटी होती. पुढच्याच आठवड्यात एके दिवशी सकाळी सासूबाईंनी सुनेला बोलाविले व त्या म्हणाल्या, बाळ, तुला वाटते ते बरोबर आहे. हे सारे सामान आता जुने झाले आहे व त्याचा या नव्या व्यवस्थेमध्ये काहीच उपयोग नाही हे मला पटले आहे. वस्तूंमध्ये माझा जीव अकारणच अडकलेला आहे. साधा तो पितळेचा डबा परंतु मी किती आग्रह करतेय त्यासाठी. तू तुझ्या पद्धतीने कर सारे. हे घर आणि या घरातील सर्व गोष्टी मी जरी जमविल्या असल्या तरी मी हे सारे अत्यंत आनंदाने तुला सोपवायला हवे. या वस्तूंचे काय एवढे? या वस्तूंपेक्षा कितीतरी लाखमोलाची मुले, सुना आणि नातवंडे मला मिळाली आहेत. आता माझा जीवनाचा आनंद मी त्यातच शोधण्याचे ठरवायला हवे. पण मी मात्र या डब्यांमध्ये आणि वस्तूंमध्ये गुरफटून गेलीय. माझ्या पश्चात हे सारे तुम्हालाच तर सांभाळायचे आहे. मी ही सारी जमवाजमव व संसाराची मांडणी वयाच्या अठराव्या वर्षापासून केली. आता मी थकलेय. परंतु माझे मन अजूनही या भांड्यांमध्ये, त्यांच्या रचनांमध्ये गुरफटलेले आहे हे बरोबर नाही हे मला आता पुरते पटले आहे. बेटा, हे सारे मी रागावून अजिबात बोलत नाहीये. मला मनापासून वाटले म्हणून सांगितले. आता मला काहीच समस्या नाही. तुम्ही मिळून या जुन्या वस्तूंबाबत निर्णय घ्या आणि सर्व काढून टाका. सारे नवीन आणा. मलाही नव्या करकरीत घरात राहायला आवडेल. आणि हो तो पितळेचा डबा पण देऊन टाक आणि एक छान समई घेऊन ये. छान कल्पना आहे तुझी. सासूबाईंचे हे बोल ऐकल्यावर सून एकदम खुश झाली. सासरेबुवांनी समजावले हे तिच्या लक्षात आले. परंतु त्यांच्या निर्णयामुळे तिला फार आनंद झाला. सूनबाईशी बोलून सासूबाई त्यांच्या खोलीत गेल्या तेव्हा त्यांचा हात हातात घेऊन सासरेबुवा म्हणाले, मला तुझा अभिमान वाटतो. तुझ्या वयात जसे तू वागायला हवे तसेच तू वागलीस. सासूबाईंनी उत्तर दिले, तुम्ही सांगताच असे की पटल्याशिवाय राहत नाही. दोघेही हसले व अचानक त्या घरातला तणाव निवळून गेला. ज्या दिवशी सारे जुने सामान नेण्यासाठी माणूस येणार होता,

(पान ४ वर)

---

संस्कारांच्या देशा

रमा गोळवलकर

## अन्नप्राशन- २

ज्या अन्नावर देह पोसला जाणार आहे, त्या अन्नाचा आदर, सन्मान करणं हा या भूमीचा संस्कार आहे. त्याची सुरुवात या संस्कारापासून होते. अन्न शिजवणे ही मनुष्यत्वाचं अतिवैशिष्ट्यपूर्ण लक्षण आहे. कारण मनुष्यप्राणीच त्याचं खाणं शिजवून खातो. त्यामुळे अन्नप्राशन संस्काराचं महत्त्व अधिकच स्पष्ट होतं. आईच्या दुधाव्यतिरिक्त अन्य काही द्रवरूप आणि नंतर घन आहार खाण्याचा हा शुभारंभ करण्याचा हा प्रसंग. यातूनच भविष्यकाळातील विविध आव्हाने सहजी स्वीकारण्यासाठी बाळाचा/ बाळीचा देह सिद्ध होणार आहे.

अन्नाला पाचही तत्त्वांचा अंश लाभलेला असतो. अन्न जागा व्यापतं तो आकाशतत्त्वाचा गुण आहे. त्याला स्पर्श करता येतो हा वायुतत्त्वाचा गुणधर्म आहे. त्यात उष्मांक असतात हे तेजतत्त्व आहे. अन्नात रस असतो हे जलतत्त्व असून त्याला असलेला गंध हे पृथ्वीतत्त्व आहे. त्यातून हे शरीर पोसलं जातं. घडत जातं. होणारी झीज भरून येते, रोगप्रतिकारकशक्ती निर्माण होते. त्यामुळे आजूबाजूला पसरलेल्या जीवाणू, विषाणू इतर संसर्गजन्य घटकांपासून संरक्षण मिळतं. अन्न खाल्ल्यामुळे 'सुखा'ची भावना जागृत होते. व्यवस्थित भूक लागणं आणि अन्न पचन होणं हे चांगल्या आरोग्याचं लक्षण आहे. शाकाहार हा तर खास भारतीय विचार आहे. योगशास्त्रात शरीराला अन्नमय कोश म्हणतात. शरीराचं माध्यम वापरूनच विविध प्रकारचा सुखोपभोग घेता येतो. वेगवेगळ्या व्याधी देखील शरीरालाच होतात. योगादी साधना, तपश्चर्या करून सिद्धी आणि परमज्ञान प्राप्त करता येतात. अन्नमय कोशावरच प्राणमय, मनोमय, विज्ञानमय आणि आनंदमय हे इतर चार कोश धारण केले जातात. अन्नाची महिमा गाताना 'अन्न हे पूर्णब्रह्म' असं म्हटलेलं आहे. केवळ भारतीय ऋषींनीच अन्नाविषयी एक विस्तृत चिंतन केलेलं आहे.




ऋतुकालोद्भव फळं, फुलं आणि धान्य खावं. शिजवलेलं अन्न हे सुपाच्य म्हणजे पचायला सोपं असतं. प्रत्येक व्यक्तीनं जन्मजात प्रकृतीनुसार अन्न घ्यावं हा दुसरा नियम. कोणता पदाथ कोणत्या पदार्थासह खावा किंवा खाऊ नये, या सगळ्यांचा परिचय हळूहळू बाळाला करून देण्याची ही सुरुवात आहे. त्यामुळेच पार्थिव अग्निदेवतेसह गणपती, मातृका आणि इष्टदेवतांशी संबंधित सर्व कर्मकांडीय विधी करून झाल्यानंतर बाळाला सहज पचतील अशा पदार्थांचं सेवन करवलं जातं. त्यात दही, मध, तूप किंवा सुगंधी तांदळाची खीर बाळी/बाळाला भरवली जाते. बाळाचं नाव ठेवायला मोठ्या आत्येचा मान असतो, तसंच अन्नप्राशन हा विधी सहसा मामाच्या मांडीवर आणि मामाच्याच हातून करवला जातो. अनेक ठिकाणी पित्याच्या हातूनही पहिला घास भरवण्याची पद्धत आढळून येते. याचा अर्थ अगदी स्पष्ट आहे. या बाळानं स्वतःच्या उपजीविकेचं साधन मिळेपर्यंत त्याचं भरणपोषण करण्याचं दायित्व पित्याचं आहे. काही विपरीत परिस्थिती निर्माण झाल्यास मामा त्याला जेवू, खाऊ घालेल. पूर्वीच्या काळी पित्याच्या अकाली निधनानंतर पोरकी मुलं मामाच्या घरीच लहानाची मोठी होत. माता-पित्याची जेवढी ऐपत असेल त्यानुसार सोन्याची अंगठी किंवा चांदीचा चमचा खिरीत बुडवून मामा भरवतो. त्यावेळी सर्वसाधारणपणे पुढील श्लोक म्हटला जातो- **'अन्नं ब्रह्मा रसो विष्णुः भोक्ता देवो महेश्वरः। एवं ज्ञात्वा तु यो भुङ्क्ते अन्नदोषो न लिप्यते ।।'** अन्न ब्रह्मदेव, त्यातला रस विष्णू आणि खाणारे शंकर आहेत हे जाणून जो खातो त्याला अन्नदोष लागत नाही. हा श्लोक यानंतर प्रत्येक भोजनाच्या आधी म्हणणं अपेक्षित आहे. यामागचं कारण म्हणजे खाण्यापिण्याच्या पदार्थात आणि कृतीत आपलं मन, भावना आणि वासना अडकू नयेत. कोणत्याही जिवंत प्राण्याला सर्वांत जास्त आसक्ती ही अन्नाविषयीची असते. त्यामागचं वैज्ञानिक सत्य म्हणजे आवडीच्या चवीचं खाद्य खाण्यामुळे मेंदूत डोपामाईन स्रवायला सुरुवात होते. हा एक महत्त्वाचा रासायनिक संदेशवाहक आहे. एखाद्या बाह्य कृतीमुळे हा स्राव मेंदूत स्रवू लागतो. त्यामुळे मेंदूला सुखाची जाणीव होते. उत्तेजना निर्माण होते. अन्नभक्षण की कृती हा स्राव स्रवायला कारण ठरतं. त्यामुळे सुखाचा उपभोग असो की दुःखशमन व्हावं म्हणून केलेला उपचार असो भोजन हाच मुख्य बिंदू असतो. परिणामी अन्न हा सर्वांच्याच आसक्तीचा विषय आहे.

इंद्रिय निग्रह करताना सर्वाधिक कठीण काम म्हणजे जिभेवर ताबा मिळवणं, असं ज्ञानेश्वर माउली स्पष्टच सांगतात. त्यातूनच हा अन्नदोष निर्माण होत असतो. अन्नाविषयी अलिप्त भावना निर्माण झाल्याखेरीज हा अन्नदोष जाणे नाही. त्यामुळे हा श्लोक महत्त्वाचा आहे.

**ब्रह्मार्पणं ब्रह्म हविर्ब्रह्माग्नौ ब्रह्मणा हुतम्। ब्रह्मैव तेन गन्तव्य ब्रह्मकर्मसमाधिना।।**४.२४ ।। (जे अर्पण केले जाते ते ब्रह्म आहे, जे अन्न (हवि) आहे तेही ब्रह्मच आहे. ब्रह्माग्नीत (जाठराग्नि) ब्रह्मद्वारेच अर्पण केले जात आहे. अशाप्रकारे ज्याची बुद्धी कर्म आणि समाधीमध्ये एकाग्र आहे, तो ब्रह्मस्वरूपातच विलीन होतो.) याशिवाय आणखी एक मंत्र भोजन सुरू करण्याआधी म्हटला जावा-

**ॐ अन्नपतेन्नस्य नो देह्यनमीवस्य शुष्मिणः। प्रदातारं तारिष ऊर्जं नो धेहि द्विपदे चतुष्पदे।। यजुर्वेद ११.८३।।** (हे अन्नदेवते, आम्हांला आजारी न पाडणारे आणि शक्तिशाली अन्न दे.


(पान ६ वर)

पर्यावरण

मिलिंद बेंडाळे

**हवामानबदल आता केवळ वैज्ञानिक चर्चेचा विषय राहिलेला नाही, तर एक दैनंदिन अनुभव बनला आहे. 'येल प्रोग्राम ऑन क्लायमेट चेंज कम्युनिकेशन' आणि 'क्लायमेट ओपिनियन मॅप्स' यांनी यासंदर्भात केलेल्या एका अभ्यासाचा अहवाल नुकताच प्रकाशित करण्यात आला. या अहवालातून देशातील ३४ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांतील एकूण ६३४ जिल्ह्यांमध्ये हवामान बदलाबद्दल लोकांचे अनुभव, भीती आणि समज यात मोठी तफावत असल्याचे दिसून आले.**

# आपण जात्यातून सुपात चाललोय?



हवामानबदल आता केवळ वैज्ञानिक चर्चेचा विषय राहिलेला नाही, तर एक दैनंदिन अनुभव बनला आहे. येल प्रोग्राम ऑन क्लायमेट चेंज कम्युनिकेशन आणि क्लायमेट ओपिनियन मॅप्सफ यांनी यासंदर्भात केलेल्या एका अभ्यासाचा अहवाल नुकताच प्रकाशित करण्यात आला. या अहवालातून देशातील ३४ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांतील एकूण ६३४ जिल्ह्यांमध्ये हवामान बदलाबद्दल लोकांचे अनुभव, भीती आणि समज यात मोठी तफावत असल्याचे दिसून आले. १.४ अब्जाहून अधिक लोकसंख्या असलेला भारत जगातील सर्वाधिक हवामान- संवेदनशील देशांपैकी एक आहे. हरितगृह वायू उत्सर्जकांमध्ये भारताचा तिसरा क्रमांक आहे. या अभ्यासानुसार, सर्वेक्षणामध्ये सहभागी झालेल्या बहुतेक लोकांना गेल्या बारा महिन्यांमध्ये कोणत्या ना कोणत्या प्रकारच्या गंभीर पर्यावरणीय समस्येचा सामना करावा लागला. या काळात ७१ टक्के लोकांना अतिउष्णतेचा सामना करावा लागला, तर कीटक आणि रोगांमुळे पिकांचे नुकसान झाले आणि ५९ टक्के लोकांचा वीजपुरवठा खंडित झाला.

दरम्यान ५३ टक्के लोकांना जलप्रदूषण, ५२ टक्के लोकांना दुष्काळ आणि पाण्याची कमतरता आणि ५१ टक्के लोकांना तीव्र वायू प्रदूषणाचा सामना करावा लागला. शिवाय, एक तृतीयांशपेक्षा जास्त लोकांना जोरदार वादळे, अन्नटंचाई, चक्रीवादळ आणि पूर यासारख्या आपत्तींचा सामना करावा लागला. राज्यनिहाय आकडेवारीवरून असे दिसून येते, की राजस्थान (८० टक्के), दिल्ली (७६ टक्के), उत्तर प्रदेश (७८ टक्के) आणि हरयाणा (८० टक्के) यासारख्या उत्तर भारतातील राज्यांमध्ये ७५ टक्क्यांहून अधिक लोकांनी तीव्र उष्णतेचा अनुभव घेतला. केरळ (५२ टक्के) आणि तामिळनाडू (५५ टक्के)मध्ये ही संख्या निम्मी आहे. या परिस्थितीमागील कारणांचा मागोवा घेऊन योग्य उपाययोजना करणे गरजेचे आहे.

गेल्या तीन दशकांमध्ये जगभरात हवामान आपत्तींमध्ये आठ लाख लोकांचा मृत्यू झाला. त्यात भारतातील ऐंशी हजाराहून अधिक लोकांचा समावेश आहे. तसेच, चक्रीवादळांच्या राष्ट्रीय सरासरीनुसार ३५ टक्के लोक प्रभावित झाले तर ओडिशामध्ये ६४ टक्के लोक प्रभावित झाले. ऑक्टोबर २०२४ मध्ये राज्यात आलेल्या डाना चक्रीवादळाने राज्याचे मोठे नुकसान केले. ओडिशाच्या दोन तृतीयांशहून अधिक लोकसंख्येने दुष्काळ आणि पाण्याची टंचाई अनुभवली, ही समस्या जवळजवळ दर वर्षी राज्याला प्रभावित करते. झारखंडमध्ये ६६ टक्के लोकांना दुष्काळ किंवा पाण्याची कमतरता जाणवली. याउलट, केरळ (३८ टक्के), तामिळनाडू (३४ टक्के), चंदीगड (२५ टक्के) आणि पंजाब (४० टक्के) यासारख्या राज्यांमध्ये ४० टक्के किंवा त्यापेक्षा कमी लोकांना पाण्याची कमतरता जाणवली. ओडिशामध्ये ८७ टक्के लोकांचा विश्वास आहे की जागतिक तापमानवाढ पिकांच्या कीटक आणि रोगांवर परिणाम करत आहे. त्याचप्रमाणे, महाराष्ट्र, राजस्थान, हिमाचल प्रदेश आणि आसाममध्ये ही आकडेवारी ऐंशी टक्क्यांहून अधिक आहे.

अभ्यासातून दिसून आले आहे की भारतातील लोकांना हवामानबदल आणि तीव्र हवामान घटनांमधील संबंधांची चांगली समज आहे. म्हणूनच देशातील ८१ टक्के लोकांचा विश्वास आहे की जागतिक तापमानवाढीमुळे वनस्पती आणि प्राण्यांच्या प्रजाती नष्ट होत आहेत. ७८ टक्के लोक यासाठी तीव्र उष्णता आणि शेतीतील कीटकांना कारणीभूत मानतात, तर ७७ टक्के लोक दुष्काळ आणि पाण्याच्या कमतरतेला, ७३ टक्के लोक चक्रीवादळाला आणि ७० टक्के लोक पूर आणि वादळाला कारणीभूत मानतात. शिवाय ६५ टक्के लोकांचा असा विश्वास आहे की वीजपुरवठा खंडित होणेदेखील हवामानबदलाशी जोडलेले आहे.

बदलत्या हवामानाबाबत भारताची असुरक्षितता सेंटर फॉर सायन्स ॲण्ड एन्व्हायर्नमेंटफ आणि डाऊन टू अर्थफ यांनी केलेल्या अलिकडच्या विश्लेषणातून समजू शकते. त्यात जानेवारी ते नोव्हेंबर २०२५ दरम्यान भारतात ९९ टक्क्यांहून अधिक दिवसांमध्ये तीव्र हवामान बदलाच्या घटना अनुभवाला आल्या, असे आढळून आले आहे. हे देशातील हवामान परिणामांची वाढती तीव्रता आणि सातत्य दर्शवते. भारतात २०२५ मध्ये तीव्र हवामान बदलामुळे ४,४१९ मृत्यू झाले. २०२४ मध्ये देशाला ३२२ दिवस कोणत्या ना कोणत्या प्रकारच्या तीव्र हवामानबदलाच्या आपत्तीचा सामना करावा लागला. म्हणजेच वर्षातील ९० टक्के काळ देश या आपत्तींशी झुंजत होता; परंतु आश्चर्याची गोष्ट म्हणजे, या आपत्तींचा अनुभव आणि हवामानबदलाशी त्यांचा संबंध समजून घेणे यात देशाच्या वेगवेगळ्या भागांमध्ये मोठी तफावत आढळते. महत्त्वाचे म्हणजे, अभ्यासात सहभागी होणारी मंडळी हवामानबदलाचा संबंध त्यांनी स्वतः न अनुभवलेल्या आपत्तींशीही जोडतात. तामिळनाडूमध्ये फक्त २१ टक्के लोकांनी तीव्र वादळ अनुभवले; परंतु ७४ टक्के लोक जागतिक तापमानवाढ हे या वादळामागील कारण असल्याचे मानतात. भारत अमेरिकेपेक्षा पूर्णपणे वेगळा आहे. येल विद्यापीठाच्या या अभ्यासानुसार, हवामान बदलाबाबत राजकीय ध्रुवीकरण अमेरिकेत स्पट दिसत असले, तरी भारतात असे नाही.

देशातील ९६ टक्के लोकांचा विश्वास आहे की जागतिक तापमान वाढत आहे आणि प्रत्येक जिल्ह्यात किमान ९० टक्के लोकांना असे वाटते. शिवाय, सर्वेक्षण केलेल्या ८१ टक्के भारतीयांचे म्हणणे आहे की त्यांनी हवामनबदलाचे परिणाम वैयक्तिकरीत्या अनुभवले आहेत, तर अमेरिकेत हे प्रमाण फक्त ४९ टक्के आहे. भारतातील सरासरी ८२ टक्के प्रौढांचा असा विश्वास आहे की वाढत्या तापमानामुळे त्यांचे आणि त्यांच्या कुटुंबांचे नुकसान होत आहे. दरम्यान, ९१ टक्के लोक वाढत्या तापमानाबद्दल चिंतित आहेत. ८९ टक्के लोकांचा असा विश्वास आहे की जागतिक तापमानवाढ भविष्यातील पिढ्यांना हानी पोहोचवू शकते. भारत आर्थिक विकासाच्या मार्गावर प्रगती करत असताना आणि हवामानाशी संबंधित आपत्तींशी सामना करण्याची तयारी करत असताना जीवाश्म इंधन, हवामानबदल आणि विषम हवामान यांच्यातील परस्परसंबंध लोकांना स्पष्टपणे सांगणे आवश्यक आहे. राज्य आणि जिल्हास्तरावर सार्वजनिक धारणा आणि अनुभव प्रतिबिंबित करणारे हे ओपिनियन मॅप्स हवामान अनुकूलन, शाश्वत विकास आणि मजबूत स्थानिक हवामान कृती योजनांच्या विकासाची माहिती देण्यास मदत करू शकतात. भारतात हवामान संकट आता केवळ दूरवरचा वैज्ञानिक इशारा राहिलेला नाही, तर सामान्य लोकांसाठी एक दैनंदिन वास्तव आहे.

अभ्यासातून दिसून आले आहे की, ९६ टक्के भारतीयांचा असा विश्वास आहे की जागतिक तापमानवाढ होत आहे आणि ८२ टक्के प्रौढांचा असा विश्वास आहे की वाढत्या तापमानामुळे कुटुंबांना नुकसान होत आहे. भारताची हवामान-प्रतिरोधक क्षमता आता केवळ विकासाचा उद्देश राहिलेली नाही, ती थेट विकसित भारत २०४७ या दृष्टिकोनाशी जोडलेली राष्ट्रीय गरज बनली आहे. आर्थिक वाढीचे इंजिन, ऊर्जा संक्रमणाची केंद्रे आणि कोट्यवधी लोकांचे निवासस्थान असलेली शहरे हवामान धोक्यामुळे भारताच्या दीर्घकालीन समृद्धीसाठी मोठे आव्हान ठरत आहेत.

(पान ६ वर)



## 'मी' ला ओळखून । वाग जगी ।।

नांव ठेवसी का । दुज्यांच्या कारणा ।।
तुझ्या तू मरणा । जाण आधी ।।२।।

दिसेना तुला रे । लोचनी कुसळ ।।
इतरांचे मुसळ । पाही कैसा? ।।२।।

देऊनी यातना । सुख ना लाभते ।।
अंतरी सलते । पाप कर्म ।।३।।

शब्द प्रेमभावे । सहज बोलावा ।।
मायेचा ओलावा । पुण्य कर्म ।।४।।

मुखाने हरिचे । गावे गुणगान ।।
'मी'ला ओळखून । वाग जगी ।।५।।

प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी
(वतनी) ९४०३०२९१७८



## शिवबा

झुंजार झुंजार पराक्रमी शूर
शिवबा हा वीर प्रगटला
जिजाऊ शहाजी कोंडदेव भला
यांनी घडविला छत्रपती
चांगल्यांचा वाली वांगल्यांचा काळ
शिवबाचा खेळ ठावे जना
मन माणसांचे असे जोखियले
भले भले झाले अचंबित
तुझी युद्धनीती सह्याद्रीचा घाट
मोगलांची वाट लाविली तू
दूरदृष्टी तुझी अमृताचा घडा
शिकविला धडा अफजला
मातीशी इमानस्वराज्य संहिता
हिंदवी अस्मिता जोपासली

डॉ. लक्ष्मण हिरूळकर

## गर्व...

करू नकोस गर्व तू सोडून जाणार सर्व तू..
वैरभावना सोड तू जाताना माणूस जोड तू...
माणुसकीला जाग तू माणूस म्हणून वाग तू ...
जाण जीवन मर्म तू कर नेकीने कर्म तू ...
खूप केले शत्रुत्व तू करून बघ मित्रत्व तू ...
प्रे दे अन् प्रे घे तू जीवन उंचीवर ने तू ...

दादाराव अवचार

कोणे एके काळी

स्वाती काळे (कोलारकर)




प्राचीन काळापासूनच राष्ट्ररक्षणासाठी असंख्य युद्धे लढली गेलीत. युगांतसमयी रक्ताचे पाट वाहिले. अहिंसा आणि शांतता ही राष्ट्राची परमोच्च मूल्ये आहेत हे जरी सयुक्तिक असले तरी शस्त्रे खाली टाकून दुष्ट शत्रूंना रान मोकळे करून देणे हा आपला धर्म कधीच नव्हता. आपल्या सर्व देवता सायुध आहेत. त्यांना आवाहन करताना सायुधं सशक्तिकं आवाहयामि असे मंत्रोच्चारण आपण करतो. धनुर्वेद हा आपला पवित्र वेद आहे. युद्धाला वेदाचे परिमाण आपल्या संस्कृतीत लाभले आहे. युद्धासाठी तरुणांनी सुसज्ज असले पाहिजे असा पुराणांचाही आग्रह आहे. कारण राष्ट्ररक्षण हे आपले आद्य कर्तव्य आहे.

युद्धामध्ये धारातीर्थी पडलेला योद्धा आणि संसारपाश सोडू शकणारा संन्यासी यांची योग्यता एकच आहे असे भारतीय तत्त्वज्ञान सांगते. आपली अशी प्राचीन सुसज्ज युद्धसंस्कृती ऋग्वेद कालापासून विकसित झाल्याचे दिसते. भारतीय संस्कृतीतल्या पहिल्या युद्धाबाबत म्हणजेच दाशराज्ञ युद्धाबद्दल ऋग्वेदामध्ये अर्थगर्भ ऋचा आहेत. या युद्धात सुदास राजाच्या विरुद्ध यक्षु, भृगु, आलिना, शिवा, यदु, पुरु, भलानस, तूर्वसा, वैकर्ण, अज, सिम्यु, दृह्यु, कवस अशी अनेक राज्ये एकवटली होती. या श्लोकांमधून राजा सुदास विरुद्ध दहा राजे असा जरी अर्थ निघत असला तरी दहा, शंभर असे आकडे पुराणग्रंथांमध्ये प्रतीकात्मक स्वरूपाचे असतात. सुदास राजाच्या विरुद्ध अनेक राजांनी दंड थोपटले होते हाच अर्थ यातून अभिप्रेत आहे. परुष्णी नदीच्या काठावर (सध्याची पाकिस्तानातली रावी नदी) झालेले हे पहिले घनघोर युद्ध प्राचीन भारतीय युद्धनीतीचे मापदंड उलगडून दाखवते. अश्वमेध यज्ञावेळेचे हे युद्ध दर्शविते की जर तुमच्या मागे देवशक्ती आणि समर्थ मंत्रशक्ती असतील तर तुम्ही युद्धात पराजित होऊ शकत नाही. दाशराज्ञ युद्ध खरोखरीच विश्वामित्र आणि वसिष्ठ ऋषींच्या मंत्रसामर्थ्याचे युद्ध होते.या युद्धातील आयुधे म्हणजे तपश्चर्येतून प्राप्त झालेल्या मंत्रशक्तीच होत्या. सुरुवातीला सुदास राजाचे गुरुवर्य असलेले विश्वामित्र या युद्धात त्याचे शत्रू म्हणून उभे ठाकले होते. पण सुदासला इंद्र आणि वरुणाने पाठबळ दिले आणि वसिष्ठ ऋषींच्या मंत्रसामर्थ्याने दाशराज्ञ युद्ध सुदास राजाने जिंकले. इंद्र हा जलतत्त्वाचा राजा आणि युद्धनिपुण देव असल्यामुळे परुष्णी नदीत त्याने कधी पाण्याचे प्रचंड प्रवाह सोडले तर कधी तिचे पात्र कोरडेठण्ण करून इतर राजांना मारले. दाशराज्ञे परियत्ताय विश्वतः सुदास इंद्रावरुणावशिक्षतम हे इंद्र आणि वरुण देवांनो, तुम्ही सुदासला मदत केली जो दाशराज्ञ युद्धामध्ये चारही बाजूंनी घेरला गेला होता.

ऋग्वेदातील अशा अनेक ऋचा सुदास राजाची लढाऊ वृत्ती, महत्त्वाकांक्षा आणि त्याचा धोरणी स्वभाव दर्शवितात. भारतीय रणनीतीचा पाया ऋग्वेद काळातील दाशराज्ञ युद्धात सुदास राजाने रचला अशी निश्चित खात्री आपल्याला ऋग्वेदातील या ऋचा वाचून होते. वेदोत्तर काळात राष्ट्ररक्षणाची जबाबदारी क्षत्रियांवर होती. त्यामुळे समाजाचा एक भाग राष्ट्रकर्तव्यासाठी कायम तयार असायचा. धर्मयुद्धाचे नियम काटेकोर होते.

रथींनी रथींशी, पायदळाने पायदळाशी युद्ध करण्याचे नियम होते. बेसावध अवस्थेत प्रहार करू नये, शरणागताला मरण देऊ नये, स्त्रियांचा उपयोग युद्धासाठी करू नये, रात्री युद्ध करू नये असे अनेक नियम रामायण, महाभारत काळात होते. सुरुवातीस उल्लेख केल्याप्रमाणे वेदकाळात मंत्रविद्या हे सर्वांत महान शस्त्र होते. वेदोत्तर काळात मुक्त, अमुक्त, मुक्तामुक्त आणि मंत्रमुक्त असे शस्त्रांचे चार प्रकार होते. अमुक्त शस्त्र म्हणजे तलवार, भाला जे हाती धरून लढले जाते. बाण किंवा हल्लीची बंदुकीची गोळी म्हणजे मुक्त शस्त्र. मंत्र उच्चारून परत न येणारे शस्त्र ते मंत्रमुक्त शस्त्र आणि मंत्र उच्चारून शस्त्र सोडल्यावर पुन्हा परत येऊ शकणारे शस्त्र ते मुक्तामुक्त शस्त्र. वेदोत्तर काळात साधारणपणे सम्राटपद, दुष्टांचा नाश, अपमानाचा सूड, कौटुंबिक कलह, वांशिक हेवेदावे यासाठी युद्ध झालेले दिसतात. कमी बळ असलेल्या राज्यकर्त्यावर नाहक आक्रमण करणे, दुसऱ्या राष्ट्राला परतंत्र करण्यासाठी युद्ध करणे, नैसर्गिक संपत्तीसाठी कलह करणे असे प्रकार वेदोत्तर काळात दिसत नाहीत जे आजच्या काळात दिसतात. सामान्य नागरिकांना युद्धाची झळ पोहोचू नये याची राज्यकर्ते काळजी घ्यायचे. महाभारताचे उद्योगपर्वातील सैन्यनिर्याण पर्व वाचण्यासारखे आहे. यात युधिष्ठिराने सेनापतीच्या अंगी कोणते गुण असावे याचे वर्णन केले आहे. सहज समजेल असा हा श्लोक आहे.

**सर्वे वेदविदः शूराः सर्वे सुचरितव्रताः न्हीमंतो नीतिमंतश्च सर्वे युद्धविशारदाः**

इश्वस्त्रकुशलाः सर्वे तथा सर्वास्त्रयोधिनः या श्लोकामध्ये सेनापतीच्या युद्धकौशल्याचे गुणवर्णन येते आणि पुढील काही श्लोकांमध्ये सेनापतीच्या शरीरसौष्ठवाचेही वर्णन आहे. योद्ध्याचे शरीर मजबूत असणे गरजेचे आहे कारण शत्रूकडून होणारा शरवर्षाव सहन करण्याची ताकदही योद्ध्यात आवश्यक असते. उत्तर वेदिक काळात गनिमी कावा अस्तित्वात नसला तरी एका वीराला जागच्या जागी गुंतवून ठेवणे, हूल देणे असे प्रकार आढळून येतात. एका प्रसंगात अश्वत्थामा दुर्योधनाला युद्धाच्या यशासाठी चार उपाय सांगतो. सैनिकांची राजाप्रति भक्ती, योग (साधन संपत्ती), दक्षता (चैतन्य), आणि नीती.

आजच्या काळातही त्यातील सर्व तत्त्वे लागू होतात. रामायणातीलही सर्वच योद्ध्ये शौर्यवान होते. शत्रूच्या मरणानंतर वैर संपते; मरणान्तानि वैराणि ही उदात्त शिकवण रामायणाने आपल्याला दिली जी आजतागायत भारतीय युद्धनीतीने स्वीकारली आहे. आपल्या याच प्राचीन पवित्र युद्धनीतीचे प्रकाशबिंब छत्रपती शिवाजी महाराजांवर पडले. ऋग्वेद काळात सुदास राजा ज्याप्रमाणे चारही बाजूंनी संकटांनी वेढला गेला होता त्याचप्रमाणे शिवाजी महाराजांचीही परिस्थिती होती. मराठी मुलखात लाचारीचे पीक फोफावले होते. खाती तुरुकांचे खरकटे असे संत एकनाथांनी वर्णन केले आहे. समर्थ म्हणतात, न्याय बुडाला! जहाली शिरजोरी! देहत्याग बरा वाटे! काय होणार? काहीच कळेना! इ. स. १६४५ साली रोहिडेश्वराला साक्षी ठेवून हिंदवी स्वराज्य स्थापनेची शपथ घेण्यात आली. राजनीतीला दैवी अधिष्ठान देण्यात आले. सुदासनेही वसिष्ठ ऋषींच्या जागृत दैवी मंत्रशक्तीच्या पाठबळाने दाशराज्ञ युद्ध जिंकले होते. शपथ घेतल्यानंतर छत्रपती शिवाजी महाराजांची मुलकी तयारी सुरू झाली. परकीय अमलाखाली असलेले किल्ले आणि नवीन किल्ल्यांसाठीच्या जागा शिवाजी महाराजांनी अचूक हेरून ठेवल्या. पुरंदर घेण्याच्या वेळेस त्यांच्यावर तीन अस्मानी संकटे आली होती. दादोजी कोंडदेव मृत्यू पावले होते, शहाजी महाराजांना विश्वासघाताने गिरफ्तार केले होते आणि विजापूर दरबारने महाराजांचा नायनाट करण्यासाठी फत्तेखान या कसलेल्या सेनापतीची नेमणूक केली होती. महाराजांच्या बिकट परिस्थितीचे वर्णन वाचून ऋग्वेदातील सुदास राजाच्या चहूबाजूंनी संकटांनी घेरल्याच्या ऋचेची तीव्र आठवण होते. प्राचीन काळात रथ, हत्ती, घोडे, पायदळ, कामगार, नौकारोही, गुप्तचर आणि गुरू ही सेनेची आठ अंगे समजली जायची. छत्रपती शिवाजी महाराजांचा काळ वेगळा होता पण त्यांची मूल्ये प्राचीन भारतीय युद्धनीतीतील मूल्यांशी समरस होती. महाराजांचे गुरू दादोजी कोंडदेव होते आणि त्यांचे हेरही आपल्या कामात निष्णात होते. फत्तेखानची चाहूल लागताच निष्णात हेरांच्या मदतीने त्यांनी पुरंदरची पाहणी केली. पुरंदर शत्रूच्या ताब्यात होता आणि अंमलाखाली असलेल्या जहागिरींच्या सीमेबाहेर होता. सीमेचे दोन प्रकार असतात. एक नकाशात दाखवलेली सीमा असते आणि दुसरी सीमा स्वसंरक्षणाच्या दृष्टीने किंवा विस्ताराचा हेतू मनात ठेवून सेनापतींनी मनात आखलेली सीमा असते. स्वराज्यामधील पुरंदरची सीमा छत्रपती शिवाजी महाराजांच्या मनातील होती. ऋग्वेदातील दाशराज्ञ युद्धात सुदास राजा परूष्णीच्या काठावर उभा होता. पण भेद राजाचा यमुनेपर्यंत पाठलाग करून त्याच्या मनातली सीमा त्याने अशी विस्तारली. प्रत्येक युद्ध पहिल्यांदा मानसिक पातळीवर खेळले जाते. धर्मराजाने नरो वा कुंजरो वा असे सांगून द्रोणाचार्यांचे मनोबल खच्ची केले होते. छत्रपती शिवाजी महाराजांनी देखील शत्रूला अगोदर जवळ येऊ दिले आणि नंतर पुरंदर किल्ल्यावरून बाण, मोठाले दगड, बिजापुरी तोफा आणि गोफण गुंड्यांचा वर्षाव करून फत्तेखानचे मनोबल खच्ची केले.

महाभारतात म्हटले आहे की जे सैनिक शरीराचा मोह सोडून लढतात त्यांचा चांगला सन्मान करावा. राजधर्मानुशासन पर्वात अंत्यज म्हणजे आदिवासी लोकांच्या निरपेक्ष लढाऊ वृत्तीची स्तुती केली आहे. शिवाजी महाराजांनी काटक मराठमोळे मावळे हृदयाच्या जवळ ठेवले होते. पुरंदरच्या पहिल्याच लढाईत वीरगती मिळालेल्या बाजी पासलकर यांच्या चिरंजीवाला सवाई बाजी ही पदवी आणि झेंडा वाचवणाऱ्या बाजी जेध्याला सर्जेराव ही पदवी देऊन महाराजांनी आपल्या प्राचीन युद्धनीतीचेच पालन केले.

(पान ६ वर)

साहित्य शिक्षण

किरण डोंगरदिवे
भ्र. ७५८८५६५५७६

# मंगेश पाडगावकर यांच्या कवितेतील सामान्यांचं




**मराठी भाषेतील एक अवलिया कवी म्हणजे मंगेश पाडगावकर. पाडगावकरांच्या अनेक कविता अजरामर झालेल्या आहेत. भावगीत प्रांतामध्ये मंगेश पाडगावकर कायमस्वरूपी लक्षात राहणारे गीतकार कवी म्हणून ओळखले जातात. मंगेश केशव पाडगांवकर यांचा जन्म १० मार्च १९२९ रोजी सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वेंगुर्ले या गावी झाला. वयाच्या चौदाव्या वर्षापासून काव्य लेखन करणारे पाडगावकर मुंबईमध्ये स्थिरावले. अरुण दाते आणि मंगेश पाडगावकर यांचे एकमेकांसोबत कोणत्या जन्माचे नाते होते, हे सांगणे खरच कठीण असले, तरी त्यांचे शब्द आणि स्वर या पूरक संबंधाने संपूर्ण महाराष्ट्राच्या घराघरात या जन्मावर या जगण्यावर, भातुकलीच्या खेळामधली, शुक्रतारा मंदवारा ही भावगीते पोहोचवली. या कवीने आपल्या कवीतेतून सामान्यांचे प्रेम व्यक्त केले आहे.**

नादमाधुर्य, लयबद्धता आणि संपन्न आशयघनता ह्या सुरेख मेळामधून पाडगावकर यांची गीते कविता कायम स्मरणात राहतात. अनेक वेळा भातुकलीच्या खेळामधली किंवा या जीवनावर या जगण्यावर अशा गीतांमुळे पाडगावकरांच्या वास्तवदर्शी कवितांवर विचारच होत नाही अस मला वाटतं. पाडगावकर खर्या अर्थाने जीवनातील व्यंग टिपणारे आणि यावर परखड भाष्य करणारे कवी होते. अशीच त्यांची व्यंगात्मक खेळकर खोडकर वाटणारी पण तितकीच वास्तववादी कविता म्हणजे तुमचं काय गेलं? ही कविता मंगेश पाडगावकर ह्यांच्या बोलगाणी ह्या संग्रहातील आहे खरे म्हणजे हा प्रश्न निरर्थक गोष्टी वर काथ्याकूट करत स्वतःचे जीवन एका प्रश्नचिन्ह समान करून ठेवणार्या महाभागांवर आहे. त्यातच प्रेमही संकल्पना असल्यामुळे कवितेची रंगत आणखी वाढत जाते.

आता ही कविता पाडगावकर ह्यांच्या मनात कशी जन्मली असेल त्याचा विचार माझ्या मनात आला. पाडगावकर ह्यांचा स्वभाव, त्यांचे व्यक्तित्व, त्यांची मिश्कील प्रवृत्ती ह्यातून त्यांची ही कविता अशी जन्मली असेल ह्यांचा शोध मी घेऊ लागलो, एकंदर ही कविता मनामध्ये फार मुरत जाऊन टप्प्याटप्प्याने घडली असावी असे मला वाटत नाही, एक साधा प्रसंग कवींनी पाहिला आणि लगेच त्यांच्या मनातील खोडकर आणि खेळकर कवीने तो शब्द बद्ध केला असावा असे ही कविता वाचतांना वाटते. तो तिला एकांतात बागेमध्ये भेटला, नको तितका अंगाशी जाऊन खेटला ह्या ओळीतून कदाचित मुंबईसारख्या शहरात बागेत किंवा एखाद्या कोपर्यात प्रणयराधन करणारे तरुण जोडपे कवीला दिसले असावे आणि गंमत म्हणून त्यावर लिहिता लिहिता कवींनी मानवी प्रवृत्तीवर नेमके बोट ठेवले. त्याने प्रेम केले किंवा तिने प्रेम केले, करु दे की! मला सांगा, तुमचं काय गेलं? अशी सुरुवात असलेल्या या कवितेतून कवीने तरुणाईवर सातत्याने होत आलेल्या प्रेमसुलभ आरोपाबद्दल भाष्य केले आहे. ते आपलं कोणीच नसतात, त्यांचा आपला यथार्थ आणि काहीही संबंध नसतो तरीही त्यांच्याबाबत सातत्याने कानगोष्टी आणि कुजबुज सुरूच असते. ज्या गोष्टी आपल्या आवाक्यात नाहीत, ज्याबद्दल आपण काही करू शकत नाही आणि महत्वाचे म्हणजे ज्या गोष्टींमुळे आपल्या जीवनात कोणताही फायदा किंवा तोटा नसतो त्याबद्दल आपण उगाच चर्चा का करतो? अश्या भावनेतून आपल्या कवितेची सुरुवात करत कवी सरळच विचारतात की त्यांचे म्हणजे त्या तरुण तरुणीचे तसे जे वागणे आहे. त्या वागण्यामुळे तुमचा माझ काही नुकसान आहे का? नाही ना? मग आपण का त्याबद्दल विचार करतो. कदाचित ते जे करत आहेत ते आपल्याला करायला मिळाले नाही ह्याबद्दल मनाच्या कोपऱ्यात असूया तर निर्माण झाली नाही ना? तसेही जगाला कामसूत्र आणि खजुराहोच्या संस्कृती मधून ज्ञान देणार्या भारतीयांच्या इच्छा आणि त्याचं मानसशास्त्र हे भारतीय संस्कृतीत दमन आणि अतृप्त ह्यांची साक्ष देणार आहे हे आपण नाकारत असलो तरी सत्य आहे. त्यातूनच कवींनी जो प्रसंग पाहिला असावा त्याबद्दल लिहीत ते आपल्या कवितेत म्हणतात,

**तो तिला एकांतात बागेमध्ये भेटला?**
**नको तितका जवळ जाऊन अंगाशी खेटला?**

लाल लाल गुलाबाचं फूल होऊन पेटला? भेटला तर भेटू दे की, पेटला तर पेटू दे की! तुमचं डोकं कशासाठी इतक गरम झाल? त्यानं प्रेम केलं किंवा तिनं प्रेम केलं, करु दे की! मला सांगा तुमचं काय गेलं? या कडव्यामध्ये पाडगावकरांनी बाग बगीचा उद्याने किंवा सिनेमा गृहात सातत्याने दिसणारे दृश्य त्यावर कुत्सित नजरा, कुचकट बोलणे असे काहीसे संमिश्र चित्र पहायला मिळते त्यावर भाष्य केले आहे. यामध्ये प्रेमाचे प्रतीक समजले जाणारे गुलाबाचे फुल त्यांनी अतिशय चपलखपणे वापरले आहे. या सर्व प्रकारामुळे कुणालाही डोकं गरमकरून घेण्याची गरज नाही असं सुद्धा त्यांनी स्पष्टपणे सांगितले आहे. त्याच वेळी हा प्रसंग मुंबईत रहिवासी असल्याने त्यांनी प्रत्यक्ष पाहिला की एखाद्या सिनेमात हा ही प्रश्न पडतो. की एखादेवेळी त्यांनी असे तरुण तरुणी चोरून लपून भेटताना पाहिले आणि मग नंतर एखाद्या सिमेनातील दृश्यामुळे त्यांची कविता पुढे सरकली ते नक्की सांगता येईल असे मला वाटत नाही. मात्र, अशावेळी क्षणभर पाडगावकर स्वैराचाराचे समर्थन तर करत नाहीत ना? असा प्रश्न निर्माण होतो. अर्थात मराठी साहित्यातील एक धाडसी कवी असल्याने ते तसे करू शकत होते पण ह्या पडलेल्या प्रश्नाचे उत्तर कविता जशी जशी पुढे सरकत जाते तसे तसे मिळत जाते. एकदा ती त्याच्यासाठी वेडीपिशी झाली? पाऊस होता तरी भिजत त्याच्या घरी गेली? घरात तेव्हां कोणीच नव्हतं म्हणून त्यांच फावल? त्याने तिला जवळ घेऊन चक्क दार लावलं? लावलं तर लावू दे की, फावलं तर फावू दे की! तुमच्या माझ्या पूर्वजांनी दुसरं काय केलं? त्याने प्रेमकेले किंवा तिने प्रेमकेले, करु दे की! मला सांगा, तुमचं काय गेलं? या कडव्या मधून कवीने बेधुंद तरुणाईची आणखी पुढची पायरी वर्णित केली आहे.

पावसाच्या ओढीतून एकांतात भेटणारे प्रेमी आणि त्याचवेळी आकर्षणातून निर्माण होणारे प्रेमसरते शेवटी शारीरिक ओढीकडे झुकतेच आणि येथेच तरुण पिढीचे चुकतंय असं सांगूनही तारुण्य सुलभ क्रिया आणि प्रतिक्रिया ह्या अशात असणार यात काही पाप नाही आणि असते तर शारीरिक ओढीतून सृष्टीची वाढ करणारे आपले सर्व पूर्वज सुद्धा पापी ठरतील? कारण त्यांनी यापेक्षा वेगळे काहीही केलेले नाही, असे सांगून त्यांच्या प्रेमाला नावे बोट ठेवण्याचा आपल्याला अधिकार नाही कारण त्यामुळे आपला काही फायदा नाही तसेच तोटाही नाही, असं कवी म्हणतात. मात्र आज अश्या चोरट्या संबंधातून जे सामाजिक प्रदूषण झाले आहे त्याचा विचार मात्र आपल्याला आज करावा लागणार आहे. पुरुष नामानिराला राहून स्त्रीला नको ते सोसावे आणि भोगावे लागते हे सुद्धा लक्षात घेण्यात गरज आहे. मात्र 'आमच्या वेळी नव्हती बाई अशी थेरं' असा टोमणा सकाळी उशिरा उठणाऱ्या नव विवाहित सुनेला मारणाऱ्या सासूने एकदा तरी स्वतःचे पूर्वायुष्यात डोकावून पाहावे.

जे दमन आपल्या पिढीच्या वाट्याला आले होते तेच इच्छा दमन नवीन पिढीने भोगलेच पाहिजे का? हाही विचार करावा. घरात जागा नसते त्यांचं चालणारच टॅक्सीत प्रकरण! ते थोडेच बसणार आहेत पाणिनीच घोकीत व्याकरण? गुलाबी थंडीचे परिणामहे होणारच! कुणीतरी कुणाला जवळ ओढून घेणारच! घेतलं तर घेऊ दे की, व्हायचं ते होऊ दे की! तुमच्या घरच बोचक त्यांनी उचलून थोडस नेलं? त्याने प्रेमकेलं किंवा तिने प्रेमकेले, करु दे की! मला सांगा तुमचं काय गेलं? या कडव्यामध्ये बाहेर सुरु असलेले सर्व प्रकरणे अनैतिकच असतात असे नव्हे तर कधी कधी काही वैयक्तिक समस्या मुळे सुद्धा मनाचा कोंडमारा होत असतो. तसेच जागेच्या समस्यामुळे मनातील भावनांचा कल्लोळ टॅक्सीमध्ये सुद्धा उघड होतो.

याबाबतीत पिया का घर या चित्रपटातील ये जीवन है इस जीवन का यही है रंग रूप या गाण्याची प्रकर्षाने आठवण येते. किंवा वपु काळे ह्यांची अशीच एका छोट्या घरात राहणाऱ्या दोन भावांच्या आणि त्यांच्या आई वडिलांच्या होणाऱ्या मानसिक कुचंबणा दर्शविणाऱ्या कथेची आठवण होते.

गुलाबी थंडीचे परिणामहोणारच या वाक्यामधून निसर्ग आपले कामकरत राहतो माणसाच्या नैसर्गिक भावना सुद्धा थांबू शकत नाहीत, हे वैज्ञानिक सत्य अध्यात्माच्या पुढे जाऊन मान्य करण्याचा सल्ला कवीने दिलेला आहे. त्यातही पाणिनीच्या व्याकरणाची संकल्पना मला फार आवडली, आपल्याशी काहीही अर्थ नसलेल्या गोष्टीचा आपण किती विचार करतो ह्याचे ते उदाहरण आहे. जसे वधू पाहण्यास गेलेले लोक तिला विणकामयेत का? गाणं येत का? नृत्याची आवड आहे का? असे प्रश्न विचारतात.. पुढे किती लोक तिला गाणं म्हणायला लावतात. तिचं नृत्य पाहतात... अर्थात कालांतराने ते स्वतःच तिच्या इशाऱ्यावर नाचतात तो भाग वेगळा, पण मी स्वतः माझ्या लग्नाच्या वेळी माझ्या पत्नीला तुला गणिताची आवड आहे का? आणि तुला इतिहासातील कोणता महापुरुष आवडतो असे प्रश्न का विचारले होते, हे मला स्वतःला अजूनही कळलेले नाही. कारण तिने गणित आवडते आणि इतिहासात...हे फार आवडतात असं सांगितले होते. मात्र २० वर्षाच्या संसारात तिने कधीही त्या इतिहास पुरुषाचा विषय काढला नाही आणि मीही त्याबद्दल तिला एकही शब्द विचारला नाही. संसार हा भावनिक।आणि शारीरिक पातळीवरील करार असतो हे समजून घेतले की, पाणिनीचे व्याकरण ह्यावर कोणी वधू परीक्षेत तरी प्रश्न विचारणार नाही असे वाटते.

कानटोपी घातलीत म्हणून फुलं काय बोलणार नाहीत? तुमच्या रुद्राक्षांना भिऊन पाखरं काय झुलणार नाहीत? फुलली तर फुलू दे की, झुलली तर झुलू दे की! खिडकीतून फुकट सगळं बघता तर आलं? त्याने प्रेमकेलं किंवा तिने प्रेमकेलं, करू दे की मला सांगा, तुमचं काय गेलं? या कडव्यामधून आपण सज्जनतेचा आव आणला, भावनांचा कल्लोळ अव्यक्त ठेवला याचा अर्थ बाकीचे लोक तसे वागतील असे नाही, ज्याप्रमाणे फुले आपलं फुलण्याचा कामकरतात त्याचप्रमाणे लोक आपल्या भावना व्यक्त करण्याचे कामकरणार. रुद्राक्ष घातले म्हणजे एखादेवेळी भीती नष्ट होईल, पण त्यामुळे आनंदाने झुलणारे पाखरं आपलं झुलण थांबवणार नाहीत. आपण या गोष्टीमुळे कासावीस न होता फुलणाऱ्या फुलाला फुलू द्यावे, झुलणार्या पाखरांना झुलू द्यावे कारण आपले निर्बंध त्यांच्यावर लागू होत नाहीत. थंडी वाजते मग घाला स्वेटर, पाऊस आला की काढा छत्री इतकं टिपिकल जगल्यापेक्षा एखादेवेळी पावसात चिंब भिजत (पान ६ वर)

पान १ वरून

## वादे वादे जायते तत्त्वबोधः

त्यातूनच सत्याची, तत्त्वाची खरी जाणीव होते. भारतीय परंपरेत वाद म्हणजे भांडण नव्हे, तर सत्याच्या शोधासाठी प्रश्न विचारणे, मतभेद मांडणे, तर्क लावणे अशी ही प्रक्रिया आहे. यातून तत्त्वबोध आकाराला येतो. व्यक्ती असो, कुटुंब असो, संस्था असो, समाज असो किंवा देश; जिथे मुक्तपणे, सुसंस्कृतपणे तर्काधिष्ठित संवाद होतो, तिथेच समाज पुढे जातो. जिथे या प्रक्रिया दुर्लक्षित केल्या जातात, तिथेच विचार मरून जातात. स्वतःच्याच विचारांना अंतिमसत्य घोषित करणाऱ्या माध्यमांच्या बजबजपुरीत हा संवाद मोलाचा ठरला.

माध्यमांना त्यात सरसंघचालकांनी साधलेल्या संवादापेक्षा सलमान खानची उपस्थिती बातमीमूल्य असलेली घटना वाटली, यातच सगळे आले. सरसंघचालकांनी माध्यमांचे वर्णन करत असतानाच, आज माध्यमे जे काही वृत्तांकन करतात, त्यापेक्षा किमान ४० टक्के समाजात काही चांगले घडत असते, असे सांगितले.

आपल्या दुसऱ्या सत्रात सरसंघचालकांनी जे सांगितले, तोच या संवादाचा खरा 'टेक-अवे' मानावा लागेल. समाजाची, देशाची चिंता करीत असताना 'पंचपरिवर्तना'चे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले. वीज वाचवण्यापासून ते कुटुंबात बसून 'आपण कोण आहोत' याचा कुटुंब म्हणून शोध घेण्यापर्यंत अनेक विषयांतील त्यांचे मार्गदर्शन सर्वस्वी उद्बोधक होते. दोन दिवस नेहरू सेंटरचे देखणे सभागृह कार्यक्रमसंपून राष्ट्रगीत होईपर्यंत खचून भरलेले राहणे, हा एक निराळाच संकेत आहे. संवादाच्या या प्रक्रियेमुळे शंभरीच्या घरात आलेला संघ समजून घ्यायला सर्वसामान्य नागरिकांना उपयोग होईल, यात शंका नाही!

## अर्थवृद्धीच्या देशा...

विशेष म्हणजे, सेवा क्षेत्रातील ही वाढ केवळ महानगरांपुरती मर्यादित राहिलेली नाही; ती 'टियर-२' आणि 'टियर-३' शहरांपर्यंत पोहोचू लागली आहे. यामुळे रोजगारनिर्मितीचे केंद्र अधिक व्यापक होत असून, आर्थिक समावेशकतेला चालना मिळते आहे.

उद्योग आणि उत्पादन क्षेत्राबाबतही चित्र बदलत आहे. 'मेक इन इंडिया' ही केवळ घोषणा राहिलेली नाही, तर ती उत्पादन, गुंतवणूक आणि निर्यातीच्या आकड्यांतून दिसून येते. इलेक्ट्रॉनिक्स, संरक्षण, औषधनिर्मिती, वाहन उद्योग आणि नवीकरणीय ऊर्जा या क्षेत्रांमध्ये भारताने स्वतःची जागा निर्माण केली आहे. जागतिक पुरवठा साखळीत चीनवरील अवलंबित्व कमी करण्याचा प्रयत्न सुरू असताना, भारत हा पर्यायी केंद्र म्हणून पुढे येतो आहे. ही संधी भारताने धोरणात्मक शहाणपणाने साधल्याचे दिसते. या सगळ्या वाढीला मजबूत आधार देणारा घटक म्हणजे, भारताचे बँकिंग आणि वित्तीय क्षेत्र. काही वर्षांपूव बुडीत कर्जांनी ग्रासलेली बँकिंग व्यवस्था आज तुलनेने मजबूत स्थितीत आहे. भांडवली पर्याप्तता, कमी झालेले थकीत कर्जाचे प्रमाण आणि सुधारलेली जोखीमव्यवस्थापन पद्धती, यामुळे बँकिंग क्षेत्र स्थिर दिसते. उद्योगांना, लघुउद्योगांना आणि वैयक्तिक कर्जदारांना भांडवल उपलब्ध करून देण्याची क्षमता बँकांकडे आहे आणि हाच घटक आर्थिक-वाढीला सातत्य देतो आहे. महत्त्वाची बाब म्हणजे, भारताने आर्थिक शिस्त पूर्णपणे गमावलेली नाही. एकीकडे विकासासाठी खर्च वाढवला जात असताना, दुसरीकडे महागाई नियंत्रणात ठेवण्याचा प्रयत्न सुरू आहे. चलनविषयक धोरण आणि वित्तीय धोरण यांमधील समन्वयामुळे अर्थव्यवस्थेत फार मोठे असंतुलन निर्माण झालेले नाही. महागाईचा दर हळूहळू नियंत्रणात येत असताना वाढीचा वेग टिकवून ठेवणे, हे सोपे कामनाही; पण भारताने ते साध्य केले आहे.

जागतिक पातळीवर पाहिले तर अमेरिका, युरोप आणि जपानसारख्या अर्थव्यवस्थांमध्ये वाढीचा वेग मंदावलेला आहे. चीनची अर्थव्यवस्था अंतर्गत अडचणींमुळे अपेक्षेइतकी वेगवान राहिलेली नाही. अशा स्थितीत भारताची साडेसहा टक्क्यांहून अधिक वाढ ही केवळ तुलनात्मकदृष्ट्या नव्हे, तर वास्तवातही उल्लेखनीय ठरते. जागतिक गुंतवणूकदारांच्या दृष्टीने भारत हा 'ग्रोथ स्टोरी' म्हणून अधिक विश्वासार्ह ठरतो आहे. तथापि, हे चित्र संपूर्णपणे आशादायी आहे, असे म्हणता येणार नाही. काही आव्हाने स्पष्टपणे दिसत आहेत. लघू आणि मध्यमउद्योगांवरील कर्जाचा ताण, काही क्षेत्रांतील रोजगारनिर्मितीचा मर्यादित वेग, शेतीतील हवामानावरचे अवलंबित्व आणि जागतिक व्यापारातील अनिश्चितता ही आव्हाने कायमआहेत. याशिवाय, आर्थिक-वाढ आणि पर्यावरणीय शाश्वतता यांच्यात संतुलन राखण्याचे मोठे आव्हान भारतासमोर उभे आहे. वेगवान औद्योगिकीकरण करताना पर्यावरणीय नुकसान टाळणे, ही पुढील दशकातील कसोटी ठरेल. तरीही, एक गोष्ट निर्विवादपणे खरी आहे आणि ती म्हणजे, भारताची अर्थव्यवस्था आज प्रतिक्रियाशील राहिलेली नाही; ती पूर्वनियोजित, धोरणात्मक आणि आत्मविश्वासपूर्ण झाली आहे. जागतिक घडामोडींना केवळ प्रतिसाद देण्याऐवजी भारत स्वतःची दिशा ठरवत आहे. हीच बाब भारताला इतर उदयोन्मुख अर्थव्यवस्थांपेक्षा वेगळी ठरवते.

२०४७ पर्यंत 'विकसित भारता'चे स्वप्न अनेकांना अतिशयोक्त वाटत असले, तरी आजचे आर्थिक संकेत त्या दिशेने आशादायक आहेत. सातत्याने साडेसहा-सात टक्क्यांच्या आसपास वाढ राखणे, रोजगारनिर्मितीचा वेग वाढवणे आणि सामाजिक समावेशकता साधणे, या तीन गोष्टी जर साध्य झाल्या, तर भारताची जागतिक आर्थिक भूमिका पूर्णपणे बदललेली असेल. भारताची वाढ ही आता अपघाती राहिलेली नाही, तर ती धोरणात्मक आहे. हा वेग टिकवण्यासाठी रोजगारनिर्मिती आणि सर्वसमावेशक विकास हाच पुढचा कस आहे. त्या कसोटीवर यश मिळाले; तर भारत निव्वळ वेगवान नव्हे, तर निर्णायक आर्थिकशक्ती म्हणून जागतिक पटलावर उदयास येईल.

पान २ वरून

## बिनकामाचा डबा

त्या दिवशी दुपारी सासरेबुवा सासूबाईंना घेऊन नाटक बघायला गेले. त्यानंतर एका मित्राकडे जायचे त्यांनी ठरविले. दुपारी त्या सर्व सामानाची विल्हेवाट लावून टाकावी अशी सूचना त्यांनी सूनबाईंना केली. सायंकाळी ते दोघे घरी परतले तेव्हा जवळपास सारे जुने सामान गेलेले होते, परंतु तो मोठा ओबडधोबड असलेला पितळेचा डबा मात्र हॉलमध्ये छान कोपऱ्यात मांडून ठेवला होता आणि त्याच्या भोवती मस्त सजावट केलेली होती. नातवंडे ओरडत आली, आजी, तुझा डबा आता इथे हॉलमध्ये ठेवला आहे आणि तो इथेच राहणार. सासूबाईंना आश्चर्य वाटले आणि फार आनंद देखील झाला. त्यांनी सूचकपणे सासरेबुवांकडे बघितले आणि नजरेनेच विचारले, सांगितलेच का? पण मनापासून आनंद झाला व सुनेचे केवळ हात हातात धरून पाणावलेल्या डोळ्यांनी त्यांनी आशीर्वाद दिले. त्या पोरीच्याही डोळ्यात अश्रू दाटून आले. किती मोठी चूक ती करणार होती हे तिला जाणवले. त्या क्षणी सासरेबुवांचे शब्द तिला आठवले. ते म्हणाले होते, सूनबाई, बेटा, तू सारे सामान काढून टाक. तुझ्या सासूला मी समजावीन. फक्त मी तुला या बिनकामाच्या पितळेच्या डब्याची गोष्ट सांगतो. तुझा नवरा जेव्हा जन्मला त्यावेळी आमची परिस्थिती अतिशय बेताची होती. मला फारच कमी पगार होता. जन्मताच तुझ्या नवऱ्याला कावीळ झाली होती. त्यावेळी काही सोय नव्हती परंतु मुंबईहून एक इंजेक्शन मागवले तर काही होऊ शकणार होते. परंतु त्या इंजेक्शनची किंमत खूप जास्त होती. पोराच्या जिवाचा प्रश्न होता. स्वाभिमानाने जगायचे होते. त्यामुळे कुणाकडे हात पसरायचे नाही असे ठरले होते. त्यावेळी तुझ्या सासूच्या आग्रहाखातर हा तिच्या अत्यंत आवडीचा पितळेचा डबा, जो तिने माहेरहून साड्यांच्या ऐवजी घेतला होता तो मी गहाण ठेवला व पैसे मिळवून इंजेक्शन बोलाविले. ज्यामुळे तुझ्या नवऱ्याचे प्राण वाचले. नंतर मी तो डबा सोडवून आणला. पोरी, या डब्यात तुझ्या सासूचे प्राण नाहीत तर या डब्यामुळे तुझ्या नवऱ्याचे प्राण आहेत. असा आहे हा बिनकामाचा डबा!

ललित

डॉ. भाग्यश्री देशपांडे

## प्राक्तन

सायली वरवर खूप खूश आणि सुखी होती. इतरांना तर तिच्या सुखाचा अक्षरशः हेवा वाटायचा, तिच्यासारखी सुखी तीच असेल असे वाटायचे. तिचे पती मकरंद तिची खूप काळजी घ्यायचे. तिला जराही दुःख नव्हते. वरवर सगळे काही आलबेल होते, परंतु हे मिळविण्याकरिता तिला खूप काही गमवावे लागले होते. स्वतःचा संपूर्ण स्वभाव तिला बदलावा लागला होता, मन मारून टाकावे लागले होते. एखादी गोष्ट अजिबात पटली नाही तरीही हसून साजरे करावे लागत होते. सर्वकाही गुडीगुडी दाखवावे लागत होते. मुखवटा घालून जगावे लागत होते. सायली एक नोकरदार महिला होती.

नोकरी म्हटली म्हणजे काही ना काही राजकारण असतेच. काही गोष्टी नाही पटल्या तरी सोडून द्याव्या लागतात. मोजून-मापून- तोलून बोलावे लागते. बॉसचे टोमणे झेलावे लागतात. एकवेळ पुरुष बॉस परवडले. परंतु विक्षिप्त, विचित्र, खुनशी, वाह्यात स्वभावाची महिला बॉस नशिबात असल्यास परिस्थिती बिकट होते. सायलीला सध्या कार्यालयात खूप त्रास होता. महिला बॉस अक्षरशः तिचा छळ करीत होत्या. परंतु तिला पतीसोबत ते 'शेअर' करणे शक्य नव्हते. कारण हा तिचा दुसरा संसार होता. कसेही करून तो टिकवायलाच हवा होता. तिची घुसमट कधीच संपणार नव्हती. पतीला कायम ती खूश दिसायला हवी होती. तिच्या मनाशी त्याला काहीच देणे-घेणे नव्हते. तिचे पहिले लग्न राघवसोबत झाले होते. ते एक सरकारी अधिकारी होते. त्यांना एक मुलगीदेखील होती. ती सध्या आजोळी राहत होती. राघवसोबत संसार करताना सायली काहीही आडपडदा न ठेवता पतीसोबत वागायची. सगळे काही 'शेअर' करायची. तिची अशी धारणा होती की, बाहेर जरी 'गुडीगुडी' वागले तरीही घरात तसे वागण्याची गरज नाही. जसा मूळ स्वभाव असेल तसे प्रामाणिकपणाने वागावे- जगावे. परंतु त्याचा अर्थ राघवने असा काढला की, तुला सगळेच वाईट दिसतात. तिला नाटकी वागता येत नव्हते; ही तिची चूक होती. सगळ्याच गोष्टी पतीला खऱ्या सांगण्याची आवश्यकता नाही. काही गोष्टी आपल्यापुरत्याच मर्यादित ठेवाव्या लागतात, ही कला तिला अवगत नव्हती. ती तिची चूक होती. पतीच्या नजरेत ती एक रडकी, किरकिरी बाई होती. तिला एक- एक प्रसंग आठवत होते. ती गरोदर असताना तिच्याकडून काम होत नव्हते. ती पूर्ण स्वयंपाक करू शकत नव्हती.

राघवची सतत चिडचिड चालायची. एक दिवस डॉक्टरांनी तिला एक जड गोळी घ्यायला दिली होती. म्हणून खूप कष्टाने तिने पूर्ण स्वयंपाक केला. राघवने त्यावर विचारणा केल्यानंतर तिने खरे उत्तर दिले. ते ऐकून राघवचे माथेच भडकले. आधीच त्याला स्वयंपाकाकरिता बाई लावणे चालत नव्हते. तिने 'तुमच्याकरिता पूर्ण स्वयंपाक केला आहे' असे उत्तर दिले असते तर प्रसंग निभला असता. तिची मात्र घुसमट झाली असती. घरात देखीव मुखवटा घालूनच जगायचे का? सायली मनाने मिटून गेली. मुलीचा जन्म झाल्यानंतरही परिस्थिती बदलली नाही की सुधारली नाही. उलट बिघडतच गेली. दुसरा प्रसंग तिच्या नणंदेच्या संदर्भातला होता. नणंद अल्पशिक्षित असूनही प्रत्येक वेळेला सायलीने तिचे मार्गदर्शन घेतलेच पाहिजे, हा राघवचा हुकूम होता. नणंदेचे हे तिसरे लग्न होते. एकदा तिच्या तोंडून निघून गेले की, 'मी तिसऱ्या संसाराचे मार्गदर्शन घ्यायचे का?' राघवने त्याक्षणी सायलीच्या गालावर जोरदार थप्पड मारली. हा आघात इतका जबरदस्त होता की, तिचे चार दात तुटले. त्या वेदनेपेक्षा जास्त वेदना ही होती की, राघव 'सॉरी' म्हणायलाही तयार नव्हता. त्यानंतर त्यांच्यातले अंतर वाढतच गेले. आता तर नणंदेला जास्तच मोकळीक मिळाली होती. ती आणि राघव मिळून सायलीला भयानक त्रास द्यायचे. प्रसंगी मारहाणदेखील करायचे. सायलीला सर्व असह्य होत चालले होते. अखेर तिच्या आई-वडिलांनीच तिला घटस्फोट घेण्याकरिता मार्गदर्शन केले. अखेर राघवसायलीचा घटस्फोट झाला. त्याकरिताही राघवने खूप त्रास दिला. वृद्ध आई- वडिलांकडून सायलीचे एकटे राहणे बघवत नव्हते म्हणून तिने नाईलाजाने दुसरे लग्न केले. नातीची जबाबदारी सायलीच्या आई-वडिलांनी घेतली. दुसरे पती मकरंद हे तसे चांगले होते. परंतु त्यांना ती सतत-कायम हसतमुख, खेळकर आणि गोड बोलणारी हवी असायची. तिने तोंड मिटून घेतले. भावना शिवून टाकल्या. तिची घुसमट पुन्हा तशीच सुरू राहिली. हेच स्त्रीचे प्राक्तन असते का? तिचे मन आक्रंदत होते. परंतु आता काहीच इलाज नव्हता. दुसरा संसार टिकवायलाच हवा होता. तिने चेहरा धुवून माफक मेकअप केला आणि मकरंदच्या स्वागताकरिता सज्ज झाली. परंतु मकरंदचे तिच्याकडे लक्षच नव्हते. ते आपल्याच तंद्रीत होते. आजकाल हे असेच दिसून येत होते. सायलीने पाठपुरावा केल्यावर सत्य समोर आले आणि तिच्या पायाखालची जमीनच सरकली. मकरंदचे त्याच्या सेक्रेटरीसोबत अफेअर सुरू होते. त्याला हटकले असता त्याने शांतपणे उत्तर दिले. ''तू निराश होऊ नको. ती फक्त माझ्याकरिता एक विरंगुळा आहे.

(पान ६ वर)

संत

प्रकाश एदलाबादकर

आपण व्यवहाराच्या वाटेवरून जाणारी सामान्य प्रापंचिक माणसे आहोत. अनेक सुख- दुःखांचा; प्रामुख्याने जास्त करून दुःखांचाच अनुभव घेत आपण जगत असतो. समाजात वावरताना मनात अनेक शल्ये दाबून वावरावे लागते. आपल्या दुःखाचे प्रदर्शन सहसा कुणी जाहीरपणे करीत नसतो. त्या दुःखावर योग्य उपाय सांगून आपल्याला मदत करण्यापेक्षा लोक, आपल्या दुःखाचा बाजार मांडतील अशीच भीती प्रत्येकाच्या मनात असते. सध्याचे वर्तमान तसेच आहे. कुणावर विश्वास ठेवावा आणि कुणावर ठेवू नये हे कळेनासेच झालेले आहे. ज्याच्या खांद्यावर विश्वासाने मान टाकावी तोच, आपल्या मानेवर सुरी फिरवतो.

श्रद्धेने ज्या पायांवर मस्तक टेकवावे, तेच पाय आपल्याला केव्हा लाथाडतील याचा भरवसा राहिलेला नाही. समाजात वावरणारा प्रत्येक जण मुखवटा लावूनच वावरत असल्याचा अनुभव येतो. आमची आजी म्हणायची, ''देणे आणि दुखणे नेहमी गावच्या चव्हाट्यावर मांडावे. कोण कसा उपाय सांगेल, सांगता येत नाही.'' परंतु आजीचा काळ वेगळा होता. ती माणसे वेगळी होती. त्यांचे विचार, त्यांचे जग आजच्यासारखे स्वकेंद्रित नव्हते. मुख्य म्हणजे आपली देणी आणि दुखणी सांगायला गावाला चव्हाटा होता. आज तर इंग्रजाळलेल्या पालक-बालकांना 'चव्हाटा' या शब्दाचा इतिहास आणि अर्थच ठावूक आहे की नाही ही शंका येते. आपल्या घरातील टीव्हीचा डब्बा हाच आजचा चव्हाटा झाला आहे. त्या आभासी दुनियेच्या माध्यमातून आपल्याला सुखाचा खरा मार्ग सापडेल या भाबड्या आशेने आपण जगत आहोत. दुःखांचा आणि समस्यांचा निरास असा आभासी जगाकडून प्राप्त होत नसतो. महाभारताच्या शेवटी महर्षी व्यास म्हणाले होते... **ऊर्ध्वबाहुर्वीरोमेष्य नचकश्चित शृणोती माम। धर्मादर्थश्चकामश्च स किं न सेव्यते? ।।** अर्थ आणि काम या पुरुषार्थांची प्राप्ती हवी आहे ना? मग धर्माच्या मार्गाने चला.

धर्माच्या मार्गाने समाज आज कितीसा जातोय? येथे धर्म याचा अर्थ पूजापाठ, सोवळे- ओवळे, कर्मकांड मुळीच नाही. माझा धर्म म्हणजे माझ्या वाट्याला आलेले ईश्वरदत्त कर्म, हा अर्थ आहे! महर्षी व्यासांनाही तोच अपेक्षित असावा. संपूर्ण समाज अधर्माच्या मार्गानेच जात आहे असे मुळीच नाही. समाजातील काही व्यक्ती धर्माचा मार्ग अनुसरणारी आहेतच, रुक्ष वाळवंटात एखादे ओॲसिस असावे तसे. परंतु अन्यांचे काय? त्यांची दुःखे दूर काऱण्यासाठी, व्यवहाराच्या धबडग्यात त्यांना मन:शांती मिळावी यासाठीच त्या- त्या वेळेच्या चिंतकांनी समाजाला मार्ग दाखवला. अध्यात्मासोबतच व्यवहारही सांगितला. आध्यात्मिक उन्नयन तर हवेच परंतु त्यासोबत व्यावहारिक आणि ऐहिक उन्नयनही गरजेचे आहे, हे सांगणारे संतही होऊन गेले.

ऐहिकाकडे दुर्लक्ष करून आध्यात्मिक उन्नती साधता येणार नाही असे गर्जून सांगणारे समर्थ रामदास होते. '**आधी प्रपंच करावा नेटका, मग घ्यावे परमार्थ घटका**' या समर्थ वचनाचा अर्थ नीट समजून घेतला पाहिजे. संतप्रवर ज्ञानदेव, कीर्तनप्रभू संत नामदेव, शांतिब्रह्म संत एकनाथ, समाजशील संत तुकोबाराय आणि ऐहिकतेचा पुरस्कार करणारे समर्थ रामदास या संतपंचकाने महाराष्ट्राच्या मातीचे आध्यात्मिक, वैचारिक आणि सांस्कृतिक भरणपोषण केले. त्यांच्या- त्यांच्या काळात याप्रत्येक सत्पुरुषाची एक प्रभावळ निर्माण झाली. त्याही मंडळींनी आपापल्या परीने आपली करणी-वाणी-लेखणी यांचा उपयोग करून समाजमन घडविण्यात आयुष्य खर्ची घातले. या परंपरेचा वेध घेतला तर ही परंपरा उणी- अधिक नऊशे ते हजार वर्षांची आहे.

'**टाळी वाजवावी। गुढी उभारावी। वाट ते चालावी। पंढरीची**' हे साधे आणि सोपे सूत्र आचरणात आणून या परंपरेने भक्तीचा मळा फुलविला. त्यायोगे त्यांनीही सामान्य माणासाच्या प्रापंचिक दुःखांचा निरास करण्याचा प्रयत्न केला. अध्यात्माच्या क्षेत्रात या संत पंचकाचे स्थान अनन्यसाधारण आहे, यात शंकाच नाही. संस्कृतात कोंडलेले जीवनविषयक तत्त्वज्ञान सर्वसामान्य जनतेसाठी मायभाषेतून निरूपित करून ज्ञानदेवांनी संपूर्ण समाजाला आध्यात्मिक आधार दिला. त्यांना दिलासा दिला.

# मृत्युंजयाय रुद्राय नीलकंठाय शंभवे...





नामदेव आणि नाथांनी या परंपरेला वर्धिष्णू केले. अठरापगड जातींचा समाज एका ध्वजाखाली आणला. भागवत संप्रदाय हा मराठी मातीचा अभिमानाचा विषय झाला. त्यांनी भक्तीचे साधन वापरून समाजातील विषमता नष्ट केली. संत तुकोबारायांनी तर दुर्लक्षित समाजाचे दुःख पुढे आणले. विद्रोह करून समाजातील पाखंडांचा समाचार घेतला. 'चिंता करितो विश्वाची' असे म्हणणारे समर्थही याहून वेगळे नाहीत. परंतु त्यांनी केलेल्या बारा वर्षांच्या तीर्थाटनानंतर मात्र त्याच्या वैचारिकतेने वेगळे वळण घेतले. 'उठा आणि काहीतरी उत्कृष्ट कार्य करून कीर्तिरूप व्हा' असे आवाहन समर्थांनी समाजाला केले. त्यातही त्यांनी परमेश्वराचे विस्मरण न होऊ देण्याचे आवाहन केले.

मुक्ती हेच समर्थांच्या दृष्टीने आयुष्यचे अंतिम ध्येय आहे. परंतु अशी मुक्ती म्हणजे दुःखाचा अंत आहे, असे म्हणणे चूक आहे. मुक्ती म्हणजे संसारापासून पलायन नव्हे, परंतु संसारात राहूनही स्वानंद प्राप्त करून घेणे होय. समर्थांचा हा विचार म्हणजे निष्काम कर्मयोगाचेच अनुसरण आहे. समर्थ म्हणतात... **जेणे निर्मिले चराचर। त्याचा करावा विचार। शुद्ध विवेके परमेश्वर। ओळखावा।। आपुल्या देवास ओळखावे। मग मी कोण हे पाहावे। संग त्यागून राहावे। वस्तुरूप।। संसार त्याग न करितां। प्रपंच उपाधी न सांडता। जनांमध्ये मध्ये सार्थकत। विचारेंचि होय।। याचि जन्मे येणेंचि काळे। संसारी होईजे निराळे। मोक्ष पाविजे निश्चये। स्वरुपाकारण।।**

'बुद्धी दे रघूनायका' म्हणणाऱ्या समर्थांचे वेगळेपण उठून दिसते ते, त्यांचा रोकड्या ऐहिकतेने! तत्त्वज्ञानपर विचार सांगणे आणि परमार्थाचाच उपदेश करणे इतकेच समर्थांचे वैशिष्ट्य नाही. त्यांच्या विचारांना आणि उपदेशाला आणखी एक वेगळे अंग आहे. स्वतंत्र आणि निरपेक्ष बुद्धीचे स्फुरण हा समर्थांचा विशेष आहे. आपल्या अनुभवांप्रमाणे आपल्या विचारात परिवर्तन घडवून आणणे हा त्याच्या दुसरा विशेष आहे. समर्थांच्या वैचारिक विश्वात झालेला बदल केवळ परमार्थाच्या अंगानेच नव्हे तर, ऐहिकाच्या अंगानेही झाला आहे कारण, त्यांना बारा वर्षांच्या तीर्थाटनातून आलेले अनुभव! समर्थांनी प्रापंचिकांचे दुःख ऐहिक पातळीवरून समजावून घेतले आणि त्यातून सुटका करण्याचा मार्ग ऐहिक पातळीवरूनच विशद केला.

पारमार्थिक मार्ग आणि ऐहिक मार्ग यांच्या विचारांची गल्लत समर्थांनी कधीच केलेली आढळत नाही. अत्यंत रोखठोक विचार मांडून त्यांनी प्रयत्नवादावर भर दिला. आज जे आपण एकारलेपणाने, एकटेच आपले दुःख कुरवाळत बसतो आणि आभासी जगाकडून सुखाची अपेक्षा करीत असतो, त्या पृष्ठभूमीवर समर्थवचने समजून घेतली पाहिजेत. ईश्वरनिष्ठेसोबतच समर्थांनी बुद्धी आणि तर्क यांची साथ सतत बाळगली. वास्तवाचे भान आणि आत्मभान कायम बाळगले. **मुख्य ते हरिकथा निरूपण। दुसरे ते राजकारण। तिसरे ते सावधपण। सर्व विषयी।। सावधपण सोडू नये। व्यापकपण सांडू नये। कदा सुख मानू नये। निसुगपणाचे।। असे सांगणारे समर्थ, हे देखील सांगतात की, परंपरा तोडू नये। उपाधी मोडू देऊ नये। ज्ञानमार्ग सोडू नये। कदाकाळीं।। कर्ममार्ग सांडू नये। वैराग्य मोडू देऊ नये। साधन भजन खडूं नये। कदाकाळीं।। दुसऱ्याच्या दुःखे दुःखावे। दुसऱ्याच्या सुखे सुखावे। अवघेचि सुखी असावे। ऐसी भावना।।** असा उपदेश करणारे समर्थ आणि महर्षी व्यास वेगळे आहेत असे कोण म्हणेल? मुळात आज चूक होते आहे ती व्यासांनी सांगितलेल्या धर्ममार्गावरून न चालण्याची आणि समर्थांनी सांगितलेले सावधपण न बाळगल्याची! आपल्या सर्व दुःखाचे मूळ यातच दडलेले आहे. या सर्व पृष्ठभूमीवर आपला व्यवहार म्हणजेच जवळच्या आणि दूरच्या व्यक्तींशी आलेला संबंध कसा असतो हे आपणही तपासून बघायला हवे. हे सर्व संबंध, स्पष्टपणे सांगायचे तर, स्वार्थाशी निगडित असतात. हा स्वार्थ दोहो बाजूंनी असतो. आणि जोपर्यंत अशा व्यावहारिक संबंधांना स्वार्थ लगडून असतो तोपर्यंत, त्यात आपलेपणाचा लवलेश नसतोच नसतो, उलट सर्व सोपस्कार हे कृत्रिम असतात. आपल्या मनातील विषादाचे, दुःखाचे, शल्याचे हे मूळ आहे. स्वार्थापोटी वाढत गेलेले माझे समज आणि माझ्या स्वार्थाला पोषक असलेले माझ्याविषयीचे इतरांचे समज अशा मिश्रणाने माझे अहंकारी व्यक्तित्व तयार होते. तेच सर्व दुःखाचे कारक असते. म्हणूनच आध्यात्मिक उन्नतीसोबत व्यावहारिक- ऐहिक उन्नती आवश्यक मानली जाते.

अध्यात्मामुळे आलेली अशी व्यावहारिक उन्नती व्यक्तीच्याच नव्हे तर, समाजाच्या नैतिक, सामाजिक, सांस्कृतिक उन्नयनाचे श्रेष्ठ साधन ठरते. असे झाले तर आणि तरच, व्यक्ती, समष्टी आणि राष्ट्र यांच्या जीवनातील दुःखांचा भार कमी होईल. न झाला तर निदान सुसह्य तरी होईल.

# ...आणि बिबट्या पळाला!

उगवतीचे रंग

विश्वास देशपांडे
भ्र. ९४०३७४९९३२



रात्री टीव्हीवर बातम्या पाहत असताना नाशिक आणि नगर भागात बिबट्याने किती थैमान घातले ते दाखवत होते. बिबट्याच्या दहशतीने लोक घाबरले होते. त्या बातम्या पाहतच मी झोपी गेलो. मी गाढ झोपलो असताना अचानक मला एक भीतीदायक डरकाळी ऐकू आली. मी दचकून जागा झालो.

पाहतो तर काय समोर चक्क एक बिबट्या! त्याचे डोळे अंधारात चमकत होते. तो अगदी समोर आणि मी त्याच्या शिकारीच्या टप्प्यात. बापरे! आता काही खरं नाही. माझ्या काळजाचा ठोका चुकला. माझ्यात कुठून एवढे बळ आले कुणास ठाऊक, पण भीती वाटण्याऐवजी माझ्या डोक्यात काहीतरी केमिकल लोचा झाला आणि मला थेट 'शोले' चित्रपटच आठवला. समोर साक्षात मृत्यू उभा होता आणि माझ्यातला 'गब्बर सिंग' जागा झाला होता.

बिबट्याने पुन्हा एकदा गुरगुरत माझ्याकडे पाहिले. मी थरथरत्या हाताने चादर सावरली आणि मनातल्या मनात म्हणालो, जो डर गया, समझो मर गया! बिबट्या एक पाऊल पुढे आला. त्याचा पवित्रा पाहून मला वाटलं तो आता झडप घालणार. पण मी ही काय कच्च्या गुरुचा चेला नव्हतो. मी बेडवर उभा राहिलो आणि पूर्ण ताकदीने ओरडलो, अरे ओ सांबा! लगा निशाना इस बिबटे पर. अब तेरा क्या होगा बिबट्या? माझ्या अशा अनपेक्षित ओरडण्याने बिबट्यासुद्धा दोन मिनिटं कन्फ्युज झाला. तो डोळे विस्फारून माझ्याकडे बघतच राहिला. समोरच्या सावजाकडून त्याला अशा प्रकारच्या प्रतिसादाची अपेक्षा अजिबात नसावी. आतापर्यंत त्याचा अनुभव असा होता की, समोरचे सावज त्याला पाहिले की गर्भगळीत होत होते. पण इथे तर वेगळाच प्रकार होता. मनात नक्कीच विचार आला असेल की, शिकार करायला आलोय की शिकार व्हायला? बिबट्याला आतापर्यंत स्वतःबद्दल फार आत्मविश्वास होता. गावोगावच्या माता आपल्या बाळाला झोपवताना त्याची भीती दाखवत होत्या. बेटा सो जा नही तो बिबट्या आ जायेगा. बिबट्यासुद्धा आपल्या साथीदारांना मोठ्या गर्वाने म्हणत होता, कितना इनाम रखा है रे इन फॉरेस्ट वालो ने मुझपर? त्याचे साथीदार म्हणायचे, पुरे पाच लाख, सरदार. आणि मग बिबट्या गडगडाटी हास्य करायचा.

पण आता बिबट्याचा हा आत्मविश्वास पार डळमळीत झाला होता. मी म्हटलं, गाववालोने भुखे कुत्तों केसामने रोटी डालना अब बंद कर दिया है. इसलिये यहा कुछ नही मिलेगा.

बिबट्या बिचारा अजूनच गोंधळला. त्या गोंधळलेल्या अवस्थेत त्याने आणखी एक डरकाळी फोडली. बहुधा त्या परिस्थितीचा निषेध त्याने व्यक्त केला असावा. पण आता त्याच्या डरकाळीत ती पूर्वीची जरब राहिली नव्हती. त्याने एक पाऊल मागे घेतलं. मला वाटलं तो घाबरला. माझा आत्मविश्वास वाढला. मी कोपऱ्यात ठेवलेली काठी उचलली. मी म्हटलं, गब्बर से तुम्हे एक ही आदमी बचा सकता, है खुद गब्बर! तसं जर बिबट्याने ठरवलं असतं तर समोरच्या भक्ष्याची शिकार करणं त्याला काही अवघड नव्हतं. पण आता त्याच्या डोक्यातही काहीतरी केमिकल लोच्या नक्कीच झाला होता. त्याला आता खात्री पटली होती की हा माणूस खायला योग्य नाही, कारण ह्याला शिकार बनवले तर आपलीच शिकार व्हायची आणि असा माणूस न खाल्लेला चांगला!

माणूस जातीचे भवितव्य उज्वल राहण्यासाठी अशी माणसे जगणे आवश्यकच! काही एक न बोलता तो खिडकीकडे चालू लागला. तो पाठ फिरवून जात असताना मी त्याला शेवटचा टोमणा मारलाच, जा सिमरन जा, जी ले अपनी जिंदगी! बिबट्या खिडकीतून उडी मारून पळून गेला. आता बिबट्याच्या घरी काय परिस्थिती असेल ते दृश्य माझ्या डोळ्यासमोर तरळले. त्याचा चेहरा पाहून बिबटीण बाईंनी नक्कीच विचारले असणार. काय झाले शिकार मिळाली नाही का? बिबट्याचे उत्तर नाही. आज माझीच शिकार व्हायची होती पण वाचलो. सौ बिबट म्हणाल्या, का? पळून आलात? बिबट्या म्हणाला होय. सौ बिबट, कितने आदमी थे? बिबट्या, सिर्फ एक. सौ बिबट, सिर्फ एक आदमी और फिर भी वापस आ गये? एवढ्यात कसला तरी आवाज झाला आणि मला जाग आली. सगळं शांत झाल्यावर मी बेडवर धपकन बसलो आणि स्वतःशीच पुटपुटलो, इतका सन्नाटा क्यूँ है भाई? तेवढ्यात बायकोचे उद्गार माझ्या कानावर आले.

अहो, कसला सन्नाटा आणि झोपेत कसले शोलेचे डायलॉग म्हणत होतात! गब्बर काय, सांबा काय? उठा सकाळचे आठ वाजले आता. तेव्हा मला कळलं, बिबट्या वगैरे काही नव्हता. हा सगळा रात्रीच्या बातम्या पाहण्याचा परिणाम होता. पण आता बिबट्या वगैरे काही नव्हता तो खिडकीतून पळून गेला होता आणि माझ्या अंगात रात्रीचा गब्बर अजून जागा होता. मी बायकोला ऑर्डर केली, चहा आण....

# रोखरहित अर्थव्यवस्था आणि कौटिल्य

प्रबंधांची बीजे

श्रीरंग हिर्लेकर

बार्टर पद्धतीतील काही दोषांमुळे विनिमयाचे एखादे समान पातळीवरील माध्यम असावे या कल्पनेतून भौतिक चलनाचा जन्म झाला. चामड्याच्या तुकडा ते सोने, चांदी, तांबे, निकेल इत्यादी धातू यापासून नाणी आणि किमती कागदापासून नोटा तयार करण्यात येऊ लागल्या. त्याच्यावर राजसत्तेच्या मुद्रा आणि भारतीय नोटांवरील मैं धारकको अदा करनेका वचन देता हूँ। अशा अर्थाचे आश्वासन लोकांना आपल्या सहकार्याचे योग्य मूल्य देऊ लागले. काही वर्षांपूर्वी स्वीडनने २०२९ पर्यंत नोटा आणि नाणी यासारखे भौतिक चलन व्यवहारातून काढून त्याजागी अदृश्य ई- चलन आणण्याचे ठरवले आणि त्यादृष्टीने तयारीही सुरू केली. आपल्याकडेही हे दिसू लागले आहे.

आज ई- व्यवहार भारतात सुरू होऊन १५ वर्षे झालीत. हळूहळू त्याची व्याप्ती वाढत आहे. शासनाची पावले पडू लागली. या दृष्टीने आता अनेक योजना सुरू झाल्या असून काही विचाराधीन आहेत. उदा.-

१) **जनधनयोजना :** प्रत्येक व्यक्तीचे खाते बँकेत असावे व बचतीची सवय लागावी, तसेच पैसा बँकेत गेल्यामुळे देशकार्यात प्रवाहित करता येईल.

२) **एक व्यक्ती एक खाते क्रमांक:** म्हणजे एकापेक्षा अधिक बँकेत खाती असली तरी सर्वांचा क्रमांक एकच असेल.

३) प्रत्यक्ष रोखीने खर्च करावयाची उच्चतम मर्यादा कमी करणे,

४) घरी अथवा व्यापारी प्रतिष्ठानांमध्ये ठरावीक रकमेपेक्षा अधिक रोख नसावी.

५) प्लास्टिक मनीचा वापर वाढवणे.

६) **साक्षरता वाढवणे:** संगणक आणि मोबाईल-इंटरनेट यशस्वीपणे वापरेल तोच साक्षर अशी व्याख्येची व्याप्ती वाढवणे. ७) स्वभाषेत सॉफ्टवेअर निर्माण करणे.

८) अँड्रॉईड मोबाईल, लॅपटॉप आणि दुर्गम भागातही जलदतेने चालणारे इंटरनेटचे जाळे विणणे.

**पण हे कसे करणार?**

१) जनधनयोजना १०० टक्के राबविणे, एक व्यक्ती एक खाते क्रमांक पद्धत लागू करणे हे प्राथमिक काम असेल.

२) खाते उघडताच पासबुकऐवजी वापरण्यास सोपे उपकरण खातेदाराला बँकेकडून विनामूल्य द्यावे लागेल. एकूणच हा विषय अर्थ, शिक्षण आणि समाजकल्याण अशा सर्वच विभागांना एकत्र बसून हाताळावयाचा आहे. सुदैवाने अनेक द्रष्टे विद्वान आणि चपळ तंत्रज्ञ उपलब्ध आहेत. त्यामुळे ई- चलन लवकरच प्रत्यक्षात आल्याशिवाय राहणार नाही. एकदिवस धुणी-भांडी करणाऱ्या बाईचा अल्पसा पगार किंवा हॉटेलमधील कपभर चहाचे पैसे इंटरनेटने दिले जातील. मंदिरासमोरचे भिकारीसुद्धा टिनाचा फुटका डबा टाकून स्वॅपिंग यंत्र वापरतील. हे कल्पनारंजन नाही. अनेकांना याचे परिणाम आणि गांभीर्य कळावे तितके कळलेले नाही. शासनाच्या या निर्णयामागील कारणे आणि त्याचे एकंदर अर्थकारणावरील संभाव्य परिणाम समजून घ्यायला हवेत.



**परिणाम अनुकूल :** नोटांसाठी लागणारा विशिष्ट कागद, त्यांची छपाई, नोटा सांभाळणे, फाटणे, चोरीला जाणे, सोबत मोठी रोख वागवणे हे सर्व थांबेल. खोट्या चलनामुळे देशाची अर्थव्यवस्था खिळखिळी होणे थांबेल. व्यवहार पारदर्शक होतील. भौतिक चलनाच्या नसण्यामुळे रोखीने होणारा भ्रष्टाचार बंद होईल. आर्थिक गुन्हेगारी कमी होईल. खोटी चलनवाढ, सुटे पैसे, कमी मूल्याच्या नोटांचा तुटवडा हे प्रश्न सुटतील. उत्पन्न लपवणे, कर चुकवेगिरी कमी होईल. शासनाच्या तिजोरीत जास्तीत जास्त कर जमा होईल. मात्र भौतिक चलन १०० टक्के बंद होईल हे अजून अनेकांना पटत नाही आणि बंद व्हावे असेही वाटत नाही.

**गांभीर्य :** मी माझा पैसा कसा खर्च करतो हे कोणी बघू नये. हा मुद्दा केवळ तांत्रिक नसून यामागे नागरी स्वातंत्र्याचा प्रश्न आहे. ही तंत्रज्ञानाची मर्यादा नसून तत्त्वज्ञान आणि सत्तेपुढील आव्हान आहे. रोख हुंडी, हिशेब, नाणी म्हणजे स्वातंत्र्य समजावे का? डिजिटल पैसा हा आधुनिक राजदंड तर नव्हे? रोख व्यवहार म्हणजे पैसा माझा, व्यवहाराचा निर्णयही माझाच. आणि तोही गोपनीय. ही आर्थिक स्वायत्तता. यामागे एक विश्वास आहे की आपत्काली बेहिशेबी का होईना पण माझ्या खिशातील पैसाच माझे रक्षण करेल.

**आधुनिक राजदंड:** डिजिटल पैसा हा आधुनिक राजदंड आहे. येथे कोण, कशासाठी, कोणाला, कधी, कुठे, काय आणि किती देतो ते राजाला कळेल. पूर्वी मानवी नियंत्रण असे, आता संगणक करेल. पण या अल्गोरिदमिक नियंत्रणामुळे नागरिकाचे स्वामित्व जाते. तो फक्त वापरकर्ता बनेल. यामुळे डिजिटल पैसा हा उत्तम सेवक म्हणता म्हणता भयकारक स्वामी होईल. यामुळे पारंपरिक मूल्यांमध्ये रुक्षता येईल. पूर्वी पैशासोबत नैतिकता आणि विश्वासाला प्रतिष्ठा होती. नाणी-मोहरा, हुंडी, नैतिकता, विश्वास, वहीखाते, लेखा या सर्वांत केंद्रस्थानी असलेल्या मानवाची जागा कृत्रिम प्रणाली घेईल. रोख व्यवहारात स्वातंत्र्य असते पण अराजकतेचे भयही असते. आता प्रशासन अधिक शक्तिशाली होईल. अल्गोरिदम नियम तपासेल आणि माणूस परिणाम भोगेल. राजकीय शिस्त वाढेल पण वैयक्तिक स्वातंत्र्यावर मर्यादा येईल.

**भावनिक पातळी :** पैशाचा स्पर्श सुखावह होतो. तो पुन:पुन्हा मोजता येतो. मानवी मनावर त्याचा खोल ठसा उमटतो. पूर्वायुष्यात कॅशियर म्हणून काम केलेल्या एका वृद्धाला स्मृतिभ्रंशामुळे काही समजत नसूनही बोटे मात्र नोटबंडल मोजत असल्यासारखी हलत राहायची. खुळखुळणारी नाणी आणि कोऱ्या नोटांचा वास- थोडक्यात चंचल लक्ष्मीच्या पैंजणांचा आवाज मेंदूला सुखावतो. हातातील नोट माझी आहे या जाणिवेने मानसिक बळ येते. एकवेळ वीज गेली, नेटवर्क बंद पडले, प्रणाली कोसळली तरी चालेल पण जवळची रोख एकटेपणा जाणवू देत नाही. डिजिटल पैशाचा आधार तर्काने समजून घ्यावा लागतो तर रोख रकमेचा आधार सहजच जाणवतो.

**समाधान:** दान दक्षिणा देताना हातावर तुळशीपत्र ठेवून पाणी सोडतात. या तुळशीपत्रात रुक्मिणीचे ऐश्वर्य नसून सत्यभामेचे समर्पण आणि पाण्यात अंत:करणाचा ओलावा असतो. डिजिटल देवाणघेवाणीत भावनिक सुखदुःखांचा अभाव आणि कोरडेपणा जाणवतो. न्यूरोसायन्स सांगते की स्पर्शामुळे प्रत्यक्षाची अनुभूती येऊन आधार वाटतो. डिजिटल व्यवहारात त्याची कल्पना करावी लागते. तंत्रज्ञ ही उणीव दूर करतील. डिजिटल वॉलेट उपकरणाच्या पडद्यावर स्पर्शाऐवजी नोटा मोजल्यासारखी भिन्न मूल्याच्या नोटांची देवाणघेवाण रंगीत-चित्रात दाखवून त्यासोबत परिचित भाषेतील सोपे शब्द ऐकू येतील. मात्र ई-सिगारेट किंवा महायुद्धामुळे अनेक वर्षे स्त्रीस्पर्शाला वंचित राहिलेल्या सैनिकांना रबरी बाहुल्या पुरवण्याच्या प्रयोगाप्रमाणेच हे प्रयोग अपुरे ठरतील.

**परिणाम :** हे उपाय तर अधिकच धोकादायक ठरतील. यामुळे आपण मेंदूच्या डोपामाईन सर्किटशीच खेळतो असे होईल. (डोपामाईन म्हणजे मेंदूची सवय, व्यसन, अपेक्षा, प्रेरणा, आनंद नियंत्रण करणारी प्रणाली.) मानवी स्वभावाच्या सीमारेषेवरील हे अतिक्रमण डिजिटल व्यवहाराचे व्यसन वाढवून समाधानाची पातळी घसरवेल. हव्यास वाढून नीती भ्रष्ट होईल. खर्च, आनंद, व्यसन सर्वच डिजिटल. मग त्यावर नियंत्रण कोणी करावे तर तेही डिजिटल सत्तेने. अल्गोरिदमची सत्ता वाढून मानवी स्वातंत्र्य घटेल. आपल्या हाती फक्त प्रतिक्रिया देणेच राहील. पैसा-स्पर्श-आनंद यांच्यातील समभुज त्रिकोणाचा आकार विषमभुज त्रिकोण घेईल. कौटिल्याला अभिप्रेत असलेली अर्थशास्त्राची बैठक डगमगेल. सुखस्य मूलं धर्म:। धर्मस्य मूलं अर्थ:। अर्थस्य मूलं राज्यं। राजस्य मूलं इंद्रियनिग्रह:।। इंद्रिनिग्रहस्य मूलं वृद्धोपसेवा। वृद्धोपसेवाया मूलं विनय:। विनयस्य मूलं विद्या। म्हणून आपले नीतिशास्त्र सांगते विद्या विनयेन शोभते। आणि ही विद्या कशी तर स: विद्या या विमुक्तये। सुखाच्या शोधात केलेला हा प्रवास विद्येच्या गावाला नेतो.

अन्वयार्थ सुखस्य मूलं धर्म:। सुख भोगात नसून मर्यादापालनात आहे. धर्म म्हणजे मर्यादा, संयम, नीरक्षीरविवेक. तो नसेल तर भोग भोगूनही समाधान मिळणार नाही. धर्मस्य मूलं अर्थ:। कोरड्या उपदेशात्मक शब्दांवर धर्म टिकत नाही. त्याला अर्थशास्त्राची मजबूत बैठक हवी. त्याशिवाय नीती म्हणजे पोकळ वल्गना. अर्थस्य मूलं राज्यं। अर्थाची रचना, नियम, प्रवाह हे सर्व सुव्यवस्थेवर आधारित आहे.

आजची व्यवस्था शासन+ प्रणाली+ तंत्रज्ञान अशी आहे. डिजिटल पैशात राज्यसत्ता सैल होईल. राजस्य मूलं इंद्रियनिग्रह:।। हा आचरण्यास कठीण पण निर्णायक मुद्दा आहे. इंद्रियजयात लोभावर नियंत्रण, आकर्षणावर मर्यादा आणि शक्ती असूनही संयम हवा. इंद्रिनिग्रहस्य मूलं वृद्धोपसेवा। जर इंद्रियजय नसेल तर सत्ता हे भोगाचे साधन होऊन अनाचार वाढेल. (पान ६ वर)

# ग्रहसंकेत

## (रविवार, १५ फेब्रुवारी ते शनिवार, २१ फेब्रुवारी २०२६)

नारायण जगन्नाथ कारंजकर, ज्योतिष भास्कर, ज्येष्ठ पत्रकार
'शिवकृपा' फिल्टर पंपाजवळ, माढा रोड, मु.पो.कुर्डूवाडी, जि.सोलापूर (भ्र. ९४२३७५८४०१)

✻ **रविवार, १५ फेब्रुवारी-** महाशिवरात्री, शिवपूजन (निशिथकाल रात्री १२.२८ ते १.१८ पर्यंत), संत गाडगेबाबा जयंती (तिथी), गुरु सेवालाल महाराज जयंती (बंजारा), कुणकेश्वर यात्रा देवगड, कलेश्वर जत्रा नेरूळ (कुडाळ), श्री शिव-पार्वती यात्रा वडवणे, गोकर्ण महाबळेश्वर उत्सव ✻ **सोमवार, १६ फेब्रुवारी-** सोमवती अमावास्या, चित्रमहर्षी दादासाहेब फाळके पुण्यदिन, क्रांतिवीर वासुदेव फडके पुण्यतिथी, कुरुंदवाड यात्रा, उमर कांचन यात्रा पाटण, शिखरकाठी यात्रा, जालिंदरनाथ येवलवाडी (बीड), बुद्धिहाळ यात्रा चिकोळी ✻ मंगळवार, १७ फेब्रुवारी- द्वापार युगादी, दर्श अमावास्या सायं. ५.३० पर्यंत, अन्वाधान, कांकणाकृती सूर्यग्रहण (भारतात दिसणार नाही, वेधादि नियम पाळू नये), क्रांतिवीर लहूजी साळवे पुण्यतिथी ✻ **बुधवार, १८ फेब्रुवारी-** चंद्रदर्शन १९: ३६ पर्यंत, सौर वसंतऋुत प्रारंभ, इष्टि, फाल्गुण मासारंभ, गोकर्ण महाबळेश्वर रथोत्सव, कपिलेश्वर नगर प्रदक्षिणा कोल्हापूर, ✻ **गुरुवार, १९ फेब्रुवारी-** छत्रपती शिवाजी महाराज जयंती तारखेप्रमाणे, श्री रामकृष्ण परमहंस जयंती, गोपालकृष्ण गोखले पुण्यतिथी, रमजान उपवास प्रारंभ ✻ शुक्रवार, २० फेब्रुवारी- भारतीय फाल्गुन मासारंभ, रामकृष्ण क्षीरसागर महाराज जयंती सोलापूर ✻ शनिवार, २१ फेब्रुवारी- विनायक चतुर्थी, जागतिक मातृभाषा दिन, छत्रपती संभाजीराजे धर्मवीर दिन.

**मुहूर्तः-** ✻ **साखरपुडा-** २०, २१ फेब्रुवारी (१३ नंतर) ✻ **बारसे-** २० फेब्रुवारी (१५ पर्यंत), २१ (१ नंतर) ✻ **जावळ-** १८ फेब्रुवारी ✻ **गृहप्रवेश-** १८, २० फेब्रुवारी ११ (१५ पर्यंत)

### मेष :- आर्थिक प्रगती

वाईट वेळेत साथ सोडलेल्या लोकांकडे लक्ष देऊ नका. लाभातील बुधाचा गुरुशी होणारा त्रिकोण योग आपली आर्थिक प्रगती करणार आहे. कार्यक्षेत्रात उत्साहवर्धक कालावधी आहे. मनासारख्या घटना घडतील. आर्थिक नियोजन विचारपूर्वक करावे. सरकारी कामे करून घ्यावीत. स्थावर प्रश्न मार्गी लागतील. सर्वच अडचणींवर मात करू शकाल. नव्या विचारांना चालना मिळेल. शुभ ता. १५, १९

### वृषभः- अपेक्षित घटना घडतील

ज्यांनी वाईट वेळेत साथ देऊन चांगली वेळ आणून दिले त्यांचे मोल विसरू नका धनस्त गुरुचा बुधाशी होणारा त्रिकोण योग आपली आर्थिक कामे यशस्वी करणारा आहे स्पर्धांमध्ये यश मिळेल नव्या योजना मार्गी लावता येतील कार्यक्षेत्रात मनासारखी प्रगती होईल अनुकूलता वाढत जाईल सुसंधीचे स्वागत करावे अपेक्षित घटना घडतील शुभ ता.१५, १९, २०

### मिथुनः- नव्या कामांना गती

दिखाऊपणाचा प्रयत्न करू नका, जेव्हा विजयी व्हाल, तेव्हा स्वतः इतरांच्या नजरेत याल. बुध, गुरुचा सोमवारी होणारा त्रिकोण योग भाग्यवृध्दिंगत करणारा आहे. नव्या कामाला गती येईल. कलागुणांचा विकास होत जाईल. अडचणी सुटत चालल्याने समाधान वाटेल. प्रकृतीच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करू नका. कौटुंबिक जीवनात सुख- समाधान वाढेल. सुसंधीचा लाभ उठवावा. शुभ ता. १९, २०

### कर्कः- वादाचे प्रसंग टाळावेत

जो माणूस थोड्या गोष्टीत आनंदी असतो, त्याला जास्त आनंद मिळतो. बुध, गुरुचा त्रिकोण योग आर्थिक प्रगती करणारा आहे. नव्या योजना मार्गी लावता येतील. धार्मिक, सामाजिक कार्यात पुढाकार घ्याल. कौटुंबिक जीवनात वादाचे प्रसंग टाळावेत. अडचणी सुटत जातील. गुढ शास्त्रात प्रगती होईल. विनाकारण धावपळ करू नका. शुभ ता. १५, १९

### सिंहः- घाईने निर्णय नको

जेव्हा लोक आपल्याशी सामना करू शकत नाहीत, तेव्हा ते आपला दुस्वास करू लागतात. लाभातील गुरुचा, बुधाशी होणारा त्रिकोण योग आर्थिक कामे मनासारखी करणारा आहे. उष्णतेपासून त्रास संभवतो. नव्या योजना मार्गी लावता येतील. घाईने कोणताही निर्णय घेऊ नका. निवडणूक, स्पर्धांमध्ये यश मिळेल. संतती संबंधात शुभ घटना घडतील. सुसंधी लाभतील. शुभ ता. १८, २०

### कन्याः- मनासारखी प्रगती

लॉटरी फक्त पैशाची लागत नाही, तर जीवनात चांगल्या व्यक्ती भेटणे हे लॉटरी सारखेच आहे. राशी स्वामी बुधाचा, गुरुशी होणारा त्रिकोण योग नव्या कामाला गती देणारा आहे. अडचणीतून मार्ग निघत जाईल. ज्ञानदान, बँक, विमा क्षेत्रात मनासारखी प्रगती घडेल. नव्या संधीचे स्वागत करावे. प्राप्ती मनाप्रमाणे घडेल. डोळ्याच्या तक्रारींची दखल घ्यावी. शुभ ता. १८, १९

### तुलाः- अडचणी कमी होतील

कोणाच्या असल्याने कोणाला फरक पडत नाही, आपण कोणासही सदैव गृहीत धरू नका. पंचमातील बुधाचा गुरुशी होणारा त्रिकोण योग अपेक्षित प्रगती करणारा आहे. नव्या कामांना गती मिळेल. अडचणी कमी होत जातील. नव्या वास्तु, भूखंड खरेदीचा योग आहे. संतती संबंधात शुभ घटना घडतील. सर्व प्रतिकूलतेवर मात कराल. भाग्योदयकारक घटना घडतील. शुभ ता. १५, २०

### वृश्चिकः- अपेक्षित प्रगती होईल

आपण कोणाबरोबर असाल तर वापर केला जाईल, नसाल तर पर्याय शोधला जाईल. बुध-गुरुचा त्रिकोण योग आर्थिक प्रगती करणारा आहे. यांत्रिक शिक्षणात प्रगती घडेल. अडचणीतून मार्ग निघाल्याने समाधान वाटेल. सुसंधी लाभतील. वादविवादाचे प्रसंग टाळावेत. जुने येणे वसूल करून घ्यावे. नव्या विचारांना चालना मिळेल. अपेक्षित प्रगती होत जाईल. चिंता नको. शुभ ता. १५, १९

### धनुः- परिश्रमातून प्रगती

तोल सांभाळला नाही आला तरी चालेल, पण तोंड सांभाळता आलं पाहिजे. धनस्थ मंगळामुळे बोलणे कठोर होणार नाही, याची काळजी घ्यावी. बुध- गुरू त्रिकोण योग प्रवास घडविणारा आहे. कृषी, वैद्यकीय क्षेत्रात अनुकूलता वाढेल. फार दगदग करू नका. आर्थिक गुंतवणूक योग्य प्रकारे करावी. अडचणीतून मार्ग निघत जाईल. तिखट, तामसी पदार्थ जास्त खाऊ नका. परिश्रमातून प्रगती घडेल. शुभ ता. १५, १९

### मकरः- वादाचे प्रसंग टाळावेत

कोणाच्याही बोलण्यावरून किंवा सांगण्यावरून माणसाची किंमत ठरवू नका. राशीतील मंगळामुळे भागीदारीच्या व्यवसायात समस्या संभावतात. नोकरीत वरिष्ठांशी वादाचे प्रसंग टाळावेत. उपजत कलागुणांचा विकास होत जाईल. नव्या ओळखी पारखून घ्या. कौटुंबिक जीवनात फार स्वमताग्रही राहू नका. दगदग टाळावी. शुभ ता. १९, २०

### कुंभः- अडचणींवर मात

माणसं ओळखताना अनुभव वापरावा, चांगली माणसे दुखावणार नाहीत. राशीतील बुधाचा गुरुशी होणारा त्रिकोण योग कार्यक्षेत्रात प्रगती करणारा आहे. आर्थिक व्यवहार विचारपूर्वक करावेत. विलंबाने पण निश्चितच प्रगती साधता येईल. अडचणींवर मात कराल. सरकारी कामे होतील. नव्या संधी विचारपूर्वक स्वीकाराव्यात. आत्मविश्वास वाढेल. शुभ ता. १५, १९

### मीनः- चिकाटीने पण प्रगती होईल

जे पारखून पाहतात त्यांना गुणवत्ता दिसते, जे तपासून पाहतात त्यांना कमतरता दिसते. सुखस्थ गुरुचा बुधाशी होणारा त्रिकोण योग चिकाटीने पण प्रगती करणारा आहे. सरकारी कामासाठी अधिक पाठपुरावा करावा लागेल. अडचणीतून मार्ग निघत जाईल. स्थावर प्रश्न विलंबाने सुटतील. फार चिंता करू नका. कलागुणांचा विकास होत जाईल. शुभ ता. १५, १९, २०

!! शुभ भवतु !!

दुर्ग जिज्ञासा

प्राची पालकर

जावळीचा परिसर म्हणजे सह्याद्रीतील निसर्गवैभव! एका बाजूला घनदाट जंगल, दुर्गम डोंगर, कडे- कपारी, गिरीदुर्ग आणि तेथूनच कोकणात उतरलात तर थेट अरबी समुद्र! जावळीचे हे बेलाग खोरे इतके अवघड आणि अभेद्य आहे की चौदाव्या शतकात ५००० मोगल सैनिक जावळीत गेले पण परतलेच नाही. त्यांचे नक्की काय झाले याचा ठावठिकाणा देखील कोणाला लागला नाही. जावळीच्या मुलखातील मधु- मकरंदगड या नावाने प्रसिद्ध असलेले मधू आणि मकरंद हे जोडकिल्ले सातारा जिल्ह्यात, प्रतापगडापासून दक्षिणेला २८ कि. मी. अंतरावर आहे. महाराष्ट्रातील प्रसिद्ध थंड हवेचे ठिकाण महाबळेश्वर येथून जायचे असल्यास ३८ कि. मी. अंतरावर मधु-मकरंदगड वसलेले आहेत. कोयनेच्या खोऱ्यात असलेल्या मधु- मकरंदगडाच्या भोवती घनदाट जंगल असून घोणसपूर आणि हातलोट ही किल्ल्याच्या पायथ्याशी असलेली गावे आहेत.

किल्ल्याची उंची साधारण ४००० फूट असून मधू आणि मकरंद हे जोडकिल्ले पूर्व पश्चिम पसरलेल्या एकाच डोंगरावर आहेत. महाबळेश्वरच्या मुंबई पॉईंटवरून सूर्यास्त पाहताना समोर एक घोड्याच्या खोगिरीसारखा डोंगर दिसतो. त्या डोंगराच्या मागे सूर्य अस्ताला जातो, त्याच डोंगरावर हे दोन किल्ले असून ट्रेकिंग करायचे असल्यास किल्ल्यावर जाण्यासाठी महाबळेश्वरवरून पायवाट आहे. गाडीरस्त्याने जायचे असल्यास महाबळेश्वर-पार- घोणसपूर असा मार्ग सोयीचा आहे. या मार्गातील एक शिवकालीन दगडी पूल आजही सुस्थितीत आहे. किल्ल्याच्या पायथ्याशी असलेल्या हातलोट गावातून कोकणातील बिरमणी गावात उतरणाऱ्या घाटाचे रक्षण करण्याकरिता या किल्ल्यांची निर्मिती करण्यात आली. गडाच्या माचीवर घोणसपूर हे गाव आहे. येथे जंगम लोकांची वस्ती आहे. हे गाव पूर्णपणे शाकाहारी आहे. गावात मांसाहार करू नये असा फलक येथील मंदिराच्या जवळ लावलेला आहे. मधु-मकरंदगडाच्या माचीवरील घोणसपूर गावात पोहोचण्यास हातलोट मार्ग किंवा चतुर्बेट मार्गाने जावे. घोणसपूर गावात श्री मल्लिकार्जुन मंदिर आहे. मंदिराच्या जवळ झिजलेल्या वीरगळ, काही भग्न मूर्ती आणि सतीचा हात आहे. पायथ्याच्या हातलोट गावातून किल्ल्यावर जाताना पहिले शिवमंदिरात दर्शन घ्यावे, त्यानंतर गड चढायला सुरुवात करावी. आपल्याला प्रथम दोन उंच शिखरे दिसतात. वायव्य बाजूला दिसणारे शिखर मधुगड तर नैर्ऋत्य दिशेचे शिखर मकरंदगड आहे. मुरमाड घसरडी वाट आणि तुटलेले कडे यामुळे मधुगडावर फारसे कोणी जात नाही आणि कोणाला जायचेच असल्यास प्रस्तारारोहण साहित्य आवश्यक आहे. आपण मकरंदगडाच्या दिशेने चढण्यास सुरुवात करावी. पंधरा ते वीस मिनिटांचा खडा चढ चढून आपण किल्ल्याच्या उद्ध्वस्त प्रवेशद्वाराजवळ पोहोचतो. हे प्रवेशद्वार दगड फोडून बनविले असल्याने, किल्ल्याला नैसर्गिक संरक्षण मिळाले आहे. समोर गेलात की आपल्याला तटबंदीचे काही अवशेष दृष्टीस पडतात. येथून एक वाट किल्ल्याच्या माथ्यावर जाते तर दुसरी वाट डोंगराला वळसा घालून गडाच्या मागील बाजूस जाते. गडावर पाण्याचे खांब टाके आहे, टाक्याच्या वरच्या बाजूस मारुतीचे शिल्प आहे. गडावर अजून काही उद्ध्वस्त झालेले बांधकाम शिल्लक आहे.

टाक्याच्या जवळून गडमाथ्यावर जाण्यास पायऱ्या आहेत, मात्र पायऱ्या सुस्थितीत नाहीत. गडमाथ्यावर श्री मल्लिकार्जुन महादेवाचे मंदिर आहे. शिवपूर्वकाळात चंद्रराव मोरे यांनी सात शिवमंदिरांना इनामे दिली होती त्यातील हे एक मंदिर आहे. मंदिरातील शिवलिंगावर तांब्याची नागमूर्ती आहे. शिवलिंगाच्या पाठीमागे मल्लिकार्जुनाची मूर्ती आहे तसेच मंदिराच्या समोर नंदीची मूर्ती आहे. मंदिराच्या समोर एका उद्ध्वस्त झालेल्या वास्तूचे अवशेष आहेत, तेथे एक समाधी बांधलेली आहे. मकरंदगड ज्या डोंगरावर आहे त्याचा आकार घोड्याच्या खोगिरासारखा दिसत असल्याने त्याला 'सॅडलबॅक' असे म्हणतात. गडाच्या सर्वोच्च टोकावरून कोयना खोऱ्याचे अप्रतिम दृश्य दिसते. सातारा जिल्ह्यातील कृष्णा नदीची सर्वांत मोठी उपनदी कोयना महाराष्ट्राची भाग्यलक्ष्मी आहे. महाबळेश्वर येथे कोयनेचे उगमस्थान आहे. तेथून पाटण आणि कराड तालुक्यातून वाहत ती पुढे जाते. उगमस्थानपासून उत्तर दक्षिण वाहणारी कोयना पुढे पाटण तालुक्यातील हेळवाक येथून पूर्वेकडे वळून कराडजवळ कृष्णा नदीला जाऊन मिळते. कोयनेच्या मोरणा, वांग, केरा, सोळशी, कंदाटी या पाचही उपनद्या सह्याद्रीत उगम पावतात. जावळी, महाबळेश्वर आणि पाटण हा भाग कोयनेच्या खोऱ्यात आहे. येथे खूप पाऊस पडतो. त्यामुळे हा परिसर घनदाट अरण्याने व्यापलेला आहे. कोयना नदीवर मोठे धरण बांधले असून येथील जलविद्युत प्रकल्पामुळे महाराष्ट्र राज्याची विजेची मोठी गरज पूर्ण होते. हा परिसर शेती आणि इतर उद्योगांच्या विकासामुळे सुजलाम सुफलाम झाला आहे. धरणाचे पाणी अडविल्यामुळे तयार झालेला 'शिवाजीसागर जलाशय' आणि कराडजवळ कृष्णा आणि कोयनेचा 'प्रीतिसंगम' हे दोन्ही या भागातील नक्की भेट द्यावी अशी ठिकाणे आहेत.

प्रीतिसंगमावर अनेक मंदिरे आहेत, तसेच महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांची समाधी हे आपले प्रेरणास्थान देखील आहे. येथे 'पंताचा कोट' हे ऐतिहासिक पुरातत्त्व स्थळ असून या परिसरात सातवाहनकालीन वस्तीचे अवशेष मिळाले आहेत. कोयना वन्यजीव अभयारण्य हे नैसर्गिक वारसास्थळ आहे. कोयना अभयारण्य आणि चांदोली उद्यान हा एकत्रित परिसर 'सह्याद्री व्याघ्र प्रकल्प' म्हणून जाहीर झाला आहे. येथील जंगलात महाराष्ट्राचा राज्यप्राणी 'शेकरू', बिबट्या, गवा, अस्वल, रानडुक्कर, सांबर हे प्राणी आहेत, त्यामुळे परिसरात स्थानिकांच्या मदतीने सांभाळून फिरावे. कोयनेच्या खोऱ्याचे विहंगम दृश्य पाहताना, वातावरण चांगले असल्यास गडमाथ्यावरून महाबळेश्वरचा डोंगर, प्रतापगड, महिपतगड, मधुगड, चकदेव, सुमारगड, रसाळगडाचे दर्शन घडते. मकरंदगड उतरताना आपल्याला एक वेगळा दगड दिसतो, या दगडाची झीज होऊन दगडात आरपार बोगदा तयार झाला आहे. गडावरील खांब टाक्याच्या बांधकामावरून गड प्राचीन आहे असे अभ्यासकांचे मत आहे, पन्हाळ्याच्या दुसरा भोज राजाच्या काळातील स्थापत्य असावे असेही म्हणतात. मात्र मकरंदगडावरील वास्तू आणि उर्वरित बांधकाम प्रतापगडाच्या सोबतच केले असावे. गडाचा घेरा कमी असल्याने सभोवतालच्या मुलखावर लक्ष ठेवण्यासाठीच गडाचा चांगला उपयोग होत असेल. सह्याद्रीतील महत्त्वाचे दुर्ग प्रतापगड आणि वासोटा यांच्यामधील दुवा म्हणून मकरंदगडाचे महत्त्व होते.

किल्ल्याचा विशेष काही इतिहास नाही. मात्र हा किल्ला बहुतेक काळ मराठ्यांच्या ताब्यात होता. १८१८ मध्ये प्रतापगडाच्या सोबतच मकरंदगड देखील इंग्रजांच्या ताब्यात गेला. सातारा जिल्ह्यातील जावळी परिसरातील किल्ले 'वनदुर्ग' म्हणून प्रसिद्ध आहेत. घनदाट वनराई, जंगली श्वापदे यामुळे हे किल्ले त्याकाळी शत्रूपासून संरक्षण मिळविण्यासाठी उपयोगी सिद्ध झाले. जैवविविधतेने नटलेला हा परिसर गिर्यारोहकांच्या आवडीचा आहे. या भागातील गिरीदुर्ग सर करणे आव्हानात्मक असल्याने येथील भ्रमंती आनंददायी ठरते. स्थापत्यशास्त्राची आवड असल्यास किल्ल्यांवरील बांधकाम नीट पाहावे, डोंगरी किल्ल्यांवरील बांधकामात दगडाचा उपयोग अधिक केलेला आढळतो. तुटलेल्या नैसर्गिक कड्याचा उपयोग त्यावर बांधकाम करून तटासारखा करण्यात येत असे. नैसर्गिक दुर्गमतेचा उपयोग करून किल्ला अभेद्य करण्यासाठी जे कसब वापरले आहे, ते पाहून आजही अभिमान वाटतो. किल्ल्यांवरील बुरूज, लांबच लांब तटबंदी बांधून सुरक्षित केलेल्या डोंगराच्या कडा, किल्ल्याला अधिक सुरक्षित करण्यासाठी बांधलेले बुलंद दरवाजे हे शिवकालीन स्थापत्याचे अद्वितीय नमुने आहेत. आपल्या शौर्याच्या इतिहासाचे स्मरण ठेवून जोपासलेला दुर्ग भटकंतीचा छंद आपले आयुष्य समृद्ध करतो.



## मधु-मकरंदगड

पान ४ वरून

## मंगेश पाडगावकर यांच्या कवितेतील सामान्याचं प्रेम

चालावे, थंडीही अंगाला वाजली पाहिजे तेंव्हा कोठे आपण चौकटीतून बाहेर पडतो. या सगळ्या गोष्टींचा आनंद घ्यावा, व्यंगाने का होईना पाडगावकर म्हणतात, त्याप्रमाणे खिडकीतून फुकट सगळं बघता तर आलं? याप्रमाणे मनोरंजनात्मक दृष्टीने या सर्वांकडे पाहून आनंद घेतला पाहिजे असे कवी म्हणतात. एक अतिशय काळाकुट्ट मित्र माझ्याकडे येतो, त्याचा तो डार्क काळा रंग त्यांच्या स्वच्छ आणि प्रामाणिक मनापुढे फिका आहे. तो सोबत असला म्हणजे त्याच्याकडे कोणी टक लावून पाहत असेल की तो स्वतःच म्हणतो, किती टक लावून पाहता माझे हे सौंदर्य, तुमच्या सारख्यांची नजर लागू नये म्हणून जन्मताच अंगावर काळा टिका लावून पाठवणार होते. मला पण देवाचा हाथ थरथरला आणि सगळ्या अंगभर काळी शाई पसरली... मग हा मित्र समोरच्या खळखळून हसणार्या मित्राचा जिवलग मित्र होऊन जातो हे वेगळे सांगण्याची गरज नाही. खरे म्हणजे फक्त प्रेमच नव्हे तर इतर अनेक गोष्टी असतात की, ज्या आपल्या अख्यात्यारीत नसतात, आपण त्याबाबत काहीही करू शकत नाही. मात्र आपण त्या गोष्टीमुळे स्वतःला त्रास करून घेत असतो. आपल्या जीवनाचा आनंद उपभोगायचे सोडून निरर्थक बाबींवर चर्चा आणि काथ्याकूट करत जगण्यापेक्षा आनंदाने समोर येईल त्यावर आनंदाची उधळण करत जीवन जगले पाहिजे. प्रेमही माणसाची स्वाभाविक वृत्ती आहे. त्यामुळे त्या बाबीकडे हसत खेळत बघून जीवनाचा आनंद घेतला पाहिजे, असा मोलाचा सल्ला आनंदयात्री म्हणून ओळखले जाणारे चिरशब्द तारुण्य लाभलेले कविवर्य मंगेश पाडगावकर यांनी तुमचं काय गेलं या कवितेतून दिला आहे असे मला वाटते.

**त्याने प्रेमकेले किंवा तिने प्रेमकेले,**
**करु दे की! मला सांगा, तुमचं काय गेलं?**
**तो तिला एकांतात बागेमध्ये भेटला?**
**नको तितका जवळ जाऊन अंगाशी खेटला?**

लाल लाल गुलाबाचं फूल होऊन पेटला? भेटला तर भेटू दे की, पेटला तर पेटू दे की! तुमचं डोकं कशासाठी इतक गरमझाल? त्यानं प्रेमकेलं किंवा तिनं प्रेमकेलं, करु दे की! मला सांगा तुमचं काय गेलं? एकदा ती त्याच्यासाठी वेडीपिशी झाली? पाऊस होता तरी भिजत त्याच्या घरी गेली? घरात तेव्हां कोणीच नव्हतं म्हणून त्यांच फावल? त्याने तिला जवळ घेऊन चक्क दार लावलं? लावलं तर लावू दे की, फावलं तर फावू दे की! तुमच्या माझ्या पूर्वजांनी दुसरं काय केलं? त्याने प्रेमकेले किंवा तिने प्रेमकेले, करु दे की! मला सांगा, तुमचं काय गेलं? घरात जागा नसते त्यांचं चालणारच टॅक्सीत प्रकरण! ते थोडेच बसणार आहेत पाणिनीच घोकीत व्याकरण? गुलाबी थंडीचे परिणामहे होणारच! कुणीतरी कुणाला जवळ ओढून घेणारच! घेतलं तर घेऊ दे की, व्हायचं ते होऊ दे की! तुमच्या घरच बोचक त्यांनी उचलून थोडस नेलं? त्याने प्रेमकेलं किंवा तिने प्रेमकेले, करु दे की! मला सांगा तुमचं काय गेलं? कानटोपी घातलीत म्हणून फुलं काय बोलणार नाहीत? तुमच्या रुद्राक्षांना भिऊन पाखरं काय झुलणार नाहीत? फुलली तर फुलू दे की, झुलली तर झुलू दे की! खिडकीतून फुकट सगळं बघता तर आलं? त्याने प्रेमकेलं किंवा तिने प्रेम केलं, करू दे की मला सांगा, तुमचं काय गेलं?

## प्राक्तन

तुझ्या स्थानाला धक्का लागणार नाही.'' ते ऐकून सायलीला अपमानाच्या सहस्र इंगळ्या डसल्या. तिने त्वेषाने विचारले, ''मीसुद्धा असाच विरंगुळा शोधला तर चालेल का तुम्हाला?'' मकरंदने लगेच तिला बाहेरचा रस्ता दाखवला. तिचा दुसरा घटस्फोट झाला.

आता तर समाजात तिची परिस्थिती खूपच खराब झाली. जो भेटेल तो तिला दूषणे देऊ लागला. तिकडे तिचा पहिला पती राघवला मात्र परिस्थितीची जाणीव झाली होती. त्याला सायलीची आणि मुलीची सतत आठवण येत होती. सायली आयुष्यातून निघून गेल्यावर त्याला तिची किंमत कळली. आज राघव आणि त्याची आई सायलीची भेट घेण्याकरिता येणार होते. सायली मात्र आता पूर्णपणे सजग होती. तिच्या अपेक्षेनुसार राघवने पुन्हा लग्न करण्याचा प्रस्ताव तिच्यासमोर ठेवला.

सायलीने आपल्या अटी ठामपणे त्यांच्यासमोर मांडल्या. आता ती पूर्वीची सायली राहिली नव्हती. आता ती घुसमट सहन करून घेणार नव्हती. राघवने आठ दिवसांचा वेळ मागून घेतला. परंतु त्याच्या डोळ्यात सायलीला त्याचा होकार दिसला होता. कारण तिचे स्वतःचे प्राक्तन ती स्वतःच लिहिणार होती.

पान ५ वरून

## रोखरहित अर्थव्यवस्था आणि कौटिल्य

नियंत्रण हेच व्यसन आणि तंत्रज्ञानाचा अतिरेक म्हणजे दडपशाही. यापुढील भविष्य भयाण असेल. कारण धर्माचा महत्त्वाचा टप्पाच वगळला तर सुखाचा उगम अर्थ-तंत्रज्ञान आणि इंद्रियभोग असा असेल.

आता आधुनिक कालीन चाणक्याचे सूत्र अर्थ दे पण आनंद नको, स्पर्श दे पण उत्तेजना नको, सुलभता दे पण संयमही दे असे असेल. हे सर्व लक्षात घेऊन ई-चलन आणि संपूर्ण अर्थव्यवस्थेचे डिजिटायझेशन करण्याचे परिणाम या विषयावर एक धर्म-अर्थ-तंत्रज्ञान आणि मानव या शीर्षकाचा एक महाप्रबंध लिहिता येईल.

पान २ वरून

## अन्नप्राशन- २

आमच्या अन्नदात्याचे कल्याण कर आणि आम्हाला, पशू-पक्ष्यांना (द्विपदचतुष्पद) ऊर्जा दे.) हे तीन मंत्र अन्नग्रहणापूर्वी म्हणावेत अशी सनातनी परंपरा आहे. त्यानंतर एक गमतीशीर प्रथा पाळली जाते. हे बाळ पुढील आयुष्यात कोणती उपजीविका करून आपलं पोट भरणार आहे, याचं अनुमान बांधण्याचा प्रयत्न म्हणजे जीविका परीक्षा! अन्नप्राशन संस्काराच्या वेळी बाळ पालथं पडून पुढे सरकायला लागलेलं असतं. त्याला खीर भरवून झाल्यानंतर तिच्या/त्याच्या समोर पुस्तकं, लेखणी, दागिने, शस्त्र, माती अशा विविध वस्तू ठेवल्या जातात. बाळ यापैकी ज्या वस्तूकडे सर्वप्रथम आकर्षित होऊन स्पर्श करतं, त्यावरून त्याच्या भविष्यातील आवडीचा किंवा व्यवसायाचा अंदाज लावला जातो. अशा प्रकारचा कोणताही विधी अन्य कोणत्याही देशात बघायला मिळत नाही.

पान ३ वरून

## आपण जात्यातून सुपात चाललोय?

२०२३ च्या जी-२० शिखर परिषदेत भारताने स्वतःला शमन-केंद्रित उत्तर जग आणि अनुकूलन-केंद्रित दक्षिण जग यांच्यातील पूल म्हणून प्रभावीपणे प्रस्तुत केले. ही दुहेरी ओळख भारताची महत्त्वाची राजकीय ताकद आहे. या वर्षी ब्राझीलच्या बेलेम येथे होणाऱ्या कोप ३० परिषदेमध्ये भारताने ही नेतृत्व भूमिका अधिक बळकट करत शहरी प्रतिकारशक्तीच्या विविध गरजा प्रतिबिंबित करणारे प्रस्ताव, आघाड्या आणि उपाय पुढे न्यायला हवेत. युरोपची हवामानधोरणातील मागे पडलेली पावले समजण्यासारखी असली, तरी भारताच्या शहरी भविष्याला धक्का देऊ शकत नाहीत. युरोपियन मदत कमकुवत झाली, तर भारताने ऑस्ट्रेलिया, आग्नेय आशिया, आखाती देश आणि 'ग्रीन क्लायमेट फंड' ग्लोबल इन्फ्रास्ट्रक्चरल फॅसिलिटीफ यासारख्या हवामान निधींचा समावेश असलेला नवा जागतिक भागीदारीनकाशा तयार करायला हवा. (लेखक निसर्ग आणि प्राणिजीवनाचे अभ्यासक आहेत.)

## सुदास ते शिवराय

हिंदवी स्वराज्याचा संस्थापक वयाच्या अवघ्या अकराव्या वर्षी इ. स.१६४१ साली गाढवाच्या नांगराने उद्ध्वस्त केल्या गेलेल्या पुणे जहागिरीत आला. पुढच्या चार वर्षात त्याने बारा मावळे काबीज केली. मावळे देशमुख बांधून घेतले. लावणी, संचणी, दंगलखोरांचा बंदोबस्त, न्यायनीती अंतर्गत व्यवस्था सुतास लावली. एका अकरा वर्षाच्या मुलाने हे सर्व कसं केले असेल? त्याने नक्कीच सर्व मुलूख फिरून पायाखाली घातला असणार. माणसांचा अभ्यास केला असणार आणि त्यामुळेच एवढ्या कोवळ्या वयात न्यायनिष्ठुर दरारा बसविता आला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात गनिमी काव्याचे युद्ध ही काळाची गरज होती. शत्रूकडे अपरंपार संपत्ती आणि सैन्य होते. त्यामुळे महाराजांना गनिमी काव्याने युद्ध करावे लागले तरी प्राचीन युद्धनीती मूल्यांशी सुसंगत असेच त्यांचे युद्धधोरण होते. युद्धात त्यांनी स्त्रियांचा अवमान कधी केला नाही. कल्याणच्या सुभेदाराच्या सुनेची घटना सर्वांनाच माहिती आहे. प्राचीन दाशराज्ञ युद्धातील सुदास राजा ते मध्ययुगीन काळातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या युद्धनीतीला जोडणारे अनेक एकसंध दुवे आहेत. मात्र, शिवरायांचे एक वैशिष्ट्य जगावेगळे आहे. स्वराज्याच्या पायाभरणीसाठी त्यांच्याएवढी धाडसी वैयक्तिक जोखीम कोणत्याही सेनानीने कधीच घेतली नसणार!

# लोकोत्तर संगीत सम्राज्ञी

**शास्त्रीय संगीत हे भारतीय संस्कृती-जीवनाचे एक अविभाज्य अंग. स्वातंत्र्याची पहाट अनुभवताना, भारतातील शास्त्रीय संगीताचा अवकाशदेखील विस्तारला. याच काळात गंगेच्या काठी संगीताची 'स्वरगंगा' वाहत होती. 'एकल व्हायोलिनवादक' म्हणून नावारूपाला आलेल्या डॉ. श्रीमती राजम यांनी आपल्या कारकिर्दीमध्ये संगीत क्षेत्रामध्ये एक वेगळीच वाट निर्माण केली. २०२६ सालचा 'पद्मविभूषण' पुरस्कार त्यांना जाहीर झाला. यापूर्वी १९८४ साली त्यांना 'पद्मश्री' व २००४ साली 'पद्मभूषण' पुरस्काराने गौरवण्यात आले होते. यानिमित्ताने त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा आढावा घेणारा लेख...**

गौरव

मुकुल आव्हाड

भ्र. ९९६७८२६९८३



गीत म्हणजे विश्वाला आत्मा प्रदान करणारी गोष्ट आहे,' प्रख्यात ग्रीक तत्त्ववेत्ता प्लॅटो याचे हे उद्गार ऐकताच, संगीताच्या अवकाशाची आपल्याला प्रचिती येते. आपल्या जीवनामध्ये आपण कळतनकळत सूर, ताल, लय या सगळ्यांच्या सान्निध्यात वावरत असतो. आपल्या सभोवतालीच संगीताची एक सृष्टी जन्माला येते. मात्र, या साऱ्या अवकाशाची रचना जो करतो, तो खरा संगीतकार. आवाजाचा सारा पसारा एका बाजूला आणि त्यातून स्वरांची सिद्धी वेचणारा कलावंत दुसऱ्या बाजूला. स्वरांची ही सृष्टी ज्यांनी जन्माला घातली, अशा लोकांनी भारतीय शास्त्रीय संगीताचे विचारवैभव समृद्ध केले. याच फळीतील एक महत्त्वपूर्ण नाव म्हणजे डॉ. श्रीमती राजम. वयाच्या तिसऱ्या वर्षापासून शास्त्रीय संगीताशी त्यांची नाळ जोडली गेली. अवघ्या १५व्या वर्षी हिंदुस्तानी व्हायोलिनवादक म्हणून त्यांनी रंगमंचावर पदार्पण केले आणि नंतर मागे वळून पाहिले नाही.


'व्हायोलिन' हे रूढार्थाने पाश्चिमात्य वाद्य म्हणून ओळखले जाते. काहींच्या मते, मध्य आशियातील प्रांतामध्ये या वाद्याचा जन्म झाला. या व्हायोलिनने किशोरवयातच डॉ. श्रीमती राजम यांची बोटे धरली आणि या दोहोंच्या संगमातून एक आगळावेगळा आविष्कार जन्माला आला. डॉ. राजम यांचे वडील विद्वान दिवंगत श्री. ए. नारायण अय्यर एक उत्कृष्ट संगीत शिक्षक तर होतेच. मात्र, त्याचबरोबर एक संवेदनशील पिता आणि दूरदृष्टी असलेले विद्वानसुद्धा होते. डॉ. राजम यांचा जन्म चेन्नईचा. मात्र, त्यांच्या संगीताचा प्रवास पूर्णत्वास गेला तो गंगेच्या काठावर. डॉ. राजम यांच्या वडिलांनी त्यांच्यासाठी वीणा आणि कंठसंगीताच्या तंत्रावर आधारित 'गायकी अंग'साठी एक विशेष व्हायोलिन तंत्र शोधून काढले. 'ग्वालियर' घराण्याच्या विष्णू दिगंबर पळुस्कर यांचे शिष्य असलेल्या पंडित ओमकारनाथ ठाकूर यांच्याकडे त्यांना संगीत-शिक्षणाची दिशा सापडली. त्यांनी आपल्या वादनातून पाश्चात्त्य वाद्याला हिंदुस्तानी गायनशैलीसाठी अनुकूल बनवले. त्यांनी व्हायोलिनवर 'गायकी अंग', विशेषतः 'ख्याल गायकी अंग' इतक्या कुशलतेने सादर केले की, बहुतेक संगीतकार, विशेषतः व्हायोलिनवादक त्याचे परिणाम पाहून थक्क झाले.

व्हायोलिन तंत्रातील त्यांचे योगदान हे दिवंगत पन्नालाल घोष यांनी बासरीसाठी, दिवंगत बुंदू खान यांनी सारंगीसाठी आणि उस्ताद बिस्मिल्ला खान यांनी शहनाईसाठी केलेल्या कार्याइतकेच महत्त्वाचे मानले जाते. या कार्याबद्दल माहिती देताना डॉ. राजम म्हणाल्या की, ''ही शैली विकसित होण्यासाठी सुरुवातीला दहा ते १५ वर्षांचा कालावधी जावा लागला. पंडित ओमकारनाथ ठाकूर यांची गायकी अत्यंत भावपूर्ण होती. त्यांच्या गायकीमध्ये 'भाव' या घटकाला विशेष स्थान होते.'' ही संवेदनशीलता, त्यातील भावनांचे वेगवेगळे अनुबंध या साऱ्या गोष्टींधून त्यांच्यातील कलाकार सतत घडत गेला. 'कर्नाटकी' गायकीतील महत्त्वपूर्ण नाव म्हणजे मुसिरी सुब्रमण्यम अय्यर.


संवेदनशीलतेचा विचार हा अय्यर यांच्या मुशीत घडला, असे त्या आवर्जून नमूद करतात. त्यांच्या या साऱ्या प्रवासात त्यांनी त्यांच्या शिक्षणाची वाट सोडली नाही. ''गायनासोबतच पदवी तथा पदव्युत्तर शिक्षणाचा त्यांचा प्रवास सुरूच राहिला. घरच्यांच्या पाठिंब्यामुळे मी हे करू शकले,'' असे त्या नमूद करतात. डॉ. राजम आणि वाराणसीचे एक विशेष घट्ट नाते. गुरूकडे शिक्षणासाठी म्हणून त्यांनी आपल्या जीवनातील महत्त्वपूर्ण वर्षे तिथे व्यतित केली. याबद्दल सांगताना त्या म्हणतात की, ''एक प्रकारे हे माझे भाग्य आहे की, मला इथे येऊन शिकण्याची संधी मिळाली.

बाबा विश्वनाथांच्या पावन भूमीसोबत एक वेगळे नाते तयार झाले. याच नगरीतील उस्ताद बिस्मिल्ला खान यांची शहनाई तर विश्वभरात परिचयाची झाली.'' डॉ. राजम, त्यांच्या वात्सल्य भावाबद्दल, तल्लीनतेबद्दल भरभरून सांगतात, ''जुगलबंदीच्या वेळी त्यांची शहनाई कुठे संपायची आणि व्हायोलिन कधी सुरू व्हायचे, हे एका पातळीनंतर लक्षातच यायचे नाही, इतके ते संगीत एकमेकांसोबत समरस होऊन जात असे.'' इतक्या दशकांचा कालावधी लोटला असला, तरीसुद्धा आजही त्यांचा रियाज थांबलेला नाही. त्यांच्या संगीताविषयी भाष्य करताना एके ठिकाणी मा. न्यायमूर्ती बी. एन. श्रीकृष्ण यांनी म्हटले की, ''राजम हा दिव्य संगीत आणि जीवनातील वास्तव यांच्यातील दुवा आहे.

कोणती तरी मोठी शक्ती त्यांना प्रेरणा देत आहे आणि त्या व त्यांचे संगीत, त्या बदल्यात आम्हाला प्रेरणा देतात. राजम यांचे व्हायोलिन ऐकताना ब्रह्मानंदाच्या प्रदेशात एक पाऊल पुढे टाकल्यासारखे वाटते.'' डॉ. राजम यांची कार्यकुशलता अफाट आणि अचाट आहे. पूर्वीच्या काळी 'गुरुकुल' पद्धतीचे शिक्षण अस्तित्वात होते. आता मात्र अशा पद्धतीची शिक्षणपद्धती नाही. मात्र, आजच्या विद्यार्थ्यांना जर त्या प्रकारच्या पद्धतीचा अनुभव घ्यायाचा असेल, तर त्यांच्यासाठी आपल्याला काय करता येईल, असा विचार त्यांनी केला व 'स्वरसाधना तपोवन' अशी आगळीवेगळी संकल्पना त्यांनी बंगळुरूजवळ राबविली. काळाच्या पटावर अनुभवाचे संचित घेऊन चालणाऱ्या डॉ. श्रीमती राजम आता पुढच्या पिढ्यांना मार्गदर्शन करीत आहेत. विद्येच्या महासागरात अशा एखाद्या होकायंत्राची गरज कायम असते, जो आपल्याला योग्य ती दिशा दाखवेल. तरुणांना मोलाचे मार्गदर्शन करताना त्या म्हणतात की, ''आजच्या काळात अभ्यासाला, ज्ञानाला महत्त्व आहेच. मात्र, त्याचबरोबर मुलांमध्ये कलागुण विकसित होणेसुद्धा तितकेच महत्त्वाचे आहे. कलागुणांच्या साह्याने माणसाच्या जीवनाचा विकास होतो. माणसाच्या जीवनाला यामुळे दिशा मिळते. त्यामुळे एखादी तरी कला, एखादे तरी वाद्य याच्याशी मुलांचा संबंध आला पाहिजे. या साऱ्याचा उद्देश हाच आहे की, मुलांमध्ये विधायक कार्य करण्याची शक्ती उत्पन्न व्हावी, विनाशकारी गोष्टींच्या वाट्याला त्यांनी जाऊ नये. वयाच्या या टप्प्यावरदेखील पुढच्या पिढीला मार्गदर्शन करताना ही विभूती खऱ्या अर्थाने 'लोकोत्तर' आहे, याचीच आपल्याला प्रचिती येते.



**दिवा विझताना अधिक जोरात फडफडतो. देशातील विरोधी पक्षांची अवस्था सध्या अशीच विझत चाललेल्या दिव्यासारखी. हेतुतः असंबद्ध बोलणे आणि संसदेच्या कामात गोंधळ निर्माण करण्याचे प्रयत्न राहुल गांधी यांच्याकडून प्रामाणिकपणे केले जात आहेत; तर तर्हेवाईक वागण्याचे नवनवे उच्चांक ममता बॅनर्जी गाठत आहेत. विरोधी नेत्यांच्या पायाखालची जमीन सरकत चालल्याचीच ही लक्षणे!**



# बुझते हुए दिये...

वेधक

राहुल बोरगांवकर

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे सरकार एकापोठापाठ एक विकासाचे बॉम्ब फोडत आहे आणि त्या आवाजाने भेदरलेले विरोधी पक्ष आरडाओरडा करीत सैरावैरा धावत आहेत. युरोपियन युनियनशी भारताने व्यापारी करार केल्यापासून सहा दिवसांतच अमेरिकेनेही भारताशी असाच व्यापारी सामंजस्याचा करार केल्याचे जाहीर केले. अमेरिकेने भारतावर लादलेले ५० टक्के आयातशुल्क थेट १८ टक्क्यांवर आणले. यामुळे भारतीय मालाला अमेरिकेसारखी बाजारपेठ पुन्हा खुली झाली. त्याआधी युरोपातील २७ देशांची आणि इंग्लंडचीही बाजारपेठ सवलतीच्या आयातशुल्काद्वारे भारतीय कंपन्यांसाठी खुली झाली होती. केंद्रीय अर्थसंकल्पातील दीर्घकालीन धोरणात्मक निर्णयांमुळे अब्जावधी डॉलरच्या परदेशी गुंतवणुकीसाठी भारताचे दरवाजे खुले झाले आहेत. त्याचा परिणामभारतात रोजगार वाढण्यात होणार आहे. भांडवल बाजारात तेजीची नवी लाट निर्माण झाली आहे. या दोन्ही करारांचे जागतिक स्तरावर प्रचंड स्वागत झाले आहे.

प्रत्येक देशाभिमानी भारतीयाला या गोष्टीचा अभिमान आणि आनंद वाटेल, यात शंकाच नाही. पण, देशातील विरोधी पक्षांसाठी मात्र ही फारच वाईट बातमी आहे. याचे कारण, या सार्या प्रगतीचे श्रेय भाजपला, विशेषत: पंतप्रधान मोदी यांना जात आहे. यंदा चार महत्त्वाच्या राज्यांमध्ये होणार्या विधानसभा निवडणुकीत त्याचा मोठा लाभ भाजपला मिळण्याची शक्यता स्पष्ट दिसत असल्याने जनतेत अप्रिय झालेल्या विरोधकांचे धाबे दणाणले आहेत. त्यामुळे काहीही करून या सरकारला अपशकुन करणे आणि संसदेचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरळीतपणे पार पाडू न देणे, यासाठी विरोधी पक्ष धडपडताना दिसत आहेत. हे देशाला लाज आणणारे असले, तरी हेच भारताचे राजकीय वास्तव आहे.

राष्ट्रपतींच्या अभिभाषणावर चर्चा करताना विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी अभिभाषणाचा मुद्दा सोडून भलत्याच विषयाला हात घातला. माजी लष्करप्रमुख जन. मनोज नरवणे यांच्या अप्रकाशित आत्मवृत्ताचा काही अंश एका मासिकाने प्रसिद्ध केला होता. त्यातील एका किरकोळ उल्लेखावरून भारताच्या सैन्याला आणि मोदी सरकारला बदनामकरण्याचा प्रयत्न राहुल गांधी करत आहेत, हे दिसल्यावर त्यांना संसदेत भाषण करण्यापासून रोखण्यात आले. संसदीय कामकाजाचे नियमत्यांना सांगून, ते त्या विषयावर भाषण करू शकत नाहीत, हे त्यांना सांगण्याचा प्रयत्न केला गेला. पण, राहुल गांधी यांनी झोपेचे सोंग घेतल्याने त्यांना जागे करणे शक्य नाही. त्या भानगडीत संसदेचे कामाचे दोन दिवस वाया गेले आणि काँग्रेस पक्षाचे आठ खासदार निलंबित झाले. पण, राहुल गांधी यांचे हे वागणे काहीच नाही, अशी थेरं प. बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी केली आहेत.

गेल्या महिन्यात कोलकात्यात एका खासगी कंपनीवर अंमलबजावणी संचालनालयाचे (ईडी) अधिकारी छापा मारीत होते. त्यांचे कामसुरू असताना अचानक ममता बॅनर्जी तेथे पोहोचल्या आणि त्यांनी या कंपनीचा लॅपटॉप आणि काही कागदपत्रांची फाईल स्वत:च उचलली आणि त्या बाहेर पडल्या. वास्तविक सीबीआय, पोलीस किंवा अन्य तपास संस्था यांचा छापा सुरू असताना तेथे अन्य कोणालाही प्रवेश दिला जात नाही. तसेच त्या स्थळावरून कोणतीही वस्तू दुसर्या कोणालाही आपल्या ताब्यात घेता येत नाही. तरीही, मुख्यमंत्रिपदावर असलेल्या ममता बॅनर्जी यांनी तेथे जाऊन हस्तक्षेप केला आणि कायदेशीर प्रक्रियेत अडथळा आणला. जेथे छापा पडला होता, ते सरकारी कार्यालय वा ममतांच्या तृणमूल काँग्रेस पक्षाचे कार्यालय नव्हते किंवा ममतांचे निवासस्थानही नव्हते. ते एका खासगी कंपनीचे कार्यालय होते. पण, आगामी विधानसभा निवडणुकीत तृणमूल काँग्रेस पक्षाची रणनीती आखण्याचे कामया कंपनीकडे सोपविले होते. या कंपनीवर लाच घेतल्याचा आरोप असून, त्यासंदर्भातच 'ईडी'ने छापा मारला होता. पण, आपल्या पक्षाची राजकीय रणनीती जाणून घेण्यासाठी केंद्र सरकारने मुद्दामतेथे 'ईडी'मार्फत छापा मारला, असा कांगावा ममतांनी केला.

आता गेल्या दोन-तीन दिवसांपासून त्यांनी आपल्या राजकीय अतिरेकाचे टोक गाठले आहे. दोन दिवसांपूर्वी त्या दिल्लीत आल्या आणि त्यांनी देशाचे मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेशकुमार यांची त्यांच्या कार्यालयात भेट घेतली. पण, तेथेही त्यांनी समजूतदारपणे त्यांच्याशी चर्चा केली नाही, तर आयुक्तांना धमकावले आणि त्यांच्यावर मनाला येतील ते आरोप केले. त्यानंतर त्यांनी आपल्या सुरक्षेसाठी बंगालमधून काही पोलीस अधिकाऱ्याची कुमक मागविली आणि त्या थेट सर्वोच्च न्यायालयात पोहोचल्या. प. बंगालमध्ये सध्या निवडणूक आयोगाकडून सुरू असलेल्या मतदारयाद्यांच्या शुद्धीकरणाची जी मोहीमसुरू आहे, त्याविरोधात त्यांनी सर्वोच्च न्यायालयात स्वत:च आपले म्हणणे मांडले.

प. बंगाल सरकारची बाजू मांडण्यासाठी नेमलेल्या ज्येष्ठ व नामांकित वकिलांना बोलू न देता, त्या स्वत:च न्यायाधीशांपुढे उभ्या राहिल्या. वास्तविक, घटनेनुसार त्यांना असे करता येत नाही. न्यायालयातील खटल्यात युक्तिवाद करण्यासाठी संबंधित व्यक्तीने वकिलीची पदवी घेतलेली असावी लागते, त्याच्याकडे 'बार काऊन्सिल'ची परवानगी (सनद) लागते. तसेच फिर्यादीने वकील नेमला असेल, तर तोच केवळ फिर्यादीची बाजू मांडू शकतो, खुद्द फिर्यादीलाही तसा अधिकार नसतो. पण, ममता या स्वयंभू असल्याने त्या स्वत:च न्यायालयात उभ्या राहिल्या. त्यांचे म्हणणे न्यायाधीशांनी काहीकाळ ऐकून घेतल्यावर त्यांना त्यांच्या वकिलामार्फत आपली बाजू मांडण्याची सूचना करण्यात आली आणि आता पुढील सुनावणी येत्या सोमवारी होईल.

या साऱ्या घडामोडी एकाच गोष्टीची पुष्टी करतात. देशातील विरोधी पक्ष हे राजकीयदृष्ट्या पूर्णपणे वैफल्यग्रस्त झाले आहेत. केंद्र सरकारकडून देशहिताचे निर्णय घेतले जात असून, जागतिक स्तरावर भारताचे महत्त्व आणि दबदबा वाढत चालला आहे. त्याचा राजकीय लाभ केंद्रात सत्तेत असलेल्या भाजपला मिळू नये आणि सरकारच्या हेतूंविषयी समाजात संभ्रमपसरवून त्याला निवडणुकीत मते मिळू नयेत, यासाठी विरोधी पक्ष कोणत्याही थराला जात आहेत. 'ईडी'चा छापा सुरू असताना एका मुख्यमंत्र्याने तेथे प्रत्यक्ष जाऊन त्यात अडथळा आणणे आणि सर्वोच्च न्यायालयात मुख्यमंत्र्याने स्वत:च आपली बाजू सादर करणे यांसारख्या आजवर कधी न घडलेल्या घटना भारतीयांना पाहायला मिळत आहेत. त्यावरून देशातील समंजस जनता आणि मतदार योग्य तो अर्थ काढण्यास सक्षमआहेत..

# डिझाइन क्षेत्रातील करिअर:
## भविष्यातील आव्हानांवर नाविन्यपूर्ण उत्तर




करिअरच्या वाटा

धर्मेश टांक

आजच्या इंडस्ट्रियल डिझाइन: वस्तूंच्या निर्मितीतून जीवन सुसह्य करणारी कला आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या युगात जिथे सॉफ्टवेअर नोकऱ्या धोक्यात आहेत, तिथे 'इंडस्ट्रियल डिझाइन' हे एक असे क्षेत्र आहे, जे थेट आपल्या भौतिक जगाशी जोडलेले आहे. आपल्या हातातल्या स्मार्टफोनपासून ते आपण चालवत असलेल्या कारपर्यंत, प्रत्येक वस्तूमागे एका इंडस्ट्रियल डिझायनरचा विचार असतो. ही शाखा केवळ वस्तू सुंदर बनवत नाही, तर ती वापरण्यास सोपी आणि कार्यक्षम कशी होईल हे पाहते.

**इंडस्ट्रियल डिझाइनच्या प्रमुख उपशाखा:**

**१. प्रॉडक्ट डिझाइन** (Product Design): -
सकाळी उठल्यापासून वापरल्या जाणाऱ्या टूथब्रशपासून ते दवाखान्यातील गुंतागुंतीच्या वैद्यकीय उपकरणांपर्यंत सर्व वस्तूंचे डिझाइन येथे केले जाते. मानवी गरजा समजून घेऊन नवनवीन उत्पादने तयार करणे, हे याचे मुख्य उद्दिष्ट आहे.

**२. ट्रान्सपोर्टेशन आणि ऑटोमोबाईल डिझाइन** (Tranportation Design):-
केवळ गाडीचा लूक बदलणे म्हणजे ट्रान्सपोर्टेशन डिझाइन नव्हे. इंधनाची बचत, चालकाची सुरक्षा आणि आरामदायी प्रवास यांचा विचार करून भविष्यातील इलेक्ट्रिक वाहने आणि सार्वजनिक वाहतूक व्यवस्था डिझाइन करण्याचे काम हे तज्ज्ञ करतात.

**३. पॅकेजिंग डिझाइन** (Pabkaging Design):-
कोणतेही उत्पादन ग्राहकापर्यंत सुरक्षित पोहोचवण्यासाठी आणि ते आकर्षक दिसण्यासाठी 'पॅकेजिंग' महत्त्वाचे असते. शाश्वत आणि पर्यावरणास पूरक पॅकेजिंग तयार करणे हे आजच्या काळातील मोठे आव्हान आणि संधी आहे.

**५. फर्निचर आणि इंटेरिअर प्रॉडक्ट डिझाइन:-**
बदलत्या शहरी जीवनशैलीनुसार कमी जागेत जास्तीत जास्त सोयी देणारे फर्निचर डिझाइन करणे ही आज काळाची गरज बनली आहे.

**मानवासाठी महत्त्व:-**
इंडस्ट्रियल डिझाइनमुळे मानवी कष्ट कमी होतात आणि जगण्याची गुणवत्ता सुधारते. World Design Organiyation (WDO) नुसार, इंडस्ट्रियल डिझाइन हे केवळ नफ्यासाठी नसून सामाजिक कल्याणासाठी आणि पर्यावरणाच्या रक्षणासाठी अत्यंत आवश्यक आहे. जेव्हा कोडिंग आणि डेटा एन्ट्रीसारखी कामे यंत्रे करतील, तेव्हा प्रत्यक्ष वस्तूंचा अनुभव (Phÿribal Ewerienbe) निर्माण करणारा 'इंडस्ट्रियल डिझायनर' हाच खऱ्या अर्थाने भविष्य घडवणारा ठरेल.

**स्पेस डिझाइन:-** केवळ भिंती नव्हे, तर मानवी अनुभवांची मांडणी
आपण आपला ९०% वेळ हा विविध वास्तूंच्या आत किंवा सभोवताली घालवतो. त्यामुळेच आपण जिथे राहतो, काम करतो किंवा फिरतो, त्या जागांचा आपल्या मानसिक आणि शारीरिक स्वास्थ्यावर मोठा परिणाम होतो. 'स्पेस डिझाइन' हे क्षेत्र केवळ सिमेंट-काँक्रीटचे बांधकाम नसून, मानवी गरजा आणि पर्यावरण यांचा समतोल साधणारी कला आहे.

**स्पेस डिझाइनमधील विविध पैलू:-**

**१. इंटिरिअर डिझाइन** (Interior Derign): घराच्या किंवा ऑफिसच्या आतील जागेचा जास्तीत जास्त आणि कल्पक वापर करणे म्हणजे इंटिरिअर डिझाइन. आधुनिक काळात 'स्मार्ट होम्स'च्या संकल्पनेमुळे या क्षेत्राला मोठी मागणी आहे.

**२. पब्लिक स्पेस डिझाइन** (Publib Sabe Design): उद्याने, रेल्वे स्टेशन्स आणि सार्वजनिक चौक अशा जागांचे नियोजन करणे, जेणेकरून जास्तीत जास्त लोक त्याचा सुरक्षितपणे वापर करू शकतील.

**३. रिटेल स्पेस डिझाइन** (Retail Space Design): मॉल्स किंवा शोरूम्समध्ये ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी आणि खरेदीचा अनुभव सुखकर करण्यासाठी विशेष डिझाइन केले जाते.

**४. युनिव्हर्सल डिझाइन** (Univerral Design): हे अत्यंत महत्त्वाचे क्षेत्र आहे. दिव्यांग, लहान मुले आणि वृद्धांना कोणत्याही अडथळ्याशिवाय वास्तू वापरता येईल, अशा पद्धतीने डिझाइन करणे म्हणजे युनिव्हर्सल डिझाइन.

**आर्किटेक्चरमध्ये करिअर कसे करावे?**
भारतात वास्तुविशारद (asbhitebt) होण्यासाठी B.asbh. ही पाच वर्षांची पदवी पूर्ण करावी लागते. यासाठीची प्रक्रिया खालीलप्रमाणे आहे:

NATA **परीक्षा:** आर्किटेक्चरला प्रवेश घेण्यासाठी National atisvde Tert in arbhitebrsve (NATA) ही परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य आहे.

JEE Main Paer २: आयआयटी (IITS) आणि एनआयटी (NITS) मध्ये प्रवेशासाठी ही परीक्षा घेतली जाते.

**निष्कर्ष:**
AI मुळे इमारतींचे नकाशे तयार करणे सोपे होईल, पण एखाद्या जागेचा 'आत्मा' ओळखणे आणि तिथल्या संस्कृतीनुसार ती जागा जिवंत करणे हे केवळ मानवी संवेदनेतूनच शक्य आहे. त्यामुळे स्पेस डिझाइन हे भविष्यातील एक शाश्वत करिअर आहे.

प्रासंगिक

गो. बं. देगलुरकर

# शिवमाहात्म्य गाताना...

**दरवर्षी महाशिवरात्रीच्या निमित्ताने शिवाची आराधना होत असली, तरी शिव ही देवता खऱ्या अर्थाने आपल्याला समजली आहे, असा दावा कोणीही करणार नाही. देशभर शिवाच्या नानाविध प्रकारच्या मूर्ती आढळतात. प्रत्येक रूपाची काही वैशिष्ट्ये आहेत, त्यामागे एक अर्थ दडला आहे. त्यामुळेच अभ्यासकांप्रमाणेच भाविकांनीही ती १५ फेब्रुवारी रोजी असणाऱ्या महाशिवरात्रीच्या निमीत्ताने जाणून घ्यायला हवी.**



अतिशय जाज्वल्य श्रद्धाभाव असणाऱ्या भारतासारख्या देशात शिवाची भक्तिभावे उपासना केली जाते. शिवभक्तांसाठी महाशिवरात्रीचा दिवस तर विशेष महत्त्वाचा. त्यामुळेच नेहमीच्या भावपूर्ण वातावरणात साजरी झालेली महाशिवरात्र प्रत्येकालाच नव्याने शिवम हिमा सांगून आणि दाखवून गेली आहे. पण ही उपासना या दिवसापुरती सीमित नाही.

नित्योपासनेत शिवपूजा करणारे अनेक भक्त शिवापुढे अत्यंत श्रद्धापूर्वक नतमस्तक होतात. सोवार, प्रदोष या दिवशी उपासना, व्रत, उपवास आणि स्तोत्रपठण याद्वारे या देवतेला नमन करण्याचा प्रयत्न करतात. अवघे विश्व व्यापलेला हा देव खरे तर विरक्त आहे. सामान्यांपासून दूर राहणारा योगी आहे. तपस्वी आहे. तो संहारक आहे. एरवी भोळा म्हणून वर्णिला जाणारा हा देव वेळ येईल तेव्हा अत्यंत क्रोधित होणाराही आहे. त्याचे तिसरे नेत्र संहारक शक्तीचे परमोच्च बिंदू दाखवणारे आहे. पण असे असतानाही तो प्रपंचात रमणारा आहे. पत्नी आणि दोन मुलांसवे संसार करणारा आहे. आपली उपासना आणि आराधना करणाऱ्या प्रत्येकावर कृपादृष्टी ठेवणारा आहे. त्याचे हे सौम्य आणि शीतल रूपच भक्तजनांना त्याच्याजवळ घेऊन जाते. वाटीभर दुधाच्या अभिषेकाने तो प्रसन्न होईल, अशी आशा देऊ करते. बेलाच्या पानांनी त्याला शृंगारले जाते. ऊसाचा रस, आंब्याचा मोहोर त्याला अर्पण केला जातो आणि दिवसभर उपवास करून त्याची आराधना केली जाते. आपण सर्वांनी याच पद्धतीने शिवरात्र साजरी केली. पण हे केले म्हणजे सर्वार्थाने शिवाची महती आपल्या लक्षात आली, असे होत नाही.

सिंधू संस्कृतीच्या काळापासून म्हणजे सुरे ५००० वर्षांपासून आपल्याला शिव माहीत आहे. ब्रह्मा अथवा विष्णूची इतकी प्राचीन मूर्ती अद्याप तरी मिळालेली नाही. शिवाच्या दृष्टीने विचार करता विष्णू आणि ब्रह्मा जास्त परिस्कृत देव आढळतात. शिव मात्र विचित्र वेशभूषा, केशभूषा, विचित्र अलंकार अशा रूपात समोर येतो. तो नरमुंड माळा मिरवणारा, व्याघ्रचर्म ल्यालेला, जटाजूटधारी, भस्मार्चन करणारा आणि स्मशानात राहणारा आहे. असे असले तरी तो मनाने भोळा आहे. तो आशुतोष म्हणजे अल्पसंतुष्ट आहे. अमरकोशात शिवाला ४८ नावांनी संबोधले आहे. पुराणादी वाङ्मयातून त्याच्या उपकारक आणि संहारक अशा प्रकारच्या कथा प्रसिद्ध आहेत. आपल्याकडील मूर्तिकारांनी या कथांना रूप दिले आहे.


शिवाची पूजा लिंगरूपाने होत असली, तरी क्वचित ठिकाणी शिवाची मूर्तीही प्रतिष्ठापित झालेली दिसते. उदाहरणार्थ तामिळनाडूमधल्या चिदंबरम येथील मंदिरात शिवाची मूर्ती आढळते. अन्य देवतांच्या शिवाइतक्या वैविध्यपूर्ण मूर्ती उपलब्ध नाहीत. या देवतेच्या केवलशिव, वृषवाहन शिव, सोस्कंद शिव अशा प्रकारच्या सामान्य मूर्ती असल्या, तरी काही विशेष मूर्तीही उपलब्ध आहेत. आजूबाजूला पार्वती, गणपती, कार्तिकेय असे कोणीही नसलेली, केवळ शिव असणारी ती केवलशिव मूर्ती. नंदीसह असतो तो वृषवाहन शिव आणि उमा आणि कार्तिकेयाबरोबर बसलेला शिव अशी मूर्ती म्हणजे स्कंदशिव. या शिवाच्या सामान्य मूर्ती आहेत. त्याच्या विशेष मूर्तींचे काही गट आहेत. त्यांना संहार मूर्ती, अनुग्रह मूर्ती, दक्षिणा मूर्ती असे म्हणतात. संहार मूर्तीमध्ये शिव वध केलेल्या राक्षसांच्या

आकृतींसह असतो. उदाहरणार्थ अंधकासुर शिवमूर्तीमध्ये शिव अंधक नावाच्या राक्षसाला ठार करताना दिसतो. याच धर्तीवर शिवाची त्रिपुरांतक मूर्ती आहे. यात शिव त्रिपुरांतक नावाच्या राक्षसाचा वध करताना दिसतो. गजासुरवधमूर्ती म्हणून शिवाची एक संहारमूर्ती आढळते. त्यात शिवाने इतर देवांना आपापल्या शक्ती देण्याचे आवाहन करून, त्या शक्ती मिळवून गजासुराचा वध केला. दक्षिणेध्ये या गजासुर वधाच्या मूर्ती मोठ्या प्रमाणावर आढळून येतात. काही प्रमाणात महाराष्ट्रातही आढळतात. सांगायचे कारण एवढेच की, 'परित्राणाय साधुनाम विनाशायचं दुष्कृताम्' असे आपण म्हणतो, ते इथे दृष्टीस पडते. शिवाने जनसामान्यांना छळणाऱ्या, यज्ञसंस्थेचा नाश करणाऱ्या दुष्ट राक्षसांचा नि:पात केला. 'परिणात्राणाय साधुनाम' हा प्रकार शिवाच्या अनुग्रह मूर्तींमध्ये आढळून येतो. उदाहरणार्थ शिवाची मार्कंडेयानुग्रहमूर्ती आढळते.

अंबरनाथच्या देवळावर, वेरुळच्या लेण्यांध्ये अशा मूर्ती आढळतात. अशाच एका मूर्तीला अर्जुनानुग्रहमूर्ती म्हणतात. इथे शिवाने अर्जुनाला पाशुपात अस्त्र दिल्याचे दाखविले जाते. शिव भिल्लाच्या रूपात अर्जुनासमोर आल्याचे यात दाखविले जाते. महाभारतात याच पाशुपतास्त्राने अर्जुनाने कर्णाचा वध केल्याचे वर्णन आढळते. अनुग्रहाची यापेक्षाही एक चांगली मूर्ती म्हणजे रावणानुग्रह मूर्ती. कुबेराचा पराभव केल्यानंतर परतत असताना रावणाला कैलास पर्वत दिसतो. तिथे प्रवेश करण्यास मज्जाव झाल्याने रावण चिडतो आणि हा पर्वत उखडून टाकण्याचा प्रयत्न करतो. रावण सर्व शक्तिनिशी कैलास हलवू लागतो तेव्हा शिवाला तो रावणच असल्याची खात्री पटते. पण अत्यंत शांतपणे तो आपल्या अंगठ्याने रावणाला पाताळात दाबून टाकतो. ही शक्ती शिवाशिवाय कोणाचीही नाही, हे जाणल्यामुळे रावण शिवाची स्तुती करू लागतो. ही 'शिवस्तुती' अत्यंत प्रसिद्ध आहे. ही स्तुती ऐकून शिव प्रसन्न होतो आणि रावणाला भेटस्वरूपात वीणा देतो. या कथेवर आधारलेली उत्तम शिल्पाकृती वेरुळच्या कैलास लेण्यात आहे. अनुग्रहाच्या असो की संहाराच्या, अन्य देवतांच्या अशा कथा आणि शिल्पे आढळत नाहीत. या कथा शिवाचे महत्त्व सांगणाऱ्या असल्या, तरी शिव हे दैवत म्हणून किती मोठे, हे या कथांधून पुढे येतेच असे नाही. शिवाच्या विशेष मूर्तीमध्ये दक्षिणामूर्ती आढळते. दक्षिणा म्हणजे ज्ञान. दक्षिणेध्ये शिवाच्या देवळात दक्षिणेकडे तोंड करून असणारी शिवाची अशी दक्षिणामूर्ती असते. या मूर्ती दोन-तीन प्रकारच्या आहेत. एक म्हणजे व्याख्यान दक्षिणामूर्ती, दुसरी ध्यान दक्षिणामूर्ती, तिसरी म्हणजे वीणा दक्षिणामूर्ती. शिव उत्तम गायक आहे, त्याच्याजवळ वीणा असते. शिवाचे हे रूप दाखवणाऱ्या मूर्तीला वीणादक्षिणामूर्ती म्हणतात. आपल्याकडे नृत्यदक्षिणामूर्तीदेखील आढळते. शिवाचे १०८ प्रकारांचे तांडवनृत्य आपल्याला माहीत आहे. याशिवाय उमातांडव, प्रदोषतांडव, आनंदतांडव अशा प्रकारचे नऊ तांडव आहेत. म्हणजेच शिव इतक्या प्रकारांध्ये नृत्य करीत असतो. आश्चर्य वाटेल, पण इतक्या प्रकारच्या मूर्ती चिदंबरम येथील देवळामध्ये कोरलेल्या आढळतात. तंजावरच्या मंदिरातही शिवाच्या १०८ मूर्ती असून त्यांची नावेही खाली कोरली आहेत. शिवाने भगीरथाच्या विनंतीवरून स्वर्गातील गंगा पृथ्वीवर आणली. त्याला गंगाधर शिव म्हणतात. अशा प्रकारच्या तीन मूर्ती असतात. स्वर्गातून गंगा खाली येत असते; त्याला गंगावतरण म्हणतात. गंगा शिवाच्या डोक्यावर दाखवलेली असते; तो गंगाधर शिव असतो. केसाच्या एका बटीतून शिव गंगेला सोडून देतो तेव्हा त्याला गंगाविसर्जन मूर्ती म्हणतात. गंगेचा सोडून दिलेला हा प्रवाह खाली तपश्चर्या करणाऱ्या जन्हू नावाच्या ऋषींनी गिळून टाकलेला असतो. प्रार्थना केल्यानंतर ते कानातून गंगेचा प्रवाह सोडून देतात. म्हणून जान्हवी हे गंगेचे एक नाव आहे. शिवाच्या या मूर्तीही खूप मोठ्या प्रमाणावर उपलब्ध आहेत.

नागपूर जिल्ह्यात केलेल्या उत्खननात शिवाच्या अगदी वेगळ्या प्रकारच्या दोन मूर्ती आढळल्या. एका मूर्तीच्या देहावर आठ तोंडे आहेत. मूर्तीचे एक मुख्य मुख आहे तर त्याच्या खांद्यावर दोन तोंडे आहेत, मानेवरच्या एका तोंडाला आणखी तीन तोंडे फुटलेली आहेत. म्हणजे चार दिशांना चार तोंडे आहेत. शिवाय जंघामुलावर दोन तोंडे आहेत. अशा शिवाला अष्टमूर्ती शिव म्हणतात. 'शाकुंतल'मध्ये सुरुवातीलाच या मूर्तीचा उल्लेख आढळतो. बंगालचे सेन, पाल राजे अष्टमूर्ती शिवाचे उपासक होते. पृथ्वी, आप, तेज, वायू, आकाश, चंद्र, सूर्य आणि शिव असे मिळून एकत्र झालेली शक्ती या अष्टमूर्तीमध्ये दाखवली जाते. असा दुसरा देव आढळत नाही. याशिवाय बारा तोंडे असणाऱ्या शिवाची मूर्तीही आढळून आली आहे.

नागपूरमधील मांढळमध्ये ही मूर्ती आढळली. या मूर्तीमध्ये शिवाच्या मानेवरील चार तोंडांच्या वरदेखील चार तोंडे आहेत. म्हणजेच मानेवर एकूण आठ तोंडे आहेत. वरची तोंडे उपदिशांकडे आहे. याला द्वादशशिव म्हणतात. सर्वपार्श्वुखशिव या नावानेही ही मूर्ती ओळखली जाते. इथे शिवाचे सर्वव्यापी स्वरूप दाखविले आहे. हे शिवाचे दुर्मिळ रूप आहे.



# यत्र तत्र सर्वत्र भाजप!

**भाजप हा केवळ शहरी तोंडवळा असलेला पक्ष आहे, ही राजकीय समजूत परवाच्या जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांच्या निकालांनी पूर्णतः खोडून काढली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली ग्रामीण महाराष्ट्रात भाजपची खोलवर रुजलेली पकड स्पष्ट झाली, तर सत्तेच्या क्षणिक प्रयोगांवर उभे राहिलेले विरोधी नेतृत्व आज दिशाहीन आणि काठावर ढकलले गेले आहे.**



विशेष

प्रतिनिधी

महाराष्ट्राच्या राजकारणात जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणूक निकालांकडे केवळ स्थानिक स्वराज्य संस्थांच्या चष्म्यातून पाहता येत नाही. कारण, 'मिनी विधानसभा' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या निवडणुकीच्या निकालांनी राज्यातील सत्तासमीकरणांचा पुढील पाच वर्षांचा आराखडाच स्पष्ट केला आहे. ७३१ जिल्हा परिषद जागांपैकी तब्बल ५५२ जागांवर महायुतीने मिळवलेला विजय हा आकड्यांचा खेळ नाही, तर जनमानसात खोलवर रुजलेल्या राजकीय-बदलाचा स्पष्ट निर्देश आहे. या निवडणुकीत भाजप २२५ जागांसह सर्वात मोठा पक्ष ठरला असून, त्याखालोखाल राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (अजित पवार) १६५ आणि शिवसेना (शिंदे) १६२ जागांवर विजयी झाली.

दुसरीकडे, शिवसेना (उबाठा) गट ४३ आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) २६ जागांवर समाधान मानावे लागले. हे चित्रच राज्यातील ग्राम ीण राजकारणाची दिशा बदलल्याचे सांगण्यासाठी पुरेसे ठरावे. विधानसभा, नगरपालिका, महापालिका आणि आता जिल्हा परिषद-पंचायत समिती अशा सलग चार निवडणुकांत भारतीय जनता पक्षाने राज्यात 'नंबर एक' पक्ष म्हणून आपले स्थान अधिक भक्कमकेले आहे. विधानसभा निवडणुकीत १३२ आमदार, नगरपालिका निवडणुकांत १३० नगराध्यक्ष आणि जवळपास तीन हजार नगर-सेवक, २९ महापालिकांपैकी २२ ठिकाणी सत्ता आणि आता जिल्हा परिषद व पंचायत समित्यांमध्ये आघाडी ही क्षणिक यशाची यादी नाही, तर संघटनात्मक ताकदीची साखळी आहे. महाराष्ट्रात भाजपचा हा प्रवास अचानक घडलेला नाही; तर तो गेल्या दहा-बारा वर्षांच्या सातत्यपूर्ण विस्ताराचा परिणाम आहे. या निवडणुकांचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रत्यक्ष प्रचारात न उतरण्याचा घेतलेला निर्णय. उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या निधनानंतर जिल्हा परिषद निवडणुकांसाठी एकही सभा न घेण्याचा निर्णय त्यांनी घेतला. प्रचारसभा, रॅली किंवा भाषण न करता निवडणूक लढवण्याचा हा निर्णय राजकीयदृष्ट्या धाडसी मानला जात होता; परंतु निकालांनी दाखवून दिले की, भाजपची ताकद आता व्यक्तिकेंद्रित न राहता, यंत्रणाकेंद्रित झाली आहे. मुख्यमंत्री प्रचारात उतरले नसले, तरी पक्षाची निवडणूक यंत्रणा पूर्ण क्षमतेने कार्यरत होती. मराठवाड्याची जबाबदारी रावसाहेब दानवे आणि चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे सोपवण्यात आली होती. नांदेडमध्ये अशोक चव्हाण, परभणीत मेघना बोडकर सक्रिय होत्या. पश्चिम महाराष्ट्रात चंद्रकांतदादा पाटील, जयकुमार गोरे आणि धनंजय महाडिक यांनी सूत्रे हाती घेतली. उत्तर महाराष्ट्रात गिरीश महाजन यांनी आघाडी घेतली, तर कोकणात नितेश राणे आणि रविंद्र चव्हाण यांनी जबाबदारी सांभाळली. प्रदेशाध्यक्ष म्हणून रविंद्र चव्हाण आणि बावनकुळे यांनी संपूर्ण राज्यावर लक्ष ठेवत सूक्ष्मनियोजन केले. स्थानिक नेत्यांच्या छोट्या-मोठ्या सभा, बूथ पातळीवरील संपर्क आणि संघटनात्मक शिस्त याच जोरावर भाजप पुन्हा एकदा महाराष्ट्रातील सर्वात मोठा पक्ष ठरला. या यशाचा राजकीय अर्थ अधिक खोलवर असाच आहे.

२०१४ ते २०२४ या दशकात राज्यात विधानसभेच्या तीन आणि लोकसभेच्या तीन निवडणुका झाल्या. या सर्व निवडणुकांत भाजपच्या मतांची टक्केवारी साधारण २५ ते २८ टक्क्यांच्या दरम्यान राहिली. शेवटच्या विधानसभा निवडणुकीत भाजपला सुमारे २६ टक्के, शिवसेनेला १२ टक्के आणि राष्ट्रवादी काँग्रेसला नऊ टक्के मते मिळाली होती. हे आकडे सांगतात की, भाजप आजही 'सर्वात मोठा पक्ष' आहे. मात्र, २०२९ मध्ये स्वबळावर सत्ता मिळवायची असल्यास भाजपला किमान ४० टक्क्यांच्या मतांचा टप्पा गाठावा लागणार आहे. हाच टप्पा गाठण्यासाठी ग्रामीण महाराष्ट्र मजबूत करण्याची रणनीती गेल्या काही वर्षांत राबवली जात आहे. २०१७ च्या जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांत शरद पवार आणि अजित पवार एकत्र असताना राष्ट्रवादी काँग्रेस हा ग्रामीण महाराष्ट्रातील सर्वात मोठा पक्ष ठरला होता. सहकारी संस्था, साखर कारखाने, दूध संघ आणि स्थानिक स्वराज्य संस्थांवर राष्ट्रवादीचे वर्चस्व हे त्या काळातील वास्तव होते. मात्र, अलीकडील नगरपालिका आणि जिल्हा परिषद निवडणुकांत भाजपने ग्रामीण भागातही आघाडी घेत हे समीकरण बदलल्याचे स्पष्ट झाले आहे. शेतकरी प्रश्न, पायाभूत सुविधा, रस्ते, पाणीपुरवठा, वीज आणि केंद्र-राज्य समन्वयातून आलेल्या योजनांचा फायदा ग्रामीण मतदारांपर्यंत पोहोचवण्यात भाजप अधिक यशस्वी ठरला.या पार्श्वभूमीवर महायुतीतील मित्रपक्षांसाठीही हा निकाल इशाराच आहे. भाजपची वाढलेली ताकद ही युतीतील समतोल बदलत असल्याचे दर्शवते. आज भाजप २२५ जागांवर, तर राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना मिळूनही त्या आकड्याच्या आसपास आहेत. त्यामुळे भविष्यात जागावाटप, नेतृत्व आणि निर्णय प्रक्रियेत भाजपची भूमिका अधिक निर्णायक होणार, हे अटळ. दुसरीकडे, विरोधकांसाठी हा निकाल आत्मपरीक्षणाचा क्षण आहे. उबाठा आणि शरद पवार गटाची कामगिरी तर निराशाजनक अशीच. केवळ सत्तेच्या विरोधात असणे पुरेसे ठरत नाही; तर संघटनात्मक बांधणी, स्थानिक नेतृत्व आणि ठोस अजेंडा याशिवाय ग्रामीण महाराष्ट्र जिंकता येत नाही, हे या निकालांनी पुन्हा अधोरेखित केले. मतदार आता घोषणांपेक्षा कामगिरी पाहतो आणि केंद्र व राज्य सरकारच्या योजनांचा थेट लाभ जिथे दिसतो, तिकडे त्याचा कल झुकतो. भाजप हा शहरी मध्यम वर्गाचा पक्ष आहे, ग्रामीण महाराष्ट्रात त्याला फारसा आधार नाही; ही जी गेली कित्येक वर्षे चुकीची धारणा पसरवली गेली होती, ती जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांच्या निकालांनी निर्णायकपणे चुकीची ठरवली आहे. आज भाजपचा विस्तार हा शहरांच्या चौकटीत अडकलेला नसून, तो गावागावांपर्यंत पोहोचलेला आहे. पायाभूत सुविधा, थेट लाभ योजना, कृषी क्षेत्राचा विकास, रस्ते, वीज, पाणी आणि प्रशासनातील गती या मुद्द्यांवर भाजपने ग्रामीण मतदारांशी थेट नातं जोडलं. त्यामुळे 'शहरी पक्ष' ही टीका आता राजकीय वास्तवाशी विसंगत ठरते. याच्या उलट, २०१९ मध्ये उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांनी महाविकास आघाडी स्थापन करून सत्तेचा क्षणिक लाभ घेतला. वैचारिक विसंगती असूनही सत्ता मिळवणे, हा त्या प्रयोगाचा केंद्रबिंदू होता. मात्र, सत्ता ही संघटनाचा पर्याय ठरू शकत नाही, हे या पाच-सहा वर्षांत स्पष्ट झाले. सत्तेत असताना तळागाळातील संघटनबांधणी, स्थानिक नेतृत्व आणि ग्रामीण प्रश्नांकडे दुर्लक्ष झाले. त्याचा परिणाम आज निवडणूक निकालांत दिसतो. आज परिस्थिती अशी आहे की, ठाकरे आणि पवार यांचे राजकारण हे प्रतिक्रियात्मक, बचावात्मक आणि स्मरणरंजनापुरते मर्यादित झाले आहे. एकेकाळी महाराष्ट्राच्या राजकारणावर निर्णायक प्रभाव टाकणारे हे नेते आता निवडणूक नकाशावर काठावर ढकलले जात आहेत. जनादेशाने केवळ सत्तांतर नाही, तर राजकीय कालबाह्यतादेखील अधोरेखित केली आहे.

जिल्हा परिषद-पंचायत समिती निवडणुकांचे हे निकाल महाराष्ट्राच्या राजकारणातील पुढील पर्वाची नांदी ठरू शकतात. भाजपने ग्रामीण भागात आपले पाय अधिक घट्ट आहेत, महायुतीतील शक्तिसंतुलन बदलले आहे. हा विजय केवळ आजचा नाही, तर उद्याच्या राजकारणाचा आराखडा आहे. महाराष्ट्रात सत्ता केवळ शहरी भागात नव्हे, तर गावागावांत कशी रुजवता येते, याचाच हा वस्तुपाठ!



## अघटित

ते एक मिश्कील वादळ होतं,  
ते एक रांगडं झपाटलेपण होतं,  
इतकी वर्ष सांभाळत होतीस,  
ते वादळ अदृश्यपणे, निमुटपणे  
तो झंझावात आता थांबला  
कायमचाच अचानक!  
ते वादळ शांत झालं  
कायमचंच अचानक  
वाटलं होतं ग सगळ्यांनाच.....  
कोलमडून पडशील तू,  
उद्ध्वस्त होशील तू.  
पण, तू तर ऊभी राहिलीस  
मनातलं वादळ मनातच थोपवून  
डोळ्यातल्या आसवांना बांध घालून  
त्याच सात्विक चेहऱ्याने खंबीरपणे!  
स्वेच्छेने नक्कीच नाही पण....  
सैरभैर झालेल्या हजारो मनांसाठी  
अपूर्ण राहिलेल्या हजारो स्वप्नांसाठी...  
तू पुन्हा ऊभी राहिलीस!  
त्या शालीन,  
कुलीन व्यक्तित्वाला सलाम!  
त्या व्यक्तित्वातल्या  
स्त्रीशक्तीला सलाम!  
पण....... सांभाळून ग बाई!  
सगळंच अवघड आणि अनपेक्षित...  
कोण आपले? कोण परके?  
सगळेच मुखवटे! सगळेच मुखवटे!  
नियतीचा खेळ अहर्निश चाले  
आपण फक्त प्यादे... फक्त प्यादे !!

अनिता देशपांडे,  
पुणे